
रससिंधु
भारती बिर्जे - डिग्गीकर

# रससिंधु

भारती बिर्जे डिग्गीकर

ई साहित्य प्रतिष्ठान

# रससिंधु (ras_sindhu)


## भारती बिर्जे डिग्गीकर

अ-६५, कमलपुष्प,
लीलावती हॉस्पिटलजवळ,
वांद्रे रेक्लेमेशन,
वांद्रे पश्चिम,
मुंबई ४०००५०.
bharati.diggikar@gmail.com
http://www.maayboli.com/user/39263/created



## मुखपृष्ठ : प्रज्ञा हरणखेडकर

## ई साहित्य प्रतिष्ठान

esahity@gmail.com

www.esahity.com



©esahity Pratishthan® 2014

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.
- या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण किंवा रुपांतर करण्यासाठी लेखिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

## अर्पणपत्रिका

माझी पणजी कै.श्रीमती सरस्वती बाळ नाईक

(जन्म १८८०, मृत्यू १९६८)

मुख्याध्यापिका , लोकल बोर्ड मुलींची प्राथमिक शाळा,शिरोडा.

प्रिय पणजी, संघर्ष करून आत्मज्योत जागवलीस,

इतर निराधार स्त्रियांमध्येही ती जगवलीस.

अगदी लहानपणी तुला एकदाच पाहू शकले.

तुझा नेहमीच अभिमान वाटतो.

हे लेखन तुला विनम्रभावाने अर्पण.

- भारती

ऋणनिर्देश

. संस्थळ मायबोली, मायबोली परिवार, या लेखनाच्या प्रथम प्रकाशन-प्रोत्साहनासाठी

. टीम ई साहित्य प्रतिष्ठान, या लेखनाच्या तशाच उत्स्फूर्त स्वागत-स्वीकारासाठी

. मिलिंद पदकी, मला ई-बुक काढण्यास आग्रह करून प्रवृत्त करण्यासाठी

. प्रज्ञा हरणखेडकर, नेहमीप्रमाणेच प्रेमाने, तत्परतेने सुंदर मुखपृष्ठ करून देण्यासाठी

. स्वामीजी निश्चलानंद, प्रस्तावना लिहून या लेखनाचा सन्मान करण्यासाठी

# विषय-सूची

प्रस्तावना : स्वामी निश्चलानंद

1.वाचन आणि आपण

2.मेघना पेठेंची कविता

3.राहुल सांकृत्यायन- पांडित्यातील प्रतिभा :वोल्गा ते गंगा

4.बंधन आणि मुक्ती :कवी अनिलांची दशपदी

5.'चोखेर बाली':'स्नेह-प्रेमाचे रवींन्द्र संगीत

6.फक्त तुझी जर दगडी भिवई :मर्ढेकर आणि ईश्वर

7.शरदबाबूंचा श्रीकांत

8.निर्मितीप्रक्रिया : बोरकरांच्या शब्दात

9.'हिंदु:जगण्याची समृद्घ अडगळ''- वाचनाचा एक समृद्घ अनुभव

10.कोठडी:एक अधुरे शब्दशिल्प:स्वातंत्र्यवीर सावरकर -एक स्मरणांजली

11.अशोक नायगांवकरांची वाटेवरची कविता

12.नवपार्थ हृद्‌गत : गीतेचा नवआशयबोध

**प्रस्तावना**

आपल्या मनावर बाहय जगाच्या विभिन्न पैलूंचे, वेगवेगळ्या विचारधारांचे संस्कार करत स्वत:च्या भावविश्वाची सर्वांगानं जडणघडण करण्याचं सर्वश्रेष्ठ माध्यम म्हणजे वाचन! कोणा शिक्षकाकडून वा मार्गदर्शकाकडून फारतर एकदोन विषय समजून घेतले जाऊ शकतात, पण ग्रंथालयाच्या दारातून एकदा तनामनानं प्रवेश केला की मग असंख्य लेखक-कवींच्या अनुभवविश्वाशी आणि अभिव्यक्तीशी एकरूप होण्याचा विलक्षण प्रत्यय हा जणु एका वेगळ्याच पातळीवर स्वत:च्याच जगण्याचा साक्षात्कार असतो.

हौस म्हणून वाचन करणं वेगळं, मनोरंजन किंवा कालक्षेपासाठी काहीतरी वाचणं वेगळं, एखाद्या विषयाचं सांगोपांग अध्ययन करण्यासाठी वाचन करणं वेगळं.... आणि पुस्तकी किडा बनून हाती येईल ते पुस्तक पोखरणं वेगळं..!! या पुस्तकी किड्यांसाठी वाचन त्यांच्या श्वासात भिनलेलं असतं, रक्तात एकजीव होऊन त्यांच्या धमन्यातून सळसळत असतं, प्रसंगी खाल्लेल्या अन्नाला पचवणारा पाचकरस बनून जीवनदायी

ऊर्जेच्या रूपात यांच्या अस्तित्वाशी एकजीव झालेलं असतं. तसं पाहता असे वाचक दुर्लभच असतात. साऱ्या जगाशी भावनात्मक फारकत घेऊन सतत पुस्तकात डोकं खुपसून तहानभूक सुद्धा विसरणारांची जातकुळीच वेगळी असते. दिवसाकाठी शेपन्नास पानं उलटायला मिळाली नाहीत तर यांना समोर वाढलेलं पंचपक्वान्नांचं ताट सुद्धा बेचव लागत असावं. बहुधा असे पुस्तकी किडे कोणत्यातरी ग्रंथालयाच्या एखाद्या कोपऱ्यात पुतळा होऊन स्थिरावलेले आढळतात. अर्थात अशा वाचकांच्या भावनात्मक जाणीवेला जसा विविध लेखक-कवींच्या शब्दलालित्याचा व शैलींच्या वैविध्याचा मोरपंखी हळुवार स्पर्श झालेला असतो, तशीच यांची वैचारिक विश्लेषणाची क्षमता थोरामोठ्या विचारकांच्या तर्कनिष्ठ व अर्थपूर्ण पायावर रचलेली सुदृढ भित्तिका बनत जाते.

मला स्वत:ला वाचनाची बऱ्यापैकी आवड आहे. अनेक भाषांमधली विविध विषयांवरची पुस्तकं सवडीनुसार वाचत असतो. तरीही या पुस्तकी किड्यांच्या जमातीत सामील होण्याचं धाडस अद्याप तरी करू शकलो नाहीये. वर्षाभरापूर्वीच्या नेटवरच्या परिचयानन्तर अशा एका वल्लीची सहा महिन्यांपूर्वीच प्रत्यक्ष गाठ पडली... आणि चक्रावून गेलो. नेटवरच्या कवितासमूहांमध्ये मुक्तछन्दापासून वृत्तबद्धापर्यन्त वेगवेगळ्या काव्यशैली समर्थपणे हाताळणारी एक महिला या पुस्तकी किड्यांच्या जातकुळीची आहे, हे त्या आभासी परिचयाच्या दरम्यान लक्षात आलेलं असल्यानं पहिल्या प्रत्यक्ष भेटीच्या वेळी तसा साशंकच होतो. कारण किडा हा झाडपाल्यावरचा असो वा आधी म्हटल्याप्रमाणे पुस्तकी किडा असो, स्वत:ला आपल्या एका बन्दिस्त कोशात डांबून ठेवण्याची वाईट खोड यांना असते. पण तत्पूर्वी केवळ नेटवरचा आभासी परिचय असलेली सौ.भारती बिर्जे डिग्गीकर ही महिला समोर आली तेंव्हा मात्र माझ्यासाठी तो सुखद आश्चर्याचा धक्का होता...! कारण भारती भरभरून बोलताना मधेच खळखळून हसत होती, एखाद्या क्लिष्ट विषयावरचं आपलं गंभीर चिंतन मांडता-मांडता समोर वाढलेल्या खाद्यपदार्थांचं तितकंच समरसून रसास्वादन करत होती...! साहित्य आणि काव्याच्या बारकाव्यांचं विश्लेषण करताना मधेच विषयांतर करत एखादा व्यक्तिगत जिव्हाळ्याचा प्रसंग तितकाच फुलवून सांगत होती...!!

प्रस्तुत पुस्तकात संग्रहीत लेख वाचल्यावर भारतीच्या वाचनाचा चतुरस्र आवाका तर लक्षात येतोच, वाचलेल्या प्रत्येक पुस्तकाच्या अंतरंगात यथेच्छ डुंबून तिने त्यातून लेखकाच्या चिंतनशैलीतले विद्वत्ताप्रचुर आणि भावगर्भ मोती वेचलेले असतात, हे पाहताना थक्क व्हायला होतं. राहुल सांकृत्यायनांची "व्होल्गा ते गंगा" ही कादंबरी तिने नुसती वाचलेली नसते... लेखकाचं बोट धरून कथानकाच्या ओघात वर्णिलेल्या इतिहास-भूगोलातून तिने एक मानसिक प्रवासच केलेला असतो.... आणि तेंव्हाच त्या महापंडिताच्या लिखाणाबद्दल एक स्पष्ट दृष्टिकोण घेऊन भारती वाचकांसमोर उभी ठाकते. ती एकीकडे कविवर्य बोरकरांच्या निर्मितीप्रक्रियेचे धागेदोरे सहजपणे उलगडत जाते, तर दुसरीकडे कवि अनिलांच्या दशपदीमधील भावविश्वाचा तितक्याच प्रभावीपणे मागोवा घेताना दिसते. या संग्रहात प्रस्तुत लेख वाचताना लक्षात येतं की भारती आपल्या वाचनातून जशी रविन्द्रनाथांच्या "चोखेर बाली"मधले सूक्ष्म अर्थगर्भ बारकावे टिपत जाते तशीच ती कविवर्य मर्ढेकरांच्या कवितेत एकीकडे जाणवणारा सामाजिक विसंवादाविरुद्धचा उद्रेक आणि दुसरीकडे एक गूढ अगम्य श्रद्धास्थान मानलेल्या ईश्वराविषयीच्या निष्ठेतून उपजलेली आल्हाददायी आत्ममुग्धता या विलक्षण द्वन्द्वाने चक्रावून सोडणाऱ्या वाटेवर त्याच गतीने संचार करू शकते.

एकीकडे भारती अंदमानच्या कालकोठडीच्या अनन्वित छळासमोर सुद्धा अबाधित राहिलेल्या काव्यप्रतिभेच्या उन्मत्त नृत्याने नटलेल्या स्वातन्त्र्यवीर सावरकरांच्या शब्दसौष्ठवाचा आणि अर्थगाम्भीर्याचा माग घेताना रममाण होते तशीच ती नेमाड्यांच्या "हिंदू"च्या विस्तारलेल्या कथाप्रवाहाच्या ओघात जागोजागी जाणवलेल्या असम्बद्धतेच्या व वैचारिक मर्यादांच्या अडगळीवरही न चुकता नेमकं बोट ठेवते.

लक्षात घेण्याजोगी महत्त्वाची गोष्ट म्हणजे प्रत्येक पुस्तक हाताळताना भारती आपली साहित्यिक मूल्यांविषयीची व तरल काव्योन्मेषाची जाण पुरेपूर जागती ठेवत असली तरी आपल्या व्यक्तिगत आवडीनिवडी आणि पूर्वाग्रहांची भिंगं पूर्णपणे बाजूला ठेवून एक त्रयस्थ व तटस्थ वाचक बनते आणि त्या रचनाकाराच्या मनोभावांचा वेध घेत त्याच्या वैचारिक अंतरंगाचे सूक्ष्म पदर आपल्याच मनाशी उलगडत जाते. कोणा लेखकाचं वा कवीचं लिखाण वाचनीय असतं, हा तर सामान्य अनुभव आहे. पण आपण वाचलेल्या पुस्तकांवर लिहिलेले समीक्षात्मक निबंध हे सुद्धा लक्षणीय साहित्य

ठरतं, याचा एक नवा प्रत्यय भारतीच्या वाचनप्रवासाशी जवळीक साधताना वारंवार आल्यावाचून रहात नाही. वाचन हा केवळ कालक्षेपाचा छंद न उरता कोणाही व्यक्तीच्या वैचारिक प्रवासात वाचन हे कधी रस्त्याकडेच्या वृक्षाप्रमाणे श्रमपरिहाराचं साधन बनतं तर कधी जीवनाच्या विस्कळित पायावाटांवर धावताना तहान लागली असता विचारामृताचा एक शीतल घोट पाजत नवसंजीवनी देणारी पाणपोयी बनतं.... तर कधी जीवनाच्या प्रदीर्घ प्रवासाच्या अचूकतेच्या मापदंडांची स्थापना करत आपल्या दीर्घकालिक जीवनयात्रेचं उदात्त व उत्तम लक्ष्य समोर ठेवू शकतं...! वाचनसंस्कृतीच्या क्षेत्रात भारतीने आपल्या लिखाणाद्वारे एक मैलाचा दगड निर्माण केला आहे असं नक्कीच म्हणता येईल. तिच्या वाचनाच्या प्रवासात असेच नवनवे अनुभव लाभत राहोत आणि त्यांचा आपल्यासारख्या सामान्य वाचकांना स्फूर्तिदायक प्रत्यय येत राहो हीच मन:पूर्वक शुभकामना!

- स्वामीजी

(स्वामी निश्चलानन्द)

## वाचन आणि आपण

आज, जागतिक पुस्तकदिनी मनात येतंय की खरंच किती रटाळ झालं असतं जगणं या पुस्तकांशिवाय. आपलं स्वतःचंच जगणं जगण्याची सक्ती. तेही तसं रोमहर्षक असतं म्हणा, उनसावल्यांचं, सुखदु:खांचं, स्थित्यंतरांचं, संकटांचं संधींचं वगैरे वगैरे, पण आपल्यापुरतंच फक्त.

एखाद्याला (खरं तर प्रत्येकालाच) खूप भूक असते, एका जन्मात अनेक जगणी जगायची असतात, अनेक कथानकं भोगायची असतात; त्यातल्या थरारांसकट.

म्हणून तर पुस्तकं भेटतात आपल्याला. प्रतिभेचे अनंत रंग घेऊन पुढे सरकत रहातं जगण्याचं महाकथानक, कधी महाकाव्य..

त्या वाचनप्रवासाचा हा एक धावता आढावा..

सुरुवातीला चिमुकली पुस्तकं भेटली होती बालपणावर जादू करणाऱ्या जादुगारांसारखी.. ते बालपण टी. व्ही., सिनेमा अशा दृष्य माध्यमांपासून दूर होतं म्हणून काय झालं, मनाच्या रंगमंचावर किती पात्रं हजर होत होती.. पऱ्या, जादुगार, भीतीदायक राक्षस अन चेटकिणी, सोनेरी महाल अन अंधारी रानंवनं, बंदिस्त राजकन्या अन धीट वनकन्या, शूर राजपुत्र अन चतुर लाकुडतोडे यांचं रंगीबेरंगी जग पुस्तकांमधून उघडू मिटू लागलं होतं. मालती दांडेकर, भा. रा. भागवत, ना. धों. ताम्हनकर अशी कसदार मंडळी स्वनिर्मित साहित्याबरोबर अनुवादित बालसाहित्याचेही संस्कार करत होती. हॅन्स अँडर्सनच्या सुंदर वास्तवस्पर्शी परीकथांचे अनुवाद सुमती पायगावकरांनी केले होते. देशविदेशातील अनुवादित परीकथा, चार आण्यात मिळणाऱ्या अद्भुत कथा (यांचं सेकंडहँड मार्केट रद्दीवाल्याकडे होतं! नियमित खरेदीविक्री चाले उत्साही मुलांची!), इसापकथा, अरेबियन नाइट्स अन आपलं पंचतंत्र, पुराणकथा, रामायण, महाभारत, इंद्रजाल कॉमिक्स यांचे ते दिवस. कुमार, किशोर, चांदोबा व इतरही दर्जेदार बाल दिवाळी अंक आमच्या दसऱ्यादिवाळीच्या रोषणाईचा अविभाज्य भाग होता. ही वेडी सरमिसळलेली ऊर्जा केवढं जगण्याचं इंधन पुरवणार आहे याचं काहीच भान नव्हतं. खूप खेळून दमून विस्कटलेल्या ध्यानाने घरी यावं, खूप वाचून तृप्त व्हावं असे साधे आनंद होते. माझ्या एका अगदी लहानपणी लिहिलेल्या कवितेत रविवारचं माशांचं जेवण अन परीकथांचं वाचन आनंदाची परमावधी म्हणून आलेलं आहे..

घरातल्या काळोख्या माळ्यावर बाबांच्या जुन्या पुस्तकांचा खजिना होता. त्यात महाभारताचे खंड, अनेक सानुवाद संस्कृत नाटकं अन व्याकरणाचीही पुस्तकं होती. नवव्या दहाव्या वर्षापर्यंत या सगळ्यातील वाचनीयतेचा साक्षात्कार झाला मला, अन माळ्यावरच्या अंधारात खजिन्याच्या गुहेत शिरल्यासारखे वाटू लागले. वडिलांना हा पत्ता लागल्यावर त्यांनीही मग मूळ संस्कृत पान वाचून मग मराठी अनुवाद वाचायची

शिस्त लावली. आमच्या घरात इंग्लिश डिक्शनरीतले शब्द पाठ करण्यालाही बक्षीस होतं. दहा शब्दांना दहा पैसे वगैरे. नकळत भाषेची पायाभरणी होत होती. वाचना-संभाषणापुरता तरी इंग्रजीचा दबदबा वाटेनासा झाला मराठी माध्यम असून..

आठवी नववीत माझ्या वाचनवेडाला एक नवे परिमाण मिळाले.. कर्वेकाका हे ते परिमाण देणाऱ्याचं नाव. त्यांच्याकडे खूपसे रिडर्स डायजेस्टने संपादित-संकलित केलेल्या कादंबऱ्यांचे संच होते. अक्षरश: शेकडो क्लासिक कादंबऱ्यांचा रतीब त्यांनी माझ्यापर्यंत पोचवला एक सीनियर समानधर्मी म्हणून.. आता सगळी नावंही आठवत नाहीत. Good bye Mr. Chips, One flew over the cuckoo’s nest, To kill a mocking bird अशी काही नावं आठवतात. नव्या ताज्या झुळुकांनी भारलेली पश्चिमेची खिडकी माझ्या मराठी मनात उघडली गेली होती..

एकीकडे स्थानिक वाचनालयं पालथी घालणं चालू होतं.. पौगंडावस्थेतल्या वाढत्या भुकेला नारायण धारप, नाथमाधव, रत्नाकर मतकरींच्या भयकथा, त्या काळात रेलचेल असलेले ऐतिहासिक, प्रांतीय ललितलेखन खाद्य म्हणून मिळत होतं. अर्धवट वास्तव, अर्धवट फँटसी.. आमच्या वाढीच्या संक्रमणकाळातल्या त्या सुंदर पडछाया होत्या.

गो. नी. दांडेकर, श्री. ना. पेंडसे, बाबासाहेब पुरंदरे, रणजित देसाई, शिवाजी सावंत, ना. सं. इनामदार, किती नावे लिहावीत! मामा वरेरकरांनी अनुवादलेल्या बंगाली साहित्याची, त्यांच्या 'चरित्रहीन' 'श्रीकांत' मधल्या अभिजात जगाची गोडी लागू लागली. त्यातली स्त्रीपुरुषांचे वेगळेच भावबंध त्यातल्या रोमांचांसकट आम्ही अनुभवू लागलो होतो.

विनोदाचं समृद्ध दालन तर पु. ल. देशपांडे नावाच्या अवलियाने उघडून दिलं होतं अन कब्जाच केला घराचा. पु. लंचं घरात सामुहिक वाचन चालत असे. ओळीच्या ओळी पाठ असतानाही ही आवर्तनं चालू रहात. पी. जी. वुडहाउसची दीक्षाही पु. लंकडूनच मिळाली. पुढे अनेक तीव्र निराशांच्या कालखंडात मी मानसिक संतुलन साधण्याचं औषध म्हणून ज्या वुडहाउसकडे गेले. तो माझा ग्रँड ओल्ड मॅन. चिरतरुण मिश्कील रोमान्सचित्रे रेखाटणारा. याशिवाय Richmal Crompton या ब्रिटिश लेखकाने विल्यम नावाच्या एका गोड गुंड मुलाची व त्याच्या व्रात्य मित्रचौकडीची एक उचापतमालिका लिहिली होती जी माझ्या अगदी फारफार आवडीची होती. विनोदाचा हा निरागस वाण गंगाधर गाडगीळांच्या बंडू मालिकेत अन चिं. वि. जोशींच्या चिमणरावांच्या चित्रमय जगातही सापडत होता.

आता महाविद्यालयीन दिवस आले होते. मनाचा तरुण वैश्वानर उफाळू लागला होता. आता सुरू झालं सत्र आत्मचरित्रांचं, चरित्रांचं, इतिहासाच्या काळ्या, सोनेरी पानावर केलेल्या लिखाणांचं, आयुष्याचा अर्थ लावणाऱ्या तत्त्वदर्शनांचं. स्वदेशात महात्मा गांधी, नेहरु, टिळक, सावरकर, एकीकडे दुसऱ्या महायुद्धाच्या घुसळणीत झालेलं लेखन, चिंतन.. उत्कट मानवी प्रवृत्तींची ही सर्व राजरुपं होती. टिळकांचं गीतारहस्य हे एक अत्यंत वाचनीय पुस्तक आहे, अनेकांनी ते वाचलं नसेल. अरुण साधू, वि. स. वाळिंबे यांच्या थरारक लेखनातून चे गव्हेरा, फिडेल कास्ट्रो, हिटलर अशा भव्य व्यक्तिमत्वांचा, रशिया, चीन, विएटनाम जगाच्या पाठीवर घडणाऱ्या रक्तरंजित युद्धांचा क्रांतीचा परिचय होत होता.. मार्क्स, सार्त्र, कामू हे शब्द आमच्या तरुणपणातली फॅशन व पॅशनही होते. पण इथेही माझ्या स्वभावानुसार सार्त्रच्या तत्त्वज्ञानापेक्षा त्याची Men without Shadows, The admirable prostitute सारखी नाटकं (मनोमंचावरच पाहिलेली! म्हणून अधिक सूक्ष्मात अनुभवलेली!!), कामूचं आउट्सायडर सारखं फिक्शन मला जास्त भावलं, जिवाच्या जवळ येणारं वाटलं.

या काळात व्हिक्टोरियन अभिजाततेतून पोसलेल्या, महायुद्धाच्या अनुभवाने डहुळलेल्या अशा अनेक कादंबऱ्यांचं मनन वाचन झालं. जेन ऑस्टिन, शार्लट व एमिली ब्राँटे भगिनींच्या अविस्मरणीय रचना.

इ. एम्. फोर्स्टरच्या कादंबऱ्या. कॅलिडोस्कोप हलवला की बदलणाऱ्या आकृतीबंधांची आयुष्यचित्रं. 'पॅसेज टू इंडिया'मधल्या डॉ. अझिझ व प्रोफेसर फील्डिन्ग्जचे आगळेवेगळे स्नेहबंध,. आत दबलेले वांशिक तणाव, भयाचं, भासांचं सुप्त मनातलं जग. दीर्घकवितेसारखी खऱ्या रोमान्सचा शोध घेणारी 'अ रूम विथ अ व्ह्यू '.

'हॉवर्ड्स एंड' मधील हेलेन व मार्गरेट श्लेगेल या अभिरुचीसंपन्न भगिनींचं आयुष्यातल्या ताणतणावांतून, योगायोगांतून बदलत जाणारं नातं. या सगळ्यामागे छाया धरून असलेली 'हॉवर्ड्स एंड' ही आयुष्याइतकीच गूढ वास्तू. आर्थर कोस्लरच्या कोसळवून टाकणाऱ्या महायुद्धकालीन क्रौर्यातही सकारात्म शक्तीचा विजय चितारणाऱ्या, प्रातिभ शक्तीने ओतप्रोत भरलेल्या कादंबऱ्यांच्या- (थीव्हज इन द नाईट, अरायव्हल अँड डिपार्चर) -उल्लेखाशिवाय तत्कालीन वाचन-वसंतऋतू पूर्ण होणार नाही

पुढील आयुष्यात यातील अनेक क्लासिक्सची चित्रपट-रुपं पाहणं हा एक वेगळा शब्दातीत आनंद होता...

विराट रशियन उपखंडाच्या सावल्याही आता साहित्यातून जाणवू, लोभवू लागल्या होत्या. दोस्तोएव्हस्कीच्या कादंबऱ्यांनी माझ्या तरुणाईचं नैराश्य खोल आत्मिक आकांतापर्यंत पोचवलं. 'क्राइम अँड पनिशमेंट' चं वाचन म्हणजे एक अंगावर आलेलं दुखणं होतं.. दु:खविरेचनाचा पहिला अनुभव देणारं. तर 'ब्रदर्स कारमाझफ'मधून सामाजिक आणि व्यक्तिगत स्खलनकाळातही प्रकाशाची दिशा शोधणारी अल्योशाची निरागसताही टवटवीत राहिलेली दिसली. एका विलक्षण प्रगल्भ संस्कृतीतले ते महान प्रतिभावंत-दोस्तोएव्हस्की, टोलस्टॉय, चेकोव्ह, कितीतरी सोव्हिएत कवींच्या कवितांचे अनुवाद, गद्य-पद्याच्या सीमेवरचा बोरिस पास्तरनाकचा 'डॉ. झिवागो. '

रा. आ. पोद्दार कॉलेजचे रसिकाग्रणी प्राचार्य प्रभुराम जोशी माझ्या भाग्ययोगात होते. वाणिज्य कॉलेजात माझ्यातली कवयित्री जाणून माझ्यापर्यंत बोरकर, रेगेद्‌वय, कुसुमाग्रज, बापट, पाडगावकर-, इंदिरा संत, मर्ढेकर, करंदीकर, भट, ग्रेस यांचे उत्तमोत्तम मराठी कवितासंग्रह पोचवणारे. एक वेगळी आंतरयात्रा सुरु झाली होती, जी या लेखमर्यादेत येणार नाही, पण जिचा उल्लेख केलाच पाहिजे.

कवितेइतकंच तरल ललित व वैचारिक गद्‌य लिहिणाऱ्या महान मराठी लेखिका इरावती कर्वे, दुर्गा भागवत, मग गौरी देशपांडे, निर्मला देशपांडे, आशा बगे, सानिया वाचनात येत होत्या.. पुस्तकाच्या मधुर गुंगीत बुडून जावं असे ते दिवस. आणि ही गुंगी उडवणारं अस्वस्थ आक्रोशाचं दलित-कामगार साहित्यही.

. नामदेव ढसाळ, मल्लिका अमरशेख, दया पवार, नारायण सुर्वे, लक्ष्मण माने..

खरं तर कोणत्याही जातीवर्णभेदापलिकडचे, परंपरा आणि आधुनिकता या संघर्षमय द्‌वैताने ज्यांचे संज्ञारिंग व्यापून गेले होते ते मर्ढेकर, करंदीकर, दि. पु. चित्रे, गाडगीळ, कोलटकर, नेमाडे आता माझ्या मनोविश्वाचे नवे नायक होते, त्यांचं बोट धरून पंचविशीत आम्ही संतसाहित्याच्या गुंफेत उतरायला सुरुवात केली होती.. संत ज्ञानेश्वर, तुकाराम, रामदास, नामदेव, जना-मुक्ताबाई- माझ्या मराठी ओळखपत्राची खरी किंमत या अर्वाचीन-प्राचीनांच्या लेखनातून प्रथम कळली..

अगदी नेणतेपणापासून तिशी-चाळिशीपर्यंतच्या ललित लेखनाच्या वाचनप्रवासाचा (कारण त्यानंतर ते मंदावले) हा आढावा परिपूर्ण नाही. ठळक उल्लेख करतानाही काही त्रुटी राहिल्या असतील. पण हा एक आलेख आहे, एका प्रवासातले मुख्य मार्गबिंदू जोडणारा.

आता आज वाचनाचा पुनश्च हरि ॐ करताना, त्यासाठी आधी बेस्टसेलर्स कुतुहल म्हणून वाचताना त्यातलेही निखळपण लक्षात येते, भारतीय ललित-लेखकांमध्ये चेतन भगतचं चटपटीत लेखन, अरुंधती रॉयने उलगडलेले अस्वस्थ प्रांत, विक्रम सेठची दिपवून टाकणारी काव्यात्म तरल शैली, अलिकडे अमिशने घेतलेला शिवतत्त्वाचा शोध आजही कंपल्सिव्ह रीडिंग या वर्गवारीत येतील पण माध्यमांच्या गदारोळात, भयाकारी गतिमान जीवनशैलीत ते स्वस्थ सुंदर वाचनानंदाचे दिवस मधल्या काळात हरवलेत.

आज डोळ्यातल्या दमलेल्या ज्योती ऑफिसातल्या आकडेमोडीच्या, व्यावहारिक व्यावसायिक वाचनाच्या ताणानंतर एखाद्या चांगल्या पुस्तकापेक्षा अभिजात चित्रपट पहाण्यात, नेटवर भ्रमण्यात जास्त रमतात हे वास्तव जाणवत रहातं.

दु:ख, अपराधभावना या सगळ्याच्या पलिकडे असतो काळाचा महिमा.

तरीही आयुष्याच्या अन वाचनाच्या दुसऱ्या पर्वातही तोच देहभान हरपून टाकणारा आनंद निरनिराळ्या पुस्तकांच्या काहीशा अनियोजित अन विस्कळित वाचनातही नव्याने अनुभवला तेव्हा 'आतून आपण बदलत नसतो तर!' असा आशादायक प्रत्यय आला.

या विविध रसग्रहण-लेखांमध्ये तो असीम आनंद प्रतिबिंबित झाला आहे.

या आठवणींमधून, रसास्वादांमधून वेचक चांगली पुस्तके वाचत रहाण्याचा संकल्प माझ्याप्रमाणेच वाचनावर प्रेम करणाऱ्या, करू शकणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच्या मनात जागा व्हावा एवढीच इच्छा, त्यासाठीच हा 'अक्षरांचा श्रम केला '!!

इतिश्री!

**मेघना पेठेंच्या कविता**

"सिग्रेट अशी धुमारत, जळत जात होती आत..

फुफ्फुस जाळून, करडा धूर होऊन बाहेर पडत होती.

तो छोटासा लालचुटुक निखारा पुढे सरकता सरकताच

मागे जमत जाणारी राख

आणि राख सांडत, सांडत छोटी छोटी होत जाणारी सिग्रेट

तू, मी ही जगलो आहोत तिचा तीळ तीळ प्रवास

आपल्यातून झालेला.

धूर, राख ही काही अटळ अंशरुपं आहेत तिची

आणि तिचा अर्थ मात्र अंशरुपानंच का होईना

पण आपल्यात चिरंजीव झालेला आहे.''

सिग्रेट ओढणारी ही मुलगी कुठल्याकुठे घेऊन गेलीय त्या अनुभवाला. आजवर कोणी अशी सिग्रेट ओढलीच नसेल अशा स्तरावर. जीवनाचा असाच रसरसून अनुभव घेणाऱ्या या प्रतिभावतीचं नाव आहे मेघना पेठे.

मेघनांची कविता, जी त्यांनी प्रवासाच्या सुरुवातीलाच मागे सोडली, ती त्यांच्या जगण्यातल्या सत्यान्वेषाचा पहिला टप्पा आहे. त्यांचा हा पहिलावहिला प्रातिभ आवेश मुक्तःछंदातच व्यक्त होणे जणू क्रमप्राप्त आहे.

मेघना छंदोबद्ध कधीच लिहीत नाहीत तसेच मुक्तःछंदाची त्यांची शैलीही एकरस अशी आहे. पूर्ण संग्रहातून एक संथ हेलकावणारे दीर्घ स्वगत वाहत आहे.

म्हणून ही कविता मला ग्रीक कोरस किंवा शेक्सपीअरच्या स्वगतांचा परिणाम साधणारी वाटते. धीरगंभीर, सखोल, क्वचित सूक्ष्म उपहासाचा आश्रय करणारी अशी शैली. कवितेतली नाट्यमयता जपणारी.

"मेघनाच्या कविता''.. एक जुनी जीर्णशीर्ण पण कलात्मक वही आहे माझ्या हातात, मेघनाच्या हस्ताक्षरातल्या तीस कविता अन तिचं कवितेआधीचं मनोगत या वहीत सांडलंय. हा प्रकाशित संग्रह नसून''व्यक्तिगत वितरणासाठी" असल्यासारखा एक संग्रह आहे नेटका, देखणा, स्तिमित करणारा. मेघना पेठेंसारखाच.

या कवितांचा कालखंड १९७४-१९८५ असा आहे. माझ्याकडे हा बराच नंतर आला. आज खूप वर्षांनी हा हातात घेण्याचं कारण कविताप्रेमींना या प्रगल्भ लेखिकेच्या तुलनेने अप्रचलित राहिलेल्या कवितांचा परिचय करून देणे, इतकाच आहे.

मेघनांची कविता पारदर्शी, रोखठोक, विद्ध करणारी आहे. सुरुवातीच्या कवितांमधल्या कवी-उच्चारांमध्ये किशोरवयीन निरागसताही जाणवते. कारण कविता कवयित्रीबरोबरच वाढतेय. हा संग्रह प्रकाशित करतानाच मेघना कवितेचा निरोप घेताहेत असे आज अधिक प्रकर्षाने जाणवतेय. त्यांना गद्य ललितलेखनाची क्षितिजे खुणावत आहेत.

"विकासाच्या एखाद्या टप्प्यावर कात टाकून, झळाळत्या सोनेरी अंगाने पुढे सरकणारा साप. नेमकी हीच प्रतिमा कविता लिहून ठेवताना माझ्या डोळ्यासमोर आली आहे, येते.''

"खूप जवळच्या मित्राचा मृत्यू अटळ आहे हे उमजल्यावर काहीशा विचित्र हुरुपाने आपण मित्राशिवायही जगण्यास तयार होऊ लागतो. 'कवितेसाठी आपला जन्म नाही ' हे स्वतःशीच मान्य करत असताना मला तसेच वाटते आहे..''

कविता या मुख्यत्वे भाष्य म्हणून सुचतात असे म्हणणाऱ्या मेघनांनी प्रस्तावनेत लिहिलेली ही काही वाक्ये त्यांचा कविताविषयक दृष्टिकोन दर्शवतात. कविता ही जणू जीवनानुभवाची 'टाकलेली कात' आहे, सोनेरी, झळाळती, पण चेतनाहीन. भूतकाळाचा अवशेष अशी. कवितेतून वर्तमान मांडत असतानाच तो वर्तमान भूतकाळात जमा होतो. कवितेच्या अवकाशात एक भाष्य होऊन शिल्लक रहातो. कविता ही एका अशा खूप

जवळच्या मित्रासारखी आहे, ज्याचा मृत्यू अटळ आहे. या वियोगाची मानसिक तयारी कवयित्रीने चालवली आहे.

कवितेबद्दलचा हा पवित्रा मेघनांना कवितेपासून दूर नेतो अन आपण वाचकही एका समृद्ध काव्यानुभवाला सामोरे जाताजाताच त्याच्या अकालवियोगाची खूणगाठ मनाशी बांधून घेतो.

हा काव्यानुभव एका विकसित स्त्रीमनाचा हुंकार आहे. ही स्त्रीत्वाची जोखीम निभावणे सोपे नाही. कवयित्रीने काळाच्या पुढे राहून ती ओळखली आहे, बंडखोरीने व्यक्त केली आहे. या बंडखोरीच्या आड, आत, ती फक्त एक उत्कट व्यक्ती आहे. बंडखोरीची किंमत मोजताना एकटी पडलेली. हे एकटेपण व्यक्त होऊ शकते एखाद्या जिवाभावाच्या मित्राकडे. मित्राच्या प्रतिमेत वडील अन प्रियकर या दोन आग्रही भूमिका सरमिसळून सौम्य होतात.

"मित्रा,

आज तुझी आठवण आली आहे.

एका अपार व्यर्थतेचं फुलपाखरू होऊन आली आहे.

त्याचीच आहे सगळी बाग

ते कधी इथे भिरभिरते, कधी तिथे स्थिरावते आहे

माझ्या अंतिम हिताच्या दृष्टीने सारे मध वाळू देत आहे.

..........................................................................................

मित्रा,

नंतरही मी एकटीच आहे: आधीसारखीच.

आणि तशीच भर दुपारी

ताडाच्या झाडाखाली दूध पीत आहे.

फक्तः

आज तुझी आठवण आली आहे

आणि मग खूप आठवणी येत आहेत..''

हे ताडाच्या झाडाखाली दूध पिणं, म्हणजे संकेतांना धक्का देण्यासाठी बंडखोरी करणं. पुनः ती करताना स्वत्वाची शुद्धता जपणं. हा पवित्रा मेघनाच्या व्यक्तिमत्वाचा एक अविभाज्य भाग आहे.

सतत पुढे, पुढे, पुढच्या, उद्याच्या विचारात गुरफटलेल्या, कवितेतही गुंतून न पडणाऱ्या या महानगरीय अस्वस्थ कवयित्रीचे लग्न लागले आहे ते 'उद्या'शीच.

"या उद्याशी लग्न लागले आहे

अन रोजच लागते.

रोज अपरिहार्यतेचे चुडे भरून

आणि नाइलाजाची हळद लावून

बोहल्यावर उभे राहायचे अन उद्याचे व्हायचे.

अनिर्बंधाच्या माहेरीचा पारिजात मला हसतो..''

पण"'अनिर्बंधाचे माहेर" आता 'कवितेसारखेच दुरावू लागले आहे. तशी वादळे गोळा होऊ लागलीत वाढत्या वयाच्या क्षितिजावर. 'वडील' ही प्रतिमा या वयात एका मनस्वी स्त्रीसाठी खूप महत्त्वाची आहे. कारण तोपर्यंतच्या आयुष्यातले ते सर्वात उत्कट प्रेम आहे, त्या प्रेमाचा तिच्यावर प्रभाव आहे. वडिलांनी आपल्या कल्पनेप्रमाणे लाडक्या लेकीवर संस्कार केलेत, आपल्याला भावलेले अर्थ तिला दिलेत. वडिलांची प्रतिमा मेघनाच्या कवितांमध्ये जागजागी येणे अपरिहार्य आहे. एकदा ही प्रतिमा वादळांच्या संदर्भात येते-

हे वादळांनो,

असे अधीर होऊ नका वडिलांसारखे

मी वाढण्याची वाट बघताना;

वेळखाऊ असते हे जमीन शोषत जाणे.."'

एका संवेदनशील युवतीच्या आयुष्यातलं सगळ्यात मोठं संक्रमण, तिने वयात येणं, निसर्गसिद्ध आकर्षणांना प्रतिसाद देताना अनिर्बंधाच्या माहेरी पारिजातासारख्या फुललेल्या निरागस प्रेरणांना विसरून जाणं, दुय्यम ठरवणं अन नवीनच कुणाच्या तरी वेगळ्या अपेक्षांच्या चौकटीत स्वतःला बांधून घेणं.

या संक्रमणात सगळ्यात आधी दुखावले जातात ते वडील.. त्यांनी घडवलेलं लेकीचं व्यक्तिमत्व बदलत असतं म्हणून नाही, तर ते व्यक्तिमत्व सोप्या सुखाच्या वाटा तुडवण्यासाठी स्वतःला बदलण्याचे अधिकार दुसऱ्याला बहाल करतं म्हणून.. मेघना हे सर्व जगून त्यापलिकडे जातात. एका त्रयस्थाच्या भूमिकेतून ही प्रक्रिया नोंदवतात.

समुद्रावरच्या एका अप्रतिम कवितेत वडील समुद्राच्या प्रतिमेत मिसळून जातात..

"संध्याकाळपर्यंत

किंग लिअरसारखा

आक्रस्ताळ्या अनावर प्रक्षोभाचं मुक्त प्रदर्शन मांडणारा होता समुद्र.

विश्वासघात झाल्यासारखा.

नंतर कधीतरी खोल डोळ्यांसारखा आत गेला,

अथांग होत होत..

तू हातात हात देऊन तुझ्या सख्याच्या

पेट्रोमॅक्सच्या प्रकाशात समुद्राच्या मर्यादा तुडवीत चालली होतीस

कधी प्रश्नच न पडल्यासारखी.

एखाद्या पाळीव पोमेरियनसारखी. मुकाट, तुरुतुरू, स्वच्छ, स्मार्ट.

आणि त्याने पाहिले तू सुखाला बळी जाताना.

म्हाताऱ्या बापासारखा समुद्र चटकन घायाळ होतो हल्ली.

त्याच्या रुसव्याची पर्वा असण्याचे तुझे वय नाही.''

इथे समुद्राला वडिलांची प्रकट उपमा आहे. दुसऱ्याही एका कवितेत (कवितांना अनुक्रमणेपुरतीच शीर्षके आहेत) अधिक गहिरा समुद्र अप्रकटपणे वडिलांचीच भूमिका निभावतो आहे..

"अस्मि अस्मि म्हणत हा समुद्र आपल्याला वेढत जातो आहे.

आणि उदास हसून म्हणतो आहे : तुझी तू;

म्हणून तू म्हणशील तसेच!"

हे स्वत;ला सतत जोखत रहाणं समंजसपणा वाढवणारं आहे.. तेच संबंधांबाबतही. प्रेम, विरह या सगळ्याच अनुभवांना प्रश्न विचारत त्यातलं सत्य जाणून घेण्याचा प्रयत्न करताना त्यातलं मिथक हळुहळू विरून जातं..

"हे असं अवाढव्य दालन-

लक्षवेधी असं एकच थोरलं झुंबर-छताच्या मधोमध

ते खळदिशी फुटून काचांचे सर्वदिश पसरलेले तुकडे

त्यावर नाचणारी व्याकूळ मीनाकुमारी

धनुष्य ताणून- भूतकाळ पणाला लावलेली

शुभ्र गादीवर झिरपत जाणारे रक्ताळलेले पाउलठसे

आणि डोळे: प्रश्न आणि उत्तर झालेले

कितीतरी विश्रब्ध प्रेमांना

असं संस्मरणीय पेश होता येणार नाही: घुंगराशिवायचं नाचताना.

.......................................................................................................

कधी काळी व्याकूळ हेलावलेले थरथरते झोपाळे

कुरकुरत शांत होत आहेत.

जांभयाच जांभया येत आहेत आपल्याला

कुठल्यातरी निवलेल्या, कोमट आठवणींनी.

आपण झपाझप चालू लागलो तर

त्या कधीकालीन उकळत्या रसायनांची स्फटीके

खडखडखडखड वाजतील आपल्यातच.

काळाचे हे क्रूर विभ्रम

किती बिनशर्त मान्य आहेत आपल्याला.

एखाद्या थिएटरमधून बाहेर पडावे

तसे आपणच बाहेर पडलो आहोत तरः आपल्यातून.''

मेघनांच्या कवितेतून त्यांनी प्रथमपुरुषी एकवचनासाठी केलेला 'आपण' चा लिंगनिरपेक्ष वापर लक्षणीय आहे हेही येथे सहजपणे जाणवतेय..

- अन तरीही, प्रेमाचा, विरहाचा, संबंधांचा अनुभव घेणारी ही सजग व्यक्ती आपले स्त्रीत्व, त्यातले तणाव टाळू शकत नाही. पुनः समुद्राबद्दलच (आता इथे समुद्र म्हणजे जणू पुरुषप्रधान व्यवस्थेचं प्रतीक झालाय!) बोलताना आपल्या एकेकालीन सख्याला ती सांगते,

"समुद्राने वेढलेल्या एका कोरीव शिसवी कातळावर

साध्या पापणीने समुद्र खेळवीत मी ताठ उभी असेन.

एक प्रमत्त स्त्री : जिचा निरंकुश पदर पश्चिम वाऱ्यावर झुळझुळत आहे

आणि आपल्या प्रत्येक गात्रावर मात्र जिने अंकुश टेकला आहे

जी जाणते मीलनांची मर्यादित सुखं

आणि विरहांची अमर्याद हास्यास्पदता!

अर्थघन असे हे सुंदर शब्द लिहिताना आताही माझ्या अंगावर शहारा आला आहे. या सर्वांपलिकडे उभ्या असलेल्या मृत्यूचे सातत्याने भान राखणारी कवयित्री जीवनाचा शोध घेताना दमून जाते..

"आपण काय शोधत आहोत आणि आपण काय शोधायचे आहे

याचाही शोध लागेना युगानुयुगे

पण मृत्यूंवर मृत्यू साहूनही

श्वास उच्छ्वासातून काहीतरी ठेचकाळत राहिले आहे.

एखाद्या पूर्ण परदेश्याने आपल्याकडे पाहून ओळखीचे हसावे तसे.

आणि इच्छांच्या आठवणींनी डोळे भरून येत आहेत.''

मेघनांची कविता ही अशी आहे. जाणवत्या जाणिवेची प्रगल्भ कविता. जीवनावर प्रेम, मृत्यूबद्दल विस्मययुक्त आस्था. पण स्व-भावानुसारच ही कविता नेणिवेपर्यंत उतरत नाही. कदाचित म्हणूनच नेणिवेतून प्रकटणारे पद्याचे कमनीय आकृतीबंध तिला परके आहेत आणि कदाचित म्हणूनच एकूणच कवितेपेक्षा या प्रतिभावतीला ललितलेखनाचे आकर्षण जास्त वाटले असावे..

ते काहीही असो. मोहात पाडणारी ही कविता प्रत्येकाला/प्रत्येकीला आपली वाटावी अशी निखळ नितळ आहे.

"सकाळभर घोटाळते पायापायात कुठेकुठे मांजर

मग कुणीतरी कानाकोपऱ्यात आपल्यासाठी काढलेला दहीभात

लप् लप् लप् लप् गिळते.

डोळे मिटूनही मधूनच कणाभर शहारते.

तरीही लप् लप् लप् लप्...

......................................................................................

... कधी अशाच वेळी

आठवत असेल का मांजराला : लहानपण,

आणि त्या सर्वच तारखा, जेव्हा पहिल्यांदा दुखवले होते,

पहिल्यांदा दुखावलो होतो..

पहिल्यांदा छाटले होते स्वत:ला -नंतर पालवण्याकरिता..

आणि रेषेरेषेने बदलत गेलेले चेहरे : हळुहळू बोलेनासे झालेले.

आणि मग मनात घट्ट हेतू धरून वर्षानुवर्षे साचलेल्या शांतता.''

- स्वतःच्या निबरत जाणाऱ्या जाणिवांचेही प्रामाणिक चित्रण मांजराच्या प्रतिमेतून करणाऱ्या या कवितेपाशी मी लेखनसीमा करते, कवयित्रीला एक नि:शब्द सलाम करूनच.

## राहुल सांकृत्यायन- वोल्गा ते गंगा -पांडित्यातील प्रतिभा

आधुनिक, स्वतंत्र भारताचा महापंडित होता तरी कसा?

देशाला स्वातंत्र्य मिळवून देणारे अनेक स्वातंत्र्यसेनानी आपापल्या परीने अन प्रतिभेने महापंडितच होते असे म्हणावे लागेल, पण त्यांचे अग्रक्रम वेगळे होते. या अशा नक्षत्रसमूहात केवळ पांडित्यमय प्रतिभेच्या तेजाने तळपणारा एक तारा उदयास आला, देशाला विस्मित करणारा अभ्यासाचा अन नवनिर्मितीचा पसारा उजळवून विस्मृतीच्या अंधारात लोपलाही. राहुल सांकृत्यायन. त्याच्या ग्रंथसंपदेतील एक अद्भुत निर्मिती- 'वोल्गा से गंगा '(व्यं. श. वकील यांनी केलेला व लोकवाङमय गृहाने

प्रकाशित केलेला 'वोल्गा ते गंगा ' हा अनुवाद खरे तर, त्यातील विस्तृत लेखक परिचयासह) वाचनात आली. तिचे शब्द-जागरण पुनः करावेसे वाटले.

तर अल्पपरिचय. ज्या व्यक्तितत्वाची कार्यकक्षाच अफाट त्याचा अल्पपरिचय करून देणे कर्मकठीण!

राहुलजींचा जन्म १८९३, जिल्हा आझमगड, उत्तर प्रदेश. मूळ नाव केदारनाथ पांडे. पुढे बौद्धधम्माच्या स्वीकारानंतर राहुल (बुद्धाचा पुत्र) सांकृत्यायन हे नाव त्यांनी स्वीकारले. घरातून अमर्याद ज्ञानाच्या ओढीने पळून गेलेल्या या मुलाने दुकानात किरकोळ नोकऱ्या करत प्रथम अनेक वेदांत्यांबरोबर ओळख वाढवून संस्कृत व्याकरण व काव्याचे अध्ययन केले व आयुष्याच्या अखंड ज्ञानयज्ञाचा आरंभ केला. १९१२ मध्ये अवघ्या विशीत हा कुशाग्र बुद्धीचा मुलगा वैष्णव साधू झाला इतकेच नाही तर बिहारमधील एका मठाच्या महंतांच्या मर्जीतील पट्टशिष्य व भावी मठाधिपती म्हणून ओळखला जाऊ लागला.

पण राहुलजींच्या रसायनात सत्यान्वेषी वृत्तीतून पोसली गेलेली स्फोटक द्रव्ये ठासून भरली गेली होती. मठाधिपती म्हणून या मुलाचे आयुष्य जायचे नव्हते. मठाच्या जमीनदारीतून मठाचे व शेतकऱ्यांचे नेहमी खटके उडत. कायदा जमीनदारांना (येथे मठाला)अनुकूल. पण राहुलजी मठाचा कार्यभार सांभाळताना शेतकऱ्यांची बाजू घेत.. मठाच्या कार्यासाठी मुक्तपणे भारत भ्रमण करताना राहुलजी आग्र्याला आर्य समाजाच्या संपर्कात आले. त्यांच्या सश्रद्ध पण बुद्धीनिष्ठ पिंडाला आर्यसमाजी कर्मकांडमुक्त विचार मानवले. ते आर्यसमाजी झाले. आता आर्यसमाजाच्या प्रचारमोहिमेचा भाग म्हणून त्यांनी इस्लामचा व अरबी भाषेचा अभ्यास केला! याच काळात ते जहाल क्रांतीकारकांकडे आकृष्ट झाले. लोकमान्यांबद्दल, राजकीय प्रवाहातील

जहाल विचांराबद्दल त्यांना फार प्रेम वाटत होते. या वेळपावेतो वयाची अवघी पंचविशीच आली होती.

आयुष्याच्या प्रवाहाला येथून पुढे अजूनही वेगळी वळणे मिळायची होती. १९१७-१८ मध्ये रशियन क्रांतीच्या बातम्या हिंदी भाषिक राहुलजींपर्यंत पोचल्या. कुठल्याही प्रकारच्या गुलामगिरी व शोषणाचा मनापासून तिरस्कार करणारे राहुलजी या नव्या जगाच्या कल्पनेनेच थरारून गेले. १९२४ मध्ये 'बाईसवी सदी' ही सुंदर कल्पनारंजनात्मक कादंबरी त्यांनी 'विश्वबंधू' या नालंदा विद्यालयातील अध्यापकाला केंद्रस्थानी ठेवून लिहिली.. हा १९१४ मध्ये झोपतो व २११४ मध्ये जागा होऊन समाजातले क्रांतीकारी बदल पहातो अशी 'रिप व्हॅन विंकल' वर आधारित स्वप्नकथा होती ही.

हे स्वप्न पहाणारे मन तरुण होते, बुद्धीमत्ता, प्रज्ञा अन देशभक्तीचे अंगार त्यातून उडत होते. त्यातच आत्मशोधाची सततची तळमळ होती. त्यांच्या पहिल्या कथानायकाच्या नावातले विश्वबंधुत्व वृत्तीत अगदी भिनून गेले होते. एकीकडे अखंड भारत व नेपाळही पिंजून काढताना राहुलजींचा परिचय बौद्धधम्माशी झाला. त्याच वेळी वेदांताचा अभ्यासही दक्षिणप्रवासात चालला होता. मनात मोठे मंथन चालू होते. या वेळपर्यंत देशाच्या राजकारणात असहकारितेच्या चळवळीने मूळ पकडले होते. जहालमतवादी राहुलजींना गांधीजींच्या विचाराचे आकर्षण नसले तरी गांधीजींनी केलेल्या जनजागरणाचे मात्र होते. ते त्यात सामील झाले व सहा महिन्यांसाठी कारावासात गेले. तेथून सुटल्यावर शेतकऱ्यांचे संघटन करत बिहारमधल्या खेडोपाडी शेतकऱ्यांशी भोजपुरी भाषेत बोलत हा ज्ञानयोगी फिरू लागला. पूर्वी मठात झालेला शेतकऱ्यांचा जनसंपर्क असा कामी आला. केवळ भाषण नाही तर पूर, प्लेग आदि संकटसमयी सेवा असा कार्यक्रम होता. यातच कॉंग्रेस कमिटीचे सभासद म्हणून केलेल्या एका जहाल भाषणासाठी त्यांना दोन वर्षांचा कारावासही झाला. कारावासात

अनेक हिंदी कादंबऱ्यांचे लेखन, भास्कराचार्य व युरोपियन गणितज्ञांचा, उच्च गणितशास्त्राचा व खगोलशास्त्राचा अभ्यास त्यांनी केला.

पुनः पायावर चक्र. पंजाब, सरहद्द प्रांत, काश्मीर, तिबेट, लंका. लंकेत संस्कृत भाषेचे प्राध्यापक म्हणून गेलेल्या राहुलजींनी पाली व पुढे संशोधनांती तिबेटी भाषेचे अध्ययन केले. १९२९मध्ये तिबेटमध्ये अत्यंत खडतर परिस्थितीत चोरटा प्रवेश मिळवून त्यांनी १५ महिने काढले व त्यावर 'तिब्बत मे सवा वर्ष' हे पुस्तक लिहिले. बावीस खेचरांवर लादून त्यांनी आपले तेथले संशोधन भारतात परत आणले व पाटणा म्यूझियमला देऊन टाकले! पुन; लंका. वर्ष १९३०. या वेळी राहुलजींनी बौद्ध धम्माची दीक्षा घेतली. एकीकडे बौद्धमत, एकीकडे साम्यवाद! राहुलजींचे तळमळणारे मन या दोन्ही विचारधारांनी दोन वेगळ्या पातळ्यांवर -आत्मशोध अन सामाजिक न्यायाचा शोध- शेवटपर्यंत भारले गेले, त्यात स्थिरावले. एकीकडे राजकारणातले गुप्त कार्य चालू होतेच.

यातच यूरप यात्रा झाली, अनेक पश्चिमी विद्वानांचा सहवास त्यांना लाभला, तसेच त्यांचा सहवास युरोपीय व जर्मन विचारवंतांना लाभला. प्रो. सिल्वा लेव्ही हे इंडोलॉजिस्ट, डॉ. श्चेर्बात्स्की, डॉ. वोस्त्रोकोवसारखी बुद्धधर्माचे अभ्यासक त्यांच्या बौद्धग्रंथांच्या मूलभूत संशोधनाने दिपून गेले होते. १९३५ मध्ये जपान, कोरिया, मांचूरिया, चीन व शेवटी त्यांना नेहमीच असलेला प्रिय सोविएत रशिया असा दौरा करून पंडितजी इराणमार्गे भारतात आले. त्यानंतर पुनश्च तिबेट. तेथून परतल्यावर १९४० मध्ये भारतीय किसान काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून काम करताना अडीच वर्षांचा कारावास भोगला. या कारावासातच (-१९४०-४२-)'वोल्गा ते गंगा 'व अन्य पाच पुस्तके (ज्यात चार खंडातील एका ज्ञानकोशाचा समावेश आहे) राहुलजींनी लिहिली. याच कारावासात ते साम्यवादी नेत्यांच्या विशेष संपर्कात आले व पुढे कम्युनिस्ट पक्षाचे सदस्य झाले.

राहुलजींची जीवन व ज्ञानयात्रा पुढेही याच ऊर्जेने १९५९ पर्यंत अव्याहत चालू राहिली. शेवटच्या काही मोजक्या वर्षांत ते झपाट्याने थकत गेले, १९६२ मध्ये त्यांनी देह ठेवला. एक ज्ञानवादळ शमले.

त्यांची एकूण ग्रंथसंपदा सुमारे १२५, पृष्ठसंख्या सुमारे ४४००० (याअंतर्गत कादंबऱ्या, अनुवाद, चरित्रे, कोश, प्रवासवर्णने, धर्म, राजकारण, साम्यवाद तत्त्वज्ञान, साहित्य, इतिहास, संस्कृत व तिबेटी भाषा व व्याकरण आणि विश्वरचना असे बहुआयामी विषय, व संस्कृतात ताडपत्रीवर लिहिलेली तत्त्वज्ञान व धर्मावरील आठ पुस्तके येतात!!)!

त्यांना इंग्लिश, फ्रेंच, रशियन, जर्मन, चिनी, पर्शियन, अरबी व तिबेटी भाषा उत्तम येत, भारतीय भाषांमध्ये बंगाली, गुजराथी, मराठी ग्रंथ ते वाचू शकत होते्. मातृभाषा हिंदीच्या ३३ बोलीभाषांचा त्यांनी तौलनिक अभ्यास केला होता.

त्यांचा परिचय मराठीत श्री शं. वा. देशपांडे व इंग्लिशमध्ये श्री आर्. एम्. शर्मा यांच्या लेखनात आला आहे.

हा अल्पपरिचय येथे संपवून 'वोल्गा ते गंगा 'या आगळ्यावेगळ्या कथासंग्रहाकडे आपण आता येतो आहोत. या कथासंग्रहाचे वैशिष्ट्य असे की ख्रिस्तपूर्व ६००० ते इ. स. १९२२ पर्यंतच्या हिंदी-युरोपीय मानववंशांच्या राहणीमानांचे कथारूप यथार्थ चित्रण १९ कथांमधून अवघ्या २७५ पानांत लेखकाने केले आहे. जवळजवळ आठ सहस्त्रकांच्या या माणसांच्या महायात्रेच्या व्यामिश्र प्रगतीची सर्व अंगे, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक- त्यात लेखकाने एखाद्या संशोधकाच्या अलिप्ततेने (जे लेखक स्वत: आहेच)

केले आहे. त्याच वेळी हे चित्रण ललितलेखकाला साजेशा अनलंकृत पण धीट अन स्पष्ट शैलीने काळाच्या कितीतरी पुढे जाऊन केले आहे व या लेखनाचा डौल वाढवला आहे.

कथा एकूण १९ आहेत हे आलेच, प्रत्येक कथेत एक केंद्रवर्ती व्यक्तिरेखा आहे. काळाचा अन भूभागाचा जो आव्हानात्मक पट पंडितजींच्या समोर आहे तो पहाता प्रत्येक कथा एक-एका प्रसंगापेक्षा या व्यक्तीकेंद्राचे चित्रण, विकसन व त्याच वेळी भोवतालात घडणाऱ्या घटनांशी कधी समन्वय, कधी विरोध साधत झालेला त्याचा/तिचा जीवनप्रवास यावर आधारलेली आहे.

त्यांतील सत्यांशांचे समीक्षण मानव-वंशाचे अभ्यासक जास्त चांगल्या पद्धतीने करू शकतील, एक सामान्य वाचक म्हणून मी इतकेच म्हणेन की ही संकल्पना पंडितजींनी थरारक प्रकारे राबवली आहे. जे अभ्यासक-संशोधक नाहीत, सामान्य पण चोखंदळ वाचक आहेत, त्यांना आपल्या अस्तित्वाचे धागे-दोरे कुठून कुठे विस्तारले आहेत याची जाण या वाचनाने येईल, त्यांचे जाणीव-विश्व समृद्ध होऊन बदलेल व आपल्या अज्ञानावर आधारित पूर्वग्रह-दुराग्रहांवर त्यांना फेरविचार करावासा वाटेल इतका परिणाम या लेखनातून लेखकाने निश्चित साधला आहे व हे यश फार मोठे आहे.

कथाविषय झालेल्या व्यक्ती स्त्री आहेत किंवा पुरुष. वानगीदाखल 'निशा' या पहिल्याच कथेतील नायिका निशा (इ. स. पूर्व ६००० वर्षे, वोल्गाकाठचा वरचा प्रदेश, जाती हिंदी-युरोपियन) गुहांमधून रहाणाऱ्या स्त्रीसत्ताक आद्य टोळ्यांपैकी एका टोळीची-परिवाराची प्रमुख आहे. आद्य-अश्म हत्यारे वापरणारे, शिकारीवर जगणारे, बर्फाच्छादित सूचीपर्ण वृक्षांच्या प्रदेशातील हिवाळ्यात कसेबसे तग धरणारे, थंडीपासून बचाव म्हणूनच केवळ चामड्यांची वस्त्रे धारण करून अन्यथा दिगंबर असणारे समूह

आपल्या डोळ्यांसमोर तरळतात. स्त्री ही परिवाराचे पोषण व प्रत्यक्ष संवर्धनही मुलांना जन्म देऊन करते. जवळजवळ पशूपातळीवर व मुक्त संबंधात रहाणाऱ्या या टोळ्यांमध्ये सत्तासंघर्ष आहेच, त्याला आधुनिक नैतिक विधीनिषेध नाहीत (तसेही सत्तासंघर्षाला ते नसताताच). इथे आई (कथानायिका निशा) तिचीच मुलगी रोचना आपल्यापासून सत्ता हिरावून घेईल म्हणून असुरक्षित वाटून तिच्या घाताचा प्रयत्न करते व त्यात स्वतःच मारली जाते.

यापुढील 'दिवा (इ. स. पूर्व ३५००, मध्य वोल्गा तट, जाती हिंदी-स्लाव) कथा निशाचाच २५०० वर्षांनंतरचा उत्तरकाळ घेऊन रंगवली आहे. अजूनही स्त्रीसत्ताच आहे, येथेही स्त्रीसत्तेतही क्रौर्याला, विकारवशतेला सीमा नाही, सत्तासंघर्षात अटळपणे येणाऱ्या त्या आदिम दुष्प्रवृत्ती आहेत हे त्यात रंगवले आहे. मनुष्यांच्या राहणीमानात सुधारणा आहे, जनस्थाने व त्यांचे अंतर्गत नियम तयार होत आहेत. या दोन्ही कथांमध्ये संवादसाधन भाषेचा वापर मात्र आहे, त्यावर राहुलजींनी काही भाष्य केले नाही किंवा भाषाविकसनाची मीमांसा केलेली नाही ही मला एक महत्त्वाची त्रुटी वाटली.

तिसरी कथा 'अमृताश्व' ही मध्य आशिया, पामीर (उत्तर कुरु) येथे घडते. जाती हिंदी -इराणी, इ. स. पूर्व ३००० वर्षे. जनपदांमध्ये पुरुषसत्ता, बहुपत्नीप्रथा, स्त्रियांना गुलाम बनवण्याची कुठेकुठे सुरुवात झाली असली तरी अजूनही कैक समूहांमध्ये स्त्रिया समान, शक्तीमान, निर्भर आहेत. समाजाला विवाहबंधनात मुक्तसंबंध मान्य आहेत. ग्रामांच्या पाणी, रस्ते आदि सार्वजनिक कामांची सूत्रे महानायक-महापितर हलवतात. वांशिक टोळ्यांमध्ये उग्र युद्धे सततची, त्यात स्त्रिया अजूनही भाग घेतात. अमृताश्व हा कौरवांचा महापितर आहे, वृत्तीने उदार व समानतावादी आहे. पुरुंचा संहार करून तो कुरुंचे वर्चस्व स्थापतो.

चौथी कथा 'पुरुहूत' ताजिकिस्तानात हिंदी इराणी वंशात इ. स. पूर्वी २५०० वर्षे घडते. एका भटक्या तरुण तरुणीच्या भेटीतून निसर्गाच्या कुशीत कथा उलगडते. परिचय वाढतो. मधुर बासरीवादन, संगीताच्या आस्वादात हरवणे, मनातले आर्त व्यक्त करणे आता अधिक विकसित होत आहे. मेंढपाळीचा पशुपालनाचा व्यवसाय रूढ झाला आहे. सात हजार फूट उंचीच्या पर्वतप्रदेशात करणारे मद्र-जन तांब्याशी, सोन्याशी, लोखंडाशी परिचित होत आहेत. शस्त्रनिर्मिती, शस्त्रस्पर्धा, वाणिज्य वाढते आहे कृषिसंस्कृती नांगराच्या फाळांबरोबर उदयास येत आहे. या बदलांमुळे वृद्ध बेचैन आहेत, त्यांना हे सर्व अधर्माचे वाटते. मेंढपाळी करत नव्या गवतांच्या भूमीकडे सरकत जाणे शिकार व पशुपालनावर, जंगलातली फळे, तृणधान्ये खाऊन रहाणे यापलिकडचे नवे जगणे माणूस चाचपून पहात आहे. अश्मयुगाचा अस्त होत आहे.

पाचवी कथा 'पुरुधान', देश वरचा स्वात, जाती हिंदी -आर्य काल इ. स. पूर्व २००० वर्षे. पुरुधान हा एक आर्य नागरिक आहे पण व्यापारी तांड्याचे नेतृत्व करणारा. कपाशीच्या वस्त्रांचा वापर सुरू झाला आहे. इंद्रदेवाला खुष ठेवण्यासाठी यज्ञाचं आयोजन आहे, समारंभाचं वातावरण आहे. स्त्रियांच्या अलंकारांचे, वस्त्राभूषणांचे तपशीलवार वर्णन लेखक करतो. मांसाशन, मद्यपान व सणापुरते अनिर्बंध जीवन समाजाला मान्य आहे. पुरुधान पिवळ्या केसांचा व निळ्या डोळ्यांचा आर्य, व्यापारामुळे तो चतुर असुरांच्या संपर्कात येतो. हे असूर कुरुप पण भोगविलासी, दास्यप्रथा मानणारे, पण दागिने, वस्त्रे, कलाकुसरीत हुशार म्हणून आर्यांना वरचढ व आर्यांना पशुमानव समजणारे आहेत. संघर्ष वाढत चालला आहे, पुरुधान व्यापार सोडून युद्धनेत्याच्या भूमिकेत शिरतो. पहिला देवासूर संग्राम छेडला जातो आहे, आर्यांचा त्यात विजय झाला आहे.

'अंगिरा ' ही सहावी कथा गंधार (तक्षशिला) येथे हिंदी-आर्यांमध्येच, इ. स. पूर्वी १८०० वर्षे घडते. आर्य-असूर संग्रामाला आर्यांच्या अंतःकलहाचे व असूरांना सामील होऊन विलासी जीवनात मग्न होऊन आपले घरदार मागे सोडून देणाऱ्या आर्यांचेही नवे

परिमाण आहे. पासष्ट वर्षांचे अंगिरा ऋषी कथेच्या केंद्रस्थानी आहेत. ते सम्यक विचार करून नव्या जगाचे भान आपल्या शिष्यांना देत आहेत.

सातवी कथा 'सुदास' कुरुपंचाल देशात वैदिक आर्यांमध्ये इ. स. पूर्वी १५०० वर्षे घडते. पंचाल (रोहिलखंड)जनपदात मानवाचं मोल नाही, स्त्रीला स्वातंत्र्य नाही म्हणून खिन्न झालेला तरुण सुदास सियालकोट येथे मद्रांच्या मानवभूमीत, जेथे स्वतंत्र्य व समानता आहे अशा लोकांमध्ये आश्रय घेतो, आश्रयदात्या अपालेच्या प्रेमात पडतो पण तो असतो पंचाल राजकुमार! दूरदेशात, खरे तर त्याच्या स्वदेशात राहिलेली आपली आई अन प्रेयसी यांच्यामध्ये हेलकावे घेणारे त्याचे मन त्याला पुनः आईकडे घेऊन जाते. त्याला कुठे माहिती असते की पुढे अपालाचा चिरवियोग त्याच्या नशिबात आहे, तो तिला नेण्यासाठी परतून येईपर्यंत तिचे प्राण या जगात रहाणार नाहीत! अभिषिक्त राजा सुदास आर्य व अनार्यांची सेवा करू इच्छितो, त्यासाठी त्या पुरोहित-ऋषींची व ब्राह्मणांची संमती मिळवावी लागते. आपल्या पवित्र हेतूसाठी, पण मनात या सर्वांचा तिरस्कारच करत तो खूप दाने देतो ज्यांचे उल्लेख आजही ऋग्वेदात सापडतात असे लेखक म्हणतो.

आठवी कथा 'प्रवाहण' पंचाल संयुक्त प्रांतात, इ. स. पूर्वी सातशे वर्षे घडते. मामेबहीण लोपेच्या प्रेमात पडलेला युवराज प्रवाहण शास्त्रांचा अभ्यास करताना त्यातील दंभ व अंधश्रद्धांनी अस्वस्थ आहे. पुरोहितांचा ज्ञानव्यापार त्याला समजतो. पुढे तो उपनिषदांचा उद्गाता होतो. आत्मज्ञानाचा अभ्यासक होतो. पण कार्यभाग साधण्यासाठी लोकांना मुठीत ठेवून धन, सत्ता मिळवण्यासाठी आता त्याने चक्क कपोलकल्पित पुनर्जन्माचा, पितरांच्या सृष्टीचा आविष्कार केला आहे, त्यात त्यालाही काही गैर वाटत नाही! पुनर्जन्माच्या भरवशावर जनता सामंतशाहीतील विषमता, दारिद्र्य साहील, पितरांना मोक्ष मिळावा म्हणून पुरोहितांना दाने देईल हा त्याचा विश्वास!

नववी कथा 'बंधुल मल्ल' इ. स. पूर्वी ४९० वर्षे घडते. बंधुल मल्ल तक्षशिलेवरून युद्धविद्या शिकून कुसीनाराच्या प्रजातंत्रात उपसेनापती होतो. त्याच्यावर जळणारे त्याच्या विरुद्ध कपट करतात तेव्हा तो कुसीनारा सोडून आपल्या प्रेयसीबरोबर मल्लग्रामात (गोरखपूर) येथे येतो, कोसलांचा सेनापती होतो. कोसल राज्यातील शाक्यकुळात गौतमबुद्धांचा जन्म झाला आहे! मोठे सामाजिक-धार्मिक मंथन चालू आहे. त्यांचा विचार जनमानसात मूळ धरत आहे. यज्ञवाद-ब्रह्मवाद-उपनिषदे यांनंतर आता गौतमांचा अनात्मवाद -जो जडवादाकडे झुकूनही चेतनाप्रवाहाचा पुनर्जन्म मानणारा म्हणून लोकप्रिय होत आहे. दगाबाजीने राजाचे कान येथेही भरून बंधुल मल्लाला कपटाने मारले जाते. त्याची प्रेयसी-पत्नी बुद्धाची नि:सीम भक्त आहे, धैर्याने ती हा आघात सहन करते.. सामाजिक विषमता दासप्रथा खूप वाढलेली आहे, श्रीमंत व्यापारीवर्ग शिरजोर आहे त्यातच बौद्धधर्मविचार बळावत आहे असा हा काळ.

या तिन्ही कथांत धर्मविचारांत बळावणारा अधर्म, थोतांड याचा विचार राहुलजींनी आपल्या शैलीने केला आहे. अनेक कथांमधून त्यांचे विषमतानिर्मूलनासाठी तळमळणारे मन त्यांना भावलेल्या सत्यासहित प्रकट होते. दहाव्या कथेची ('नागदत्त' इ. स्. पूर्वी ३३५ वर्षे) सुरुवातच''धर्म हा परधनाचा अपहार करणाऱ्यांसाठी आहे" अशा स्फोटक विधानाने होते करुणामयी, स्वातंत्र्यप्रिय तक्षशिला-गंधारराज्याच्या पार्श्वभूमीवर व्यवसायाने वैद्य पण मनाने तत्त्ववेत्ता नागदत्त आणि विष्णुगुप्त चाणक्य या दोन मित्रांचा हा संवाद आहे. इराण कडून येणाऱ्या पारतंत्र्याच्या छायेत उत्तर भारतातील छोटी गणराज्ये एकत्र येऊ पहात आहेत. संघराज्याची संकल्पना मूळ धरत आहे. त्यातील स्वप्नविलास नागदत्ताला हास्यास्पद वाटतो. शिवाय सर्व गणराज्ये सारखी नाहीत. मगधासारख्या गणराज्यात पाशवी अन्याय आहे. गरिबांचे दमन आहे. नागदत्त पार्शवांचा (इराण्यांचा) व यवनांचा (ग्रीकांचा) राज्यकारभार पाहू इच्छितो, विष्णुगुप्त येथेच राहून अन्यायी नंदराजाचे उच्चाटन करून दुसऱ्या चक्रवर्ती राजाच्या

आधिपत्याखाली संघराज्य कसे एकत्र येईल, परचक्रापासून भारताला कसे वाचवता येईल याच्या चिंतनात गढून जातो.

भ्रमणप्रिय नागदत्त वैद्यविद्येच्या बळावर पारशी क्षत्रपाच्या अंतःपुरात व अंतर्मनातही प्रवेश मिळवतो. निसर्गाने दरिद्री मरुभूमीत मानवी कर्तृत्वाने निर्माण केलेली पर्शुपुरीतील समृद्धी अनुभवतो. तेथेच यवनांची भाषा शिकून मसिडोनियाला जाऊन वस्तुस्थिती हाच सत्याचा निकष मानणाऱ्या थोर तत्त्वज्ञ ॲरिस्टोटलला भेटतो. येथे लेखक जगातील विद्वान तत्त्ववेत्त्यांचे विचारांचे आदानप्रदान देशाच्या सीमा लंघून कसे चालू होते ते दाखवतो. स्वप्नांना देशाची सीमा नसते. हे तत्त्ववेत्ते महान सत्तांचे सिंधूकाठी मीलन होईल असेही स्वप्न रंगवतात.

अकरावी कथा 'प्रभा' इ. स. पूर्वी ५० वर्षे घडली आहे. चंद्रगुप्त आणि मौर्य वंशाच्या नि:पातानंतर अयोध्येला व्यापारी व राजकारणातील महत्त्व आले आहे. अयोध्येचे नाव मात्र साकेत आहे. समृद्ध अशा ब्राह्मणकुळात जन्मलेला कवीमनाचा तरुण अश्वघोष कथेच्या केंद्रस्थानी आहे. साकेतात सर्व वंशाचे लोक व्यापार-उदीमामुळे एकत्र आल्याने सांस्कृतिक वातावरण संपन्न आहे, समाज मोकळ्या विचारांचा आहे. येथे स्थायिक झालेल्या यवनांचे भारतियीकरण झाले असले तरी म्लेंच्छ म्हणून त्यांची सुप्त हेटाळणीही आहे. उदार बौद्धधर्मात मात्र त्यांचे स्वागत आहे. प्रभा नावाच्या एका सुंदर यवनीच्या प्रेमात पडून कवी अश्वघोष यवनांच्या नाट्यशालेत सामील होऊन अभिनयाचे धडे घेतो, 'उर्वशी-वियोग' हे नाटक ग्रीकांच्या नाट्यकलेच्या प्रभावाखाली लिहितो नेपथ्यात पडदे रंगवायची कला शिकून घेतो व यवनांच्या (ग्रीकांच्या)स्मरणार्थ त्या पडद्यांचे नाव यवनिका ठेवतो! त्याचे आणि प्रभेचे प्रेम वंशभेदामुळे सफल होत नाही, प्रभा आत्महत्या करते, तो भिक्षू होऊन बौद्धांना ग्रीक तत्त्वज्ञानातून विचार घेणे शिकवतो.. मध्य-आशियातील गोबीमध्ये त्याची अमरकाव्ये 'बुद्धचरित' 'सोन्दरानन्द' सापडली आहेत ज्यात त्याने स्वतःचा उल्लेख 'साकेतक आर्य सुवर्णाक्षीपुत्र अश्वघोष' असा केला आहे!

बारावी कथा 'सुपर्ण यौधेय' इ. स. पूर्वी ४२० वर्षे घडते. कथानायक अवंतीमध्ये क्षिप्राकाठी ब्राह्मणकुळात जन्मला आहे. पण हे कच्चे ब्राह्मण- यवनकुळसंकरातून जन्मलेले ब्राह्मण- म्हणून हिणवले जात आहेत! उंच, भरदार, गोरेपान, गोमांसाहारी, मद्यपानप्रिय अशा या सात ब्राह्मण घरांचा उपहास इतर ब्रह्मवृंदाकडून केला जातो. हे चंद्रगुप्ताने केलेल्या वंशविच्छेदानंतर सतलज आणि यमुनेचा दुआब सोडून भारतभर पसरले. वर्णभेद नसलेल्या राजा रंतीदेवाच्या समकाळात एकाच बापाची दोन मुले ब्राह्मण किंवा क्षत्रिय होऊ शकत, अशा पार्श्वभूमीवर झुंजार यौधेयांची काही कुळे ब्राह्मण झाली. येथे राहुलजींनी वनपर्व-शांतीपर्व- द्रोणपर्वातील उतारे दाखले म्हणून तळटीपेत दिले आहेत. या सामाजिक संदर्भामुळे अस्वस्थ असलेला सुपर्ण उज्जयिनीला जाऊन कविकुलगुरु कालिदासांचे शिष्यत्व पत्करतो, त्याचा त्याला अभिमान आहे. गुप्तांच्या चोख पण कर उकळणाऱ्या राजवटीत तो निर्धास्त प्रवासाला निघतो. आगरे-निगमे-गावे, तेथील कलाकार, सामान्य लोक आणि दासांचे जीवन पहातो. गुप्तांच्या राजवटीतून विस्थापित झालेल्या विदेशी भिक्षू दिङ्नाग याच्य सहवासात येऊन यौधेयांच्या मृतभूमीचे पुनरुत्थान करण्याची शपथ वहातो.

तेरावी कथा 'दुर्मुख' इ. स. पूर्वी ६३० वर्षांआधी घडताना रंगवली आहे. तिचा नायक साक्षात शातवाहन वंशी चक्रवर्ती राज्यकर्ता शीलादित्य (सदाचारसूर्य) हर्षवर्धन! विक्रमादित्य दुसऱ्या चंद्रगुप्ताचा वंशज. महाराज प्रभाकरवर्धनाचा पुत्र, क्षमामूर्ती महाराज राज्यवर्धनाचा (जे कपटाने मारले गेले)बंधू, राजकन्या राज्यश्रीचा भाऊ. दर पाचव्या वर्षी राजकोषातलं धन ब्राह्मण व बौद्ध श्रमणांना वाटणारा उदारधी. या लोकविलक्षण कल्याणकारी राजाला विद्यादान श्रेष्ठतम वाटतं म्हणून तो नालंदा विद्यापीठाची समृद्धी वाढवतो, सर्व धर्मांच्या विद्वानांचा सत्कार करतो. या कथेत त्याचे अन आद्य कादंबरीकार ("कादंबरी" या त्याच्या दीर्घकथेवरूनच कादंबरी हा साहित्यप्रकार अस्तित्वात आला)बाणभट्टाचे गुंतागुंतीचे नाते चितारले आहे हे या कथेचे वैशिष्ट्य. हर्षचरित गुपचुप लिहिणारा बाणभट्ट त्याची प्रच्छन्न निंदा सूक्ष्मपणे आपल्या लेखनातून करतो व इतिहासाचा विपर्यास होईल असे साहित्य निर्माण करतो आहे असे हर्षवर्धनाचे दु:ख आहे! 'कादंबरी' कथेत हर्षवर्धनाचेच व्यक्तिगत आयुष्य बाणभट्टाने

चितारले आहे, त्याची पारशी राणी त्या कथेतील महाश्वेता आहे, व सौराष्ट्री राणी कथेत कथानायिका कादंबरी झाली आहे असा त्याचा आरोप आहे!कथेत बाणभट्टाचीही बाजू अलिप्तपणे मांडली आहे. हर्षवर्धनाने त्याच्याकडून घोस्ट रायटिंग करून घेतले आहे, त्याच्या सद्गुणातही दांभिकतेचा देखावा आहे असे मोकळ्या पुरोगामी आचारविचारांच्या बाणभट्टाचे म्हणणे आहे! कटू सत्य स्पष्ट बोलल्याने त्याला 'दुर्मुख' ही पदवी मिळाली आहे!

पुढची कथा ‘चक्रपाणी’ आपल्याला एकदम इ. स. नंतर १२०० वर्षे पुढे आणते. कनोज या समृद्ध शहराच्या पार्श्वभूमीवर ही कथा इस्लामच्या रक्तरंजित प्रसाराची घोडदौड हिंदुस्तानच्या सीमेशी धडक देत आहे हे दाखवते. एकजूट नसलेले आत्मतुष्ट भारतीय राजवंश, दुही, अंधश्रद्धा या पार्श्वभूमीवर इस्लामला येथे विजय मिळवणे सोपे गेले आहे. वृद्ध विलासी राजा जयचंद्र तरुण शूरवीर पृथ्वीराजाचा द्वेष करतो. त्याच्या मरणानंतर राजवैद्य चक्रपाणी युवराज कुमाराला वाचवून तुर्कांचे आक्रमण थोपवून जातीभेदविरहित हिंदू राज्यलक्ष्मी परत आणण्याची स्वप्ने पहातो.

पंधरावी कथा 'बाबा नूरदीन" इ. स. १३०० इस्लामी सल्तनतीत गुण्यागोविंदानं एकत्र रहाणाऱ्या, हिंदू संताबरोबरच मुस्लीम पीरांचाही आदर करून तरीही आपल्या धार्मिक अस्मिता सांभाळणारा मिश्रधर्मी सामान्यांचा समाज. ही कथा अशा हिंदू मुस्लीमांचे चित्रण करून त्या राजवटीतला, काळातला सकारात्म भागही दाखवते. मुस्लीम पीरही समनी (बौद्ध) व तसव्वूफ (वेदांत) विचारधारांनी प्रभावित आहेत. असंतोष नको म्हणून येथे स्थिरावलेले मुघल राज्यकर्ते सक्तीची धर्मांतरे, मंदिरविच्छेद निदान आपल्या राज्यांतर्गत तरी करत नाहीत. शरियत, धर्मप्रसार, हिंदू-बौद्धांचे काफर असणे, त्यांच्यात धगधगणारी इस्लामविरोधी अस्मिता व त्यासकट त्यांना घेऊन राज्यकारभार करणे व इस्लामी सत्ता मजबूत करणे या सर्वांवर बाबा नूरदीनबरोबर उहापोह करणारा खिलजी शासक या कथेत आहे.

सोळावी कथा सुरैया इ. स. १६०० मध्ये घडलेली एक हिंदू मुस्लीम प्रेमकथा. अकबराच्या दरबारातील अबुल फजलची तरुण सुंदर कन्या सुरैया अन अकबराच्याच मर्जीतील सधन शेतकरी टोडरमलचा पुत्र कमल. अकबराची ती सर्वसमावेशक राजवट. अकबर बिरबलाचे-इतर विचारवंतांचे ज्ञानसंवर्धक संवाद. यातून प्रोत्साहन मिळून हे प्रेमी जीव सर्वसंमतीने एकत्र येऊन सहजीवनासाठी प्रवासाला फ्लॉरेन्सला जातात, पण सुरतेला परतण्याआधी चाच्यांच्या हल्ल्याला बळी पडतात अशी ही थोडी स्वप्नविलासी अंगाने जाणारी कथा आहे.

सतरावी कथा रेखा भगत इ. स. १८००. ईस्ट इंडिया कंपनीचं आगमन, लॉर्ड कॉर्नवॉलिसने येथील जमीनदारांना हाताशी धरून सुरू केलेली लूट त्यातच दुष्काळ. जमीनदारांचे वाढते अत्याचार. त्यातच नवविचारांचे सामान्यांपर्यंत पोचणारे वारे. स्वाभिमानी रेखा भगत जमीनदाराला मानत नाही, त्याच्या मागण्या पुरवत नाही म्हणून जमीनदार त्याच्या पत्नीला विटंबित करतो. सूडाने भडकलेला रेखा त्याचा कर्दनकाळ बनतो..

अठरावी कथा इ. स. १८५७, मंगल सिंह. इंग्लंडमध्ये नवे शिक्षण घेण्यासाठी आलेला मंगल सिंह नव्या क्रांतीकारक शोधांच्या त्या जगामुळे प्रभावित आहे. ॲनी रसेलच्या प्रेमात आहे. सती व अशा अन्य अन्यायी प्रथांमुळे हिंदूधर्माचा तिरस्कार करून त्याने ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केला आहे. आता तो मार्क्सच्या वैचारिक प्रेमात पडतो आहे, आपल्या देशाच्या दुर्दशेने तळमळतो आहे. भारतात विलायती शिक्षण घेऊन परतल्यावर मंगल सिंह १८५७ च्या धुमाळीत उडी घेतो तेव्हा डुकरा-गायीच्या मांसाची काडतुसे या मुद्द्यापेक्षाही त्याचे लक्ष इंग्रज भांडवलदार व भारतीय सामंतशाहीच्या पकडीतून या निमित्ताने सामान्य जनतेला बाहेर काढणे याकडे आहे..

बंडाचे बारकाईने चित्रण, नेत्यांची संभाषणे व शौर्य या कथेत आहे. मंगलसिंहाच्या हौतात्म्याचा एक विशाल संदर्भ त्यातून स्पष्ट होतो.

एकोणिसावी कथा 'सफदर', काळ इ. स. १९२२. बॅरिस्टर सफदरजंग आणि त्यांची स्वेच्छेने निपुत्रिका राहिलेली मेमसाहेब बेगम सकीना. स्थळ लखनौ. त्यांचा जिवाभावाचा राजपूत मित्र शंकर. स्वाभिमानी, साधाभोळा, प्रेमळ. युरोपातील सत्तासमीकरणे बदलत आहेत. सफदरजंग आंतरराष्ट्रीय राजकारणातले बारकावे, त्यांचा हिंदुस्तानच्या राजनीतीवर होणारा परिणाम यांची सखोल चर्चा शंकरबरोबर करत असतात. कर्झनने केलेला वंगभंग भारतीयांमध्ये एक नवा त्वेष निर्माण करून गेला आहे.

"जगाचे धागेदोरे एकत्र गुरफटले गेले आहेत.''

भारतात लाल, बाल पाल यांचा प्रभाव आहे, स्वातंत्र्ययुद्धाने टिळकांनंतरचा गांधीयुगाचा टप्पा गाठला आहे. सफदरजंग व शंकर आपले आरामदायी जीवन त्यागून गांधीजींच्या असहकारितेच्या चळवळीत उडी घेण्याचा निर्धार करतात. तुरुंगात जातात. गांधीजींनी सत्याग्रह मागे घेतल्यावर त्यांचा भ्रमनिरास होतो.

" क्रांतीचा शक्तीस्त्रोत जनताच आहे, गांधीजींची बुद्धी नाही'' या वाक्यावर आठ हजार वर्षांचा अफाट प्रवास, विलक्षण माणसे, परिस्थिती चितारणारे राहुलजी आपल्या लेखनाचा शेवट करतात.

एकोणीस कथांचा हा पट अत्यंत गुंतागुंतीच्या तपशीलांनी ठासून भरलेला आहे. प्रत्येक कथेत एका कादंबरीचा ऐवज आहे. त्यातले मुद्दे अभ्यासकांच्या दृष्टीकोनानुसार आस्थेच्या निकषावर विवाद्य ठरू शकतात. या सर्वांवर थोडक्यात लिहिणे कठीण आहे.

पण असे कुणीतरी कथा या माध्यमाचा वापर करून लिहिले आहे हेच आश्चर्यकारक आहे. ही पांडित्यातील प्रतिभा आहे. आपल्या चिमुकल्या अस्तित्वामागे केवढे खोल-गहन प्रवाह, विचार-संस्कृतीसंकर आहेत, केवढी उलाढाल झाली आहे कालखंडांची अन अगणित जीवनांची ज्यामुळे आपण आज इथे असे आहोत त्याचे भान केवळ विस्मित विस्मित विस्मित करते आपल्याला.

ते भान जागवण्यासाठी तुमचे आभार महापंडितजी.

*"व्होल्गा ते गंगा : लेखक: राहुल सांकृत्यायन" हे ई पुस्तक स्वरूपात उपलब्ध असून ई साहित्य प्रतिष्ठानच्या VIP सभासदांना विनंतीनुसार ई मेलद्वारे विनामूल्य उपलब्ध करून दिले जाईल. लिहा esahity@gmail. com*

## बंधन आणि मुक्ती : कवी अनिलांची 'दशपदी'

बंधन आणि मुक्ती.

कवितेच्या संदर्भात बोलायचं तर छंदांचं बंधन आणि मुक्तीदायी मुक्तछंद.

पण मुक्तीतही बंधन असतं? मग बंधनात मुक्तीही असेल!

तसंच तर आहे! पण हा प्रचीतीचा प्रांत, कवितेचे शब्द अनुभवताना आकळणारं सत्य.

अनिलांची कविता समजून घेताना जाणवणारं सत्य.

जी या सीमारेषेवर घर बांधून आहे. जाणीव-नेणिवेच्या, छंदबंधन आणि मुक्तछंदाच्या.

'दशपदी'.. या संग्रहात अनिलांच्या सयमक मुक्तछंदातील दहा ओळींच्या ३९ रचना आहेत ज्यांना ते दशपदी हे अभिधान देतात. अनिलांच्या कवितेवर लिहावेसे वाटत असताना त्यांनी प्रचलित करूनही त्यांच्यापाशीच थांबलेल्या या सुंदर फॉर्ममधील

कवितेवरच प्रकर्षाने लिहावेसे वाटले त्याचे काही कारण होते. अनिलांच्या शैलीच्या आरशात आजच्या कवितेचे वास्तव पहावेसे वाटले.

मुक्तछंद हा शब्द आज ज्या तऱ्हेने वापरला जातो त्या अर्थाने मराठी मुक्तछंदाच्या आद्य प्रणेत्यांपैकी एक अशा या कवीने ही संज्ञा वापरलेलीच नाही. त्यांच्याच शब्दात सांगायचे तर आज लिहिला जाणारा बराचसा मुक्तछंद हा मुक्तछंद नाहीच. मुक्तछंदाचेही काव्य-व्याकरण आहे.''एका ओळीचे अनेक तुकडे करून छापले की तो मुक्तछंद होत नाही! असतो फक्त मोकाटपणा.'' असं ते विजया राजाध्यक्षांशी प्रस्तावनेत केलेल्या चर्चेत म्हणतात. (ते मुक्तछंद असाच शब्द योजतात, मुक्तच्छन्द नाही, दोन्ही पाठभेद अस्तित्वात असले तरी.)

अनिलांना अभिप्रेत असलेला मुक्तछंद ताल, आवर्तन, यमक हे सर्व स्वीकारतो. फक्त त्यातला जाचकपणा काढून टाकतो. त्याचे लोभस, सोपे वाटणारे पण सखोल अर्थांचे स्तर असलेले प्रयोग ते कवितेवर करतात. कवितेचं हे मोकळंढाकळं घर त्यांनी खूप विचारपूर्वक बांधलं आहे. दशपदीतील कवितेच्या या सैलसर आकृतीबंधामागे त्यांचं कविजीवन आणि विद्वत्जीवन एकारून उभं आहे. त्यांचं लौकिकातलं भावजीवन, प्रेमजीवन, एकांतजीवन सर्वत्र त्यांनी कवितेला मुक्तपणे येऊ दिलं आहे, असाही त्यांच्या मुक्तछंदाचा एक अर्थ आहे. जणू या अक्षर सहचारिणीबरोबर ते या अक्षय घरात राहत आहेत.

'दशपदी'बद्दल बोलताना अनिल सांगतात-''दशपदी हा पूर्वनियोजित रचनाप्रकार नाही आणि तशाप्रकारे मी दशपदी लिहिल्या नाहीत..'' त्यांनी ज्या दहा ओळींच्या कविता लिहिल्या त्या आपसूकच यमक असलेल्या अन काही नव्या मुक्तछंद प्रजातींमध्ये लिहिल्या गेल्या होत्या.

आता प्रश्न पडतात. पूर्वनियोजित नसेल तर दहा चरणांचं तंत्र तरी कसं सांभाळलं गेलं? कविता नेणिवेतून पूर्णरूप प्रकटतेही पण मग ती अव्याख्येय असते, नाही का? अनिलांनी या आक्षेपांचा प्रतिवाद इतकाच केला आहे की सर्व दशपदी न ठरवता विशिष्टच फॉर्ममध्ये कशा लिहिल्या गेल्या याचा पुरावा देणे शक्य नाही. अनिल म्हणतात, ''स्वत:च्या अनुभवांच्या साक्षीचा पुरावाच ग्राह्य. दुसरा कोणता आधार नाही.''

तर, नेणिवेतून प्रकट झालेले हे पद्यबंध एका अंतर्गत शब्द-व्यवस्थेचं पालन करतात. हे मघाशी लिहिल्याप्रमाणे वाटतात तितके मुक्त नाहीत, छंदोबद्ध कवितेतील निरनिराळ्या लोभस प्रचलित लय-तालांचा मागोवा घेत अनिल नवे काव्य-व्याकरण, नव्या मुक्तछंद प्रजातीं जन्माला घालतात. प्रत्येक दशपदीचा पुस्तकाअखेर स्थल-काल-छंद दिला आहे. त्यात सयमक मुक्तछंद 'मानवता' (दोन आणि तीन अक्षरांचे चरणक), 'प्रेमजीवन ' (पाच आणि सहा अक्षरांचे चरणक), हे दोन मुख्य आहेत. अन्य रचनांमध्ये 'भृंगावर्तनी जाती', अग्न्यावर्तनी जाती, हरावर्तनी जाती या मुख्य आहेत. एक भृंगावर्तनी विषमचरणी जातीही आहे! आणि आपण चक्क मुक्तछंदाबद्दल बोलत आहोत!!

दुसरीकडे, भारतीय छंदशास्त्रामध्ये ओळींची एकूण संख्या हा निकष कुठेच येत नसल्याने अनिलांचे हे पद्यबंध इंग्लीश साहित्यातील 'सुनीत' च्या केंद्रवर्ती कल्पनेच्याही जवळ आहेत. अनिलांना दशपदी म्हणजे दहा चरणांचा स्तंभ (stanza चा समानार्थी शब्द) वाटते. चौदा ओळींच्या सुनीतांमध्ये ८+६ किंवा १०+ २ अशा विभागात कवितेतला आशय सिद्ध होतो, असला काही नियम हेतूपूर्वक दशपदीमध्ये नाही असेही दशपदीचा हा जनक म्हणतो. दशपदीत विरामचिन्हे नाहीत पण प्रत्येक दशपदीच्या शेवटी एक उद्गारवाचक चिन्ह येते, तो त्यातला सौम्य खटका असेही अनिलांचे म्हणणे. कुठेतरी ही खटकेबाज शेवट करण्याची पद्धत सुनीताची आठवण आपल्याला करून देतेच.

तर अशा प्रकारे अनिल दशपदीच्या रूपबंधाबद्दल बरेच काही भरभरून म्हणतात अन शेवटी ‘हे अपुरेच दर्शन अन तेही कसेबसे सांगून झाले’ असंही म्हणून मोकळे होतात!

ही किमान पूर्वपीठिका झाल्यावर ‘दशपदी ‘ या लहानशा संग्रहातील कवितीक अनुभवखंडांकडे जायचे. शब्दांचा, संदर्भांचा, त्यातल्या सूक्ष्म अर्थांतरांचा विचार करत लिहिलेली ही कविता एका स्थिर भावजीवनाच्या काळात लिहिली गेली आहे हे स्पष्ट आहे. या कवितेने दु:ख खूप भोगलेले, साहिलेले आहे, पण संपूर्ण कोसळून टाकणारी वाताहत तशी स्वत: प्रत्यक्ष अनुभवलेली नाही. मात्र उत्कटतेने मानवी जीवनातल्या दूरदूरही घडलेल्या एकूण पडझडीची सह-अनुभूती घेतली आहे. (एरवीही अनिलांची जातकुळी ‘अशी कुठे लागली आग, जळती जसे वारे, कुठे तरी पेटला वणवा, भडके वन सारे.. किती दूरची लागे झळ, आतल्या जीवा, गाभ्यातील जीवनरस, सुकत ओलावा..’‘या प्रकारची सहकंपना, संवेदनक्षमता असलेली.)

एक एक अनुभव पचवून रिचवून एक एक दशपदी लिहिली आहे.

‘विराणी ‘ या पहिल्याच दशपदीत अभिप्रेत असलेली ‘विराणी ‘ म्हणजे ज्ञानेश्वरांची विरहिणी नसून आसमंतात विरून जाणारी ‘वैराणी ‘ आहे. वातावरण पावसाळी काळोखाचे, आतही काळोख. (अनिलांच्या बाबतीत हे नेहमीच घडते. निसर्ग आणि मनस्थितीचे एकात्म रूप दिसते जसे की ‘श्रावणझड बाहेरी मी अंतरी भिजलेला | पंखी खुपसून चोच एक पक्षी निजलेला’‘ या अशाच दुसऱ्या एका प्रख्यात दशपदीतील ओळी..)

‘’नुसता गडद अंधकार वीज चमकत नाही

काळी माती काळे रान मला मीही दिसत नाही’‘

ओळख- अनोळख, जवळ -दूर, हारणे- हरवणे यातले द्‌वैत या सर्वदिश अंधारात सरमिसळून विरून जाते. अस्तित्वालाही या सर्वंकष अंधारात फक्त विरून जावेसे वाटते. विजया राजाध्यक्षांच्या प्रस्तावनेत या कवितेबद्दल बोलताना अनिलांनी लहानपणी बैलगाडीतून प्रवास करताना वाटलेली काळोखाची भीती उल्लेखिली आहे, पण, काळोख, पाणी हे आदिबंध असलेल्या या कवितेच्या वाचनातून मात्र भय ही आदिम भावना तितकीशी पोचत नाही. फक्त एक सल जाणवतो.. म्हणून या कवितेतले काळोखात विरून जावेसे वाटणे मग उग्र वाटत नाही. मरणाच्या प्रतीकापर्यंत पोचत नाही.

‘’हारल्याची हरवल्याची जाणीव सलत राहते

अशा वेळी काळोखात विरून जावे वाटते!’‘

‘तदात्मता‘ या दशपदीत पहाटकिरणे आहेत, निसर्गाचा अन मानवाचा अगदी दुसऱ्या टोकाचा मूड. प्रसन्न. सौंदर्यानुभवात थरारलेला.

‘’उसांच्या असंख्य तुरयांवरती प्रकाश लहरी डोलत जाती

रुपेरी राखी रंगांच्या लाटा हिरव्या शेतात उसळविती’‘-

यासारख्या सुखकर किरणस्पर्शी रंगमग्न ओळी. पहाटवेळ सूक्ष्म धूलीकणापासून विस्तारत विश्वव्यापी होत जाते. तो स्पर्श असा विराटरूपी असला तरी त्याच वेळी प्रीतीच्या पहिल्या स्पर्शाइतका कोमल, परिचित आहे -

‘’तेव्हा संवेदना अबोध काही तदात्मतेची थरारून जाते

प्रीतीचा पहिला स्पर्श जाणवून सारे अंगांग शहारून येते!’‘

या दशपदीत शब्दाचा उंबरठा ओलांडून अनिल कधी दूर जातात कळत नाही, आपल्यालाही परतत्वाच्या स्पर्शाची जाणीव होते..

‘एक दिवस’’ या दशपदीत आलेली भावना अर्धे आयुष्य ओलांडलेल्या प्रत्येकाला आपली वाटेल अशी आहे -

‘’वाटते आयुष्य अवघे चार दिवसांचेच झाले

कसे गेले कळले नाही, हाती फार थोडे आले

दोन दिवस आराधनेत दोन प्रतीक्षेत गेले

अर्धे जीवन प्रयत्नात, अर्धे विवंचनेत गेले..‘‘

आणि मग या पुढल्याच दशपदीतील’‘आणीबाणी’’ कवितेमधील खूप प्रसिद्ध असलेल्या सुरुवातीच्या अन शेवटाच्या दोन-दोन ओळी, अनिलांच्या कुसुमावतींबरोबरच्या उत्कट प्रेमजीवनाची चुणूक..

‘’अशा काही रात्री गेल्या ज्यांत काळवंडलो असतो

अशा काही वेळा आल्या होतो तसे उरलो नसतो

.....

कसे निभावून गेलो कळत नाही कळले नव्हते

तसे काही जवळ नव्हते -नुसते हाती हात होते!’’

‘’तळ्याकाठी’‘ ही आणखी एक चलत-चित्रदर्शी दशपदी. पण हे चलत-चित्र शांतरसाचा परिपोष करणारे. येथे पुन: एकदा निसर्ग अन कवीच्या भावस्थितीचे ऐक्य आहे. तळ्याकाठचा नीरव एकांत अन कवीची आत्ममग्न मुद्रा. विचारांची निवळलेली धूळ..

''जळाआतला हिरवा गाळ निळ्याशी मिसळून असतो काही

गळून पडताना पान मुळी सळसळ करीत नाही

सावल्यांना भरवित कापरे जलवलये उठवून देत

उगीच उसळी मारून मासळी मधूनच वर नसते येत''

'जुई' या दशपदीतली शब्दकळा पाऊस पडून गेल्यावर जाळीच्या पडद्यातून दिसणाऱ्या जुईचे रूप रेखाटते की एका मर्यादशील लावण्यवतीचे?

''कवळ्या फांद्यांचा लवचिक बांधा पाचूच्या पानात झाकून घेत

शुभ्र शुचितेची सौजन्यकांती हिरवे लावण्य लेऊन येत..''

ही दशपदी खरे तर पूर्णच द्यायचा मोह होतो आहे. सुंदरतेने निथळलेली ठेव आहे ती मराठी सारस्वतातली.

आता 'शरदागम', पण मर्ढेकरीय नव्हे, तर अनिलांचा. प्रसन्न. 'चेतनगुणोक्ती' नावाचा एक अर्थालंकार आहे. अचेतन सृष्टी वर चेतन सृष्टीचे गुण आरोपित करणारा. या संपूर्ण दशपदीत अनिल शरद-ऋतू येताना सृष्टीत होणाऱ्या बदलांमध्ये विरघळून गेले आहेत, प्रत्येक ओळ आपल्या श्वासात गारवा अन वृत्तीत गोडवा भिनवत नेते.

'' काळजी करते काळी माती कशी अजून कपाशी नाही फुलली

चौकशी कराया पंख हालवीत निळे तास पक्षी उतरती खाली

शेवंतीला कुणी उगीच सांगे इतक्यात तुझी वेळ आली नाही

गवताचे सोने होण्याआधीच पिवळ्या फुलांची करू नको घाई!''

''लावण्य'' या दशपदीत एखाद्या अचानक समोर येणाऱ्या कुणाच्या तरी''आगळ्या लावण्या'' बद्दल कवीला वाटणारे गूढ आकर्षण कालिदासांच्या''भावस्थिराणि जननांतरसौहृदाणि'' या ओळीची आठवण जागवते. त्या नितांत नेमक्या शब्द-भावसौंदर्यासाठी हे अवतरण -

''नसते निव्वळ गात्रांची चारुता त्याहून अधिक असते काही

ठाव त्याचा कधी लागत नाही आणि आठवण बुजत नाही

रूप रेखेत बांधलेले तरी मोकळी खेळते त्यातून आभा

डोळ्याआडच्या दीपज्योतीहून निराळी भासते प्रकाशप्रभा..''

कुसुमावतींच्या शेवटच्या आजारपर्वात, त्यांच्या मृत्यूपूर्वी लिहिलेली, त्या मृत्यूची चाहूल देणारी 'एकाकी ' ही दशपदी.

''भिजल्या आहेत पाऊलवाटा आता साऱ्या तुझ्यामाझ्यामधल्या

मिटल्या आहेत जळावरल्या पुसट प्रकाशलाटा शेवटल्या''

आपल्या प्रेमाचे मृत्यूच्या धूसरतेत विरणारे चित्रही कुसुमावतींच्या अखेरच्या दिवसात त्यांच्याबरोबर कवितेतूनच अनुभवणारे, सोसणारे कवी अनिल. नि:शब्द करणारी शब्दयोजना. खऱ्या अन खोल प्रेमाला चिर-विरहाचा शाप असतोच ना?

'गतार्थ' सारखी एखादी दशपदी शब्दांचे अर्थ हरवणे अन मुकेपणा दाटणे अशा वेगळ्या विषयावर असूनही शब्दबंबाळ म्हणून वेगळ्या अर्थाने अर्थहीनही वाटते.

पण निसर्गात मनापासून रमणाऱ्या कवीला ''माघ'' मध्ये पुन: ती हरवलेली अर्थवत्ता सापडते. माघाच्या पुसट फिकट संध्याछायांमध्ये दिवस पुन: ढळतो, तेव्हा..

''शेंगांचे पिवळेपण कण्हताना रुणझुणते

उदासीन फांद्यांवर रुक्ष जिणे गुणगुणते..''

नंतर''फाल्गुन''! निसर्गामध्ये मोकळेपणाने रमणारी ही कविता पुन: एकदा चेतनगुणोक्तीचा हवाहवासा शिडकावा करते. अग्न्यावर्तनी जातीतील ही रचना शब्दांच्या उष्णतेने जणू धगधगते, त्या उष्णतेचा सृष्टीतील कामज्वराशी संबंध जोडते. उघड्यावर मांडलेल्या चोरट्या प्रणयाची आगळीक फाल्गुनाच्या या प्रतीकात सामावून जाते -

''अंगभरल्या वनलतांच्या नेणत्या नव किसलयांशी कोवळीकी

चोरट्या करवंदिचे चवचाल चाळे आडवळणी वेगळीकी

शीर्ण पाने ढाळता नि:संगतेने पळस कासावीस होतो

लपवताना वासनांचे सोस सहसा संयमा सोडून देतो''

चित्रे निसर्गाचीच नसतात. ती चिरविरहानंतर रेखाटलेली प्रियेच्या आठवणींचीही असतात.''सावल्या'' आणि''चित्र'' मधली ही शब्दचित्रे..

तू आहेस स्वत: की चित्र जिवंत झालेले

अश्रूत विरलेले उसासे रूप घेउन आलेले

तुझे जवळ जवळ घेणे आपण दूर दूर राहून

मी चूरचूर होताना तुझ्या यातना साहून''

एकाकीपण. विरहाच्या आतून आतून फुटून वाहणारी आर्तता. अग्न्यावर्तनी जातीतील''दाद'' ही दशपदी अनिलांमधला अव्वल गीतकार प्रकट करणारी-

''कुणी जाल का सांगाल का सुचवाल का ह्या कोकिळा

रात्री तरी गाऊ नको खुलवू नको अपुला गळा

आधीच संध्याकाळची बरसात आहे लांबली

परत जाता चिंब चुंबन देत दारी थांबली..''

मग स्वीकार.''तुझ्याविना'' या जाणीवेचा, त्याच नावाच्या शेवटच्या दशपदीतून. गझलेशी खूपच जवळीक साधणारी रचना.

कितीक काळ हालला असा तुझ्याविना

कळे न श्वास चालला कसा तुझ्याविना

.........................................................

लवथवत्या पानावर गहिवरते भरदुपार

ज्वरभरला दिवस ढळे कसा तुझ्याविना..''

शब्दांची, प्रतिमांची, कवितेच्या रूपबंधातून येणाऱ्या प्रत्ययाची अभ्यासपूर्ण जाणीव एकीकडे. प्रतिभेच्या स्पर्शाने संपन्न झालेली नेणीव दुसरीकडे.

अनिल आणि पु. शि. रेगेंसारखे कवी सोपेपणा अवघड करतात अन अवघडपणा सोपा. दशपदीतला मुक्तछंद अशा प्रकारच्या कवितेच्या आकलनासारखाच आहे..

सहजसाध्य वाटतानाच चकवणारा, आपल्याच अस्तित्वाच्या आतल्या स्तरांच्या उत्खननात आपल्याला नेऊन सोडणारा.

## 'चोखेर बाली ' - स्नेह-प्रेमाचे रवींद्र-संगीत

१९०३ मध्ये लिहिलेल्या रवींद्रनाथ ठाकुरांच्या 'चोखेर बाली' या कादंबरीचा मराठी अनुवाद ‘चक्षुशल्य’ (श्री शंकर बाळाजी शास्त्री यांनी केलेला व साहित्य अकादमीने प्रकाशित केलेला) कालच्या मैत्रीदिनी योगायोगाने वाचनात आला. स्नेहाचे, प्रेमाचे मधुर आणि रौद्र स्वर गुंफलेले हे रवींद्रसंगीत वाचताना मन मोहून गेले. मूळ कलाकृतीच्या आशयगर्भापर्यंत रसिकाला नेणे, भाषेची, संस्कृतीभिन्नतेची कुठूनही बाधा होऊ न देणे, आपल्याच शैलीची महत्ता न मांडणे हे भाषांतरकाराचे काम, ते शास्त्रीजींनी चोख केले आहे. कथानकात आपण अलगद हरवत जातो.

हे भारताच्या महाकवीने कादंबरीचा आकृतीबंध स्वीकारून लिहिलेलं गद्य. का कोण जाणे, कवींनी लिहिलेलं गद्य मला अतिशय प्रिय आहे अन एरवी इतरांच्याही

गद्यात उतरून येणारी सूक्ष्म काव्यात्मता ललित लेखनाला अजरामर अशी काही झळाळी देते यावर माझा विश्वास आहे.

चोखेर बाली, चार तरुण स्त्री-पुरुषांच्या कौटुंबिक भावविश्वाच्या चतु:सीमांमध्ये उसळणारा विकार- विचारांचा महासागर.

महेंद्र, डॉक्टरीचा अभ्यास करणारा, आई राजलक्ष्मी अन काकी संतानहीन विधवा अन्नपूर्णा यांच्या लाडात वाढणारा लहरी मुलगा.

बिहारी, त्याचा परम मित्र, तोही त्याच्या त्या तसल्या लाडाकोडात भरच घालणारा. स्वतःला लोपवण्यात आनंद मानता-मानता कथानकाच्या क्रमात हळुहळू, दु:खी होत गेलेला. छोट्या मनाच्या स्वयंकेंद्रित महेंद्रचा हा मोठ्या मनाचा अनुचर, मित्र.

विनोदिनी, महेंद्रला आईच्या-राजलक्ष्मीच्या-मैत्रिणीची सांगून आलेली, तुलनेने सामान्य परिस्थितीतील पण सुशिक्षित मुलगी, हे स्थळ महेंद्रने उडवूनच लावले. मग तो नाहीतर हा म्हणून बिहारीलाही विचारणा झाली, त्यानेही ही 'महेंद्राने टाकून दिलेली मिठाई खाणे' नाकारलेय.

आशा, ही अन्नपूर्णाकाकीने विवाहप्रस्तावात आणलेली मुलगी, अन्नपूर्णेने आपल्या मुलाला प्रस्ताव आणणे राजलक्ष्मीची मुलाबद्दलची स्वामित्वभावना दुखावणारे, तसे ती टाकून बोलतेही विधवा जावेला.

या दोन जावांचेही एक उपकथानक पडद्यामागे धुमसते आहे. व्यथित होणारी, स्वतःला बिहारीसारखीच लपवणारी, लोपवणारी अन्नपूर्णा मागेमागे रहाते. गृहकलह नको म्हणून दोघीही आळीपाळीने देशांतराला जातात, तरीही दोन्ही जावांमध्ये अनाकलनीय असे प्रेम आहे, एकमेकींची काळजी आहे.

उगीच आईला दुखावणे नको, काकीला व आपल्यालाही त्याचा त्रास होईल हे जाणून महेंद्र बिहारीसाठी म्हणून आशाला थाटमाटात पहायला जातो. इथे बिहारीला गृहित धरण्याची हद्द आहे. पुढे आशाला पहाताच तिच्या रूपाच्या असीम मोहात पडून महेंद्र तिला पसंत करतो हा त्यावरचा कळस. या लाडावलेल्या पुत्राचे तिच्याशी लग्नही होते अन अपार आसक्तीने भरलेल्या त्यांच्या दांपत्यजीवनाला सुरुवातही.

या चौघांच्या आयुष्यांचे, भावनांचे, व्यक्तित्वांचे, परस्परसंबंधांचे आणि त्यातल्या विरोधविकासी परिवर्तनांचे हे कथानक.

विनोदिनी अन्यत्र विवाह होऊन विधवा होते अन राजलक्ष्मी तिच्या निराधार अवस्थेची दया येऊन तिला घरी आणते.

विधवा विनोदिनी आणि नवविवाहिता आशा दोन्ही स्त्रिया अशाप्रकारे महेंद्र आणि बिहारी यांना दोघांनाही सांगून आलेल्या, हा पूर्वेतिहास प्रत्येकाच्या मनात निरनिराळ्या स्वरूपात नांदतो आहे. यातच परस्पराकर्षणांचा एक अनोखा गोफ अव्यक्त स्वरूपात चौघांच्याही मनात आहे, जो पृष्ठस्तरावर ही माणसे आणणार आहेत की काळ, रवींद्रच ठरवतील. आणि त्यांनी हे काम किती नितळतेने केलेय. एखाद्या मानसशास्त्रज्ञाच्या कुशलतेने आणि कवीच्या अंगभूत सूक्ष्मसंवेदनेने.

विनोदिनी आशासमोर मैत्रीचा प्रस्ताव ठेवते. ज्या घरात ती आश्रयार्थ आली आहे त्याच घरातील समवयस्क नववधूशी मैत्री करावीशी वाटणे नैसर्गिकच. पण याच निसर्गात भावी संघर्षाचीही बीजे आहेत हे सूज्ञ विनोदिनीला जाणवते आहे. आधीच सावध करावे अन तो संघर्ष टाळावा जणू अशा शुद्ध हेतूने ती नर्मविनोदाने एकमेकींचे

टोपणनाव एकमेकींसाठी 'चोखेर बाली ' (म्हणजेच चक्षुशल्य, शब्दशः डोळ्यात गेलेला, तेथे खुपणारा वाळूचा कण') ठेवते, बंगाली जनजीवनात टोपणनावे प्रचलित असतातच.

इथे सुरू होतो एक अजब उंदरामांजराचा खेळ. फक्त उंदीर कोण अन मांजर कोण हे शेवटपर्यंत कळत नाही, कदाचित मानवी विकारवशता, कदाचित घराच्या कोंडलेल्या सीमित अवकाशातील नियतीची शक्ती.. जगण्यातले इंद्रधनुष्यी रंग अन काळोखे कोपरे शब्दात उतरवणे हे रवींद्रांचे यश, मानवी स्वभावाचा, आयुष्याच्या रहस्यमयतेचा त्यांचा अभ्यास.

रात्रंदिवस उत्शृंखल प्रणयाचा अतिरेक होऊन महेंद्र अन आशाचे दांपत्यजीवन काळवंडते आहे, त्याचे रंग उतरत आहेत. विनोदिनी त्यांच्या परिघात एक नवी मिती, नवी ऊर्जा घेऊन आली आहे. या हुशार, सुशिक्षित, कलासंपन्न मैत्रिणीकडे ते ते आहे जे साध्याभोळ्या आशाकडे नाही. ती त्यांच्या दांपत्यजीवनात रंग भरते आहे, त्यांचा रोजचा आहारविहार, शृंगार नव्या कल्पकतेने सजवते आहे यातच आशा मश्गुल, खूष आहे. एका विचित्र उत्साहाने घरातलीच ही माजघरात लपणारी आश्रित मैत्रीण नवऱ्यासमोर आणावी, त्यांचा स्नेह जोडावा असे तिला या मैत्रीच्या भरात वाटते आहे. सरळ मनाच्या माणसांच्या बाबतीत अनेकदा घडते.

इकडे अन्नपूर्णेच्या प्रस्तावातून घरात आलेली, सुंदर भोळी पण गृहकृत्यकौशल्यविहीन सून आणि तिच्या मोहात आईला, आपल्या मेडिकलच्या अभ्यासालाही पार विसरणारा मुलगा राजलक्ष्मीला सलतो आहे. अशात विनोदिनी- जी मूलतः तिला स्वतःला सून म्हणून हवीच होती ती घरात एका विपरित परिस्थितीत का होईना आली आहे, घरातली सर्व कामे निगुतीने, अभिरुचीसंपन्नतेने करते आहे. महेंद्रलाही आशाच्या गावंढळपणाची विनोदिनीमुळे नवी जाणीव होते आहे, विनोदिनीच

आपल्याला खरे तर सुयोग्य होती हे आता त्याला कळले आहे. एकूण, विनोदिनीचे चोहीकडून लाड अन तिची आशाशी प्रच्छन्न तुलना घरात सुरू झाली आहे.

आणि विनोदिनी? तिचे अकालवैधव्याने, परिस्थितीने कोळपलेले तल्लख तेजस्वी व्यक्तित्व या दांपत्याचा शृंगार सजवताना, पहाताना पालवते आहे. नको नको म्हणत ती आणि महेंद्र एकमेकांच्या आसक्तीत गुरफटत जात आहेत, एकमेकांसाठी एकांतक्षण चोरून त्यांची माधुरी चाखत आहेत. एक आग तिच्या अतृप्तीतून तिने बिनदिक्कतपणे जागवली आहे. भोळ्या मैत्रिणीवर जिवापाड प्रेम करतानाच तिच्या संसाररसाचा थोडासा आस्वाद आपण घेतला तर काय बिघडते असा पवित्रा तिच्या धीट, पर्युत्सुक मनात जागला आहे.

चौकोनाचा चौथा कोन बिहारी! तो सारे पाहतो आहे, खिन्न झाला आहे. विनोदिनीबद्दल उघडपणे त्याने महेंद्रला धोक्याची सूचना दिल्यावर महेंद्रची प्रतिक्रिया भेकडपणाची आहे. तो बिहारीवरच आशेवर आधीपासूनच अनुरक्त असण्याचा आरोप करून त्याला घायाळ करून टाकतो. आशाही या न केलेल्या अमर्यादेचे ओझे उगीचच दीर्घकाळ वागवत रहाते.

विनोदिनी एकूण घटनांचे गर्भितार्थ जाणून जायला उठते तर तिच्या म्लान निराधारतेची दया येऊन तिला पुनः सर्वजण थांबवतात, तिला तरी कुठे मनोमन जायचे असते? मात्र या शल्यक्रियेत तिचे अधिक लक्ष बिहारीच्या सेवाशील, नि:स्वार्थ अन स्पष्ट्वक्त्याही व्यक्तित्वाकडे वेधले जाते, बिहारीलाही अधिक परिचयातून (जो एका सुंदर रंगवलेल्या वनभोजन प्रसंगी होतो) विनोदिनीच्या व्यक्तित्वातल्या बाह्यतः विलासी वाटणाऱ्या पण अंतर्यामी उपाशीपोटी तपश्चर्या करत बसलेल्या तापसीचा परिचय होतो. उभयतांमध्ये एक नवेच आणि खरे प्रेम जागते पण बिहारी

विनोदिनीच्या संशयातून बाहेर येत नाही. भरकटलेल्या महेंद्रच्या हाती विनोदिनीच्या नावेचे निरुपाय सुकाणू जाते.

पुनः विनोदिनी आणि महेंद्र.

दैनंदिन जीवन. असंख्य घटना. एकमेकांपासून दूर जाण्याच्या प्रयत्नात आकर्षणाचा वाढता आवेग. महेंद्रचे वस्तीगृहावर रहायला निघून जाणे. आशेच्या हस्ताक्षरात त्याला विनोदिनीची भाषा असलेली विरहव्याप्त पत्रे येणे. एकीकडे पत्नी आशाच्या निरागसतेमुळेही महेंद्रचे कासावीस होणे. शेवटी होतोच बोभाटा असल्या चोरट्या प्रेमाचा, मग बदनामी. आशाचे या दुहेरी विश्‍वासघाताने -नवरा आणि जिवलग मैत्रीणीवरील अमर्याद विश्‍वासाचा झालेला चुथडा- उद्ध्वस्त होणे. अभिमान अन अपमान दोन्ही भावनांत जळत रहाणे. विनोदिनीने घर सोडून आपल्या जीर्ण घरी मूळ गावी जाणे अन आता तिच्यासाठी लाजलज्जा सोडलेल्या महेंद्रने तिच्यामागोमाग तिथेही येऊन तिची बदनामी करणे. पुनः सर्वदिश निरुपाय होऊन त्याच्याबरोबर तिने गावोगाव फिरत रहाणे, मनात चढत्या श्रेणीने बिहारीच्या पवित्र, अविचल प्रेमाचे स्मरण करत.

शरदचंद्रांपेक्षा आटोपशीर अवकाशात अन कमी पात्रयोजनेत रवींद्रांनी आपला कथासंसार उभा केला आहे. त्याचे अक्षुण्ण सौंदर्य त्यातील मोजक्या व्यक्तींच्या ठाशीव चित्रणात आहे. स्वतः निर्माण केलेल्या नियतीशी झगडत यातले प्रत्येक व्यक्तिमत्व अधिक खुलत जाते आहे, जगण्याच्या अग्निपरीक्षेत तपःपूत होते आहे.

बिहारी.. सुरुवातीला उपेक्षित वाटलेला, स्वतःला इतरांच्या सेवेत लोपवून टाकणारा, एका अनाथ बालकाचे पालकत्व घेऊन त्यातच मन रमवणारा, लोकसेवेसाठी आपली मालमत्ता लोकार्पण करणारा बिहारी. हा बिहारी कादंबरीचे कथानक आणि विनोदिनी व आशा या दोन्ही टोकाच्या प्रवृत्तींच्या स्त्रियांचे मन वेगवेगळ्या प्रकारे

व्यापत जातो, अंती कथेचा खरा नायक ठरतो. उगीचच एक तुलना मनात येते.. एमिली ब्राँटेच्या वुदरिंग हाइट्स मधला हीथक्लिफ या अशाच सर्वांगीण उपेक्षेतून अंगभूत खलप्रवृत्तींच्या आहारी जाऊन प्रेमाच्या शक्तीचे सूडनाट्यात रुपांतर करतो. इथे उलट घडते. बिहारीच्या या संतप्रवृत्तीमध्ये बाधा एकच, त्याला सतत येत असलेला विनोदिनीच्या प्रेमाचा संशय. हे क्रमप्राप्तही आहे कारण त्याच्या नजरेला तर ती महेंद्रबरोबर गावोगाव वहावत जाताना दिसते आहे.

या पूर्ण कथानकात पत्रे, त्यांचे न मिळणे किंवा मुद्दाम हाती पडू न देणे किंवा ज्याला ती लिहिली आहेत त्याच्याऐवजी दुसऱ्यानेच ती वाचणे इत्यादि माणसांमधील संवादात बाधा आणणारे विक्षेप पुष्कळ आहेत पण कुठेही ते कृत्रिम वाटत नाहीत. फक्त बिहारीच्या अलाहाबादमधील घराच्या पत्त्याचा महेंद्रसहित गावोगाव भरकटणाऱ्या विनोदिनीला लागलेला शोध मात्र काहीसा फिल्मी योगायोग वाटतो. असले योगायोगही आयुष्याचा एक फार महत्त्वाचा भाग असतातच हेही तितकेच खरे! विनोदिनी तिच्याबरोबर प्रवासात असलेल्या महेंद्रला तिथे खेचत नेते अन बिहारीची प्रतीक्षा करत बसते तो कथाभाग या साऱ्या विपर्यस्त प्रेमकथेचा परमोच्च बिंदू आहे.

शेवटी बिहारी विनोदिनीला लग्नाची मागणी घालून कथानकाची परिपूर्ती करतो, आणि ती मात्र ते प्रेम स्वीकारून पण तो प्रस्ताव अव्हेरून विरागी अन्नपूर्णेबरोबर काशीला निघून जाते. राजलक्ष्मीची विनोदिनी अन्नपूर्णेजवळ, अन्नपूर्णेची आशा भरल्या घरसंसारात राजलक्ष्मीजवळ.

अनेक अर्थांनी सूक्ष्म सूक्ष्म काव्यात्म न्याय साधत, एका-एका व्यक्तीचे दु:खदाहातून झालेले विकसन दाखवत कवीचे कथानक पूर्ण होते तेव्हा आपल्या सौंदर्यजाणिवेत भर पडलेली असते, दु:खाची छटा काळीज व्यापून रहाते तरीही.

स्वतः रवींद्रांनी 'चोखेर बाली'चा शेवट असा असायला नको होता ही खंत नंतर व्यक्त केलेली आहे.

रवींद्रांनी जाणिवेच्या पातळीवर रचलेले हे कथानक मला नेणिवेतील एक चिरंतन व्यूह स्पष्ट करताना दिसते. स्नेह-प्रेमाचा या कथानकातील चौकोन आपल्या आत एखाद्या बहुभुजाकृतीसारखा बहुविध शक्यता वागवतो. तो एकीकडे अतिअर्वाचीन आणि दुसरीकडे अतिप्राचीन साहित्यातील मुक्त विचारांनी भरलेला आहे, भले आचरणावर संस्कारांचे दडपण असो.

भारतीय स्त्रीजीवनातले सुखदु:ख, पराकोटीचे परावलंबित्व, रुढीग्रस्ततेतले भयंकर अन्याय, त्यातून येणारी अतृप्ती, बळावणारी धिटाई व शेवटी पुनः परिस्थितीशरणतेचेच उन्नयन करणारा समाज त्यांनी शंभर वर्षांपूर्वी असा चितारला आहे की हे कथानक आजचेच वाटावे. त्यातल्या मैत्रीभावनेच्या चित्रणातील व्यामिश्रता तर कालातीत आहे. म्हणून तर शंभर वर्षांनी रितुपर्णो घोष सारख्या संवेदनशील दिग्दर्शकाला २००३ मध्ये त्यावर चित्रपट काढावासा वाटला.. म्हणून तर आजही या पुस्तकाचे वाचन हा एक समकालीन संवेदनांचा उत्सव वाटतो आहे..

## "फक्त तुझी जर दगडी भिवई": मर्ढेकर आणि ईश्वर

हासडल्या तुज शिव्या तरीही

तुझ्याच पायी आलो लोळत

मुठीत धरुनी नाक लाविले

तव डोळ्यांशी डोळे पोळत..

कवी बा. सी. मर्ढेकर आपल्या भूतकाळातून व मराठी कवितेच्या तत्कालीन वातावरणातून नेमक्या कोणत्या वळणावर मुक्त झाले हे त्या सर्वज्ञ ईश्वरालाच ठाऊक. पण तिथून मराठी कवितेतील कृतक क्षीणता संपली. बदलत्या अंतर्यामातले धीट प्रश्न स्पष्ट भाषेत अवतरले.

खंत कशाला जिरेल का रग
आकाशाची?जगेन पोळत
फक्त तुझी जर दगडी भिवई
चळेल थोडी डोळ्यांदेखत!

फक्त तुझ्या अस्तित्वाचा एक पुरावा दे, सगळी मानवी अगतिकता आणि जन्मवैफल्य त्या अनुभूतीवर ओवाळून टाकेन असे ठणकावून ईश्वरालाच सांगणाऱ्या या कवीची पाळेमुळे सनातन नासदीयसूक्तापर्यंत पोचली होती, जरी सामाजिक-औद्योगिक वास्तव नवे प्रश्न घेऊन छळत होते..

कधी जन्मली पृथ्वी? जमल्या
निळ्या वायुच्या लगडी सलग कधी? कधी
अन जडतेला त्या मनामनांचे आले पोत?
तेजाच्या अन निळ्या नळीतून
जसा फुलावा निळसर चाफा
सपोत संज्ञेमधून तैसा
अनुभूतींचा फुलला वाफा
कधी?.................

पण नासदीय सूक्तकाराला तेव्हा न पडलेला प्रश्न आता निर्माण झाला होता. बकाल सामाजिक पार्श्वभूमीवर अध्यात्मासमोरचे नवे आव्हान मर्ढेकरांनी कवितेतून निसटू दिले नाही.

........... पहावे तेजांतून ह्या काय?

कुणाला शोधावे अन?

दळभद्र्याच्या आग लागली

पायाखाली इथे अचेतन..

' स्व' चे प्रश्न शोधताना त्यांना समष्टीच्या वैफल्याने ग्रासले होते. त्यांच्यातला पूर्वाश्रमीचा छोट्या परिघातला भावकवी जळून गेला हे बरेच झाले. तरीही पूर्वसूरींच्या प्रभावाखाली लिहिलेली त्यांची आधीची कविता पुढील शक्यतेचे बीज आपल्या आशयगर्भात वागवत होतीच.

आता अंत कशास पाहसि? अता आभाळले अंतरी

विश्वाची घटना मला न उमगे, मानव्यता दुर्बळ

केले पाप असेल जे कधिं तरी मी जन्मजन्मांतरी

प्रायश्चित्त तदर्थ ना म्हणुनि गा पाठीवरी हे वळ?

तुझी कार्यकारणे तू कधीच स्पष्ट करीत नाहीस. कशाचेच कधी उत्तर देत नाहीस..

न्यायाच्या निज मंदिरात बसुनी साक्षी पुराव्याविना

किंवा काय गुन्हा असेल घडला सांगीतल्यावाचून

न्यायाधिश असेल मानव तरी शिक्षा सुनावीत ना

देवाची परि न्यायरीति असले पाळील का बंधन?

ईश्वरी न्यायव्यवस्थेला, तिच्या एकांतिकतेला हा मानवी प्रश्न- आमच्या कर्मभोगांच्या वाळवंटात स्मृतीभ्रष्ट अनाथ करून आम्हाला सोडून देतोस. ही तुझी कुठली न्यायदानाची रीत?

अपयश, प्रेमभंग या नेहमीच्याच घटना- अत्यंत सृजनशील व नैतिक निष्ठांचे ताण सोसणाऱ्या मर्ढेकरांच्या मनावर समग्र शक्तीनिशी हे आघात झाले तेव्हा त्यांचे कवी-रसायन अंतर्बाह्य बदलत गेले. पण विपरीत अनुभवांच्या या पहिल्या सत्रातही मर्ढेकर नास्तिक होऊ शकले नाहीत. त्यांच्या प्रतिभेची मूळ भूमी संतांच्या महाराष्ट्राचीच होती म्हणून त्यांची अभिव्यक्ती धिटावत गेली, एक त्रिशंकू अवस्थाही आली पण ईश्वराच्या अस्तित्वाबद्दलच शंका मात्र त्यांना कुठल्याही टप्प्यावर आली नाही.

हा ऋतु 'नतद्रष्ट गाथे'चा होता. तुकारामांचाच शब्दवारसा काळाने मर्ढेकरांच्या हवाली केला होता, त्याच जातकुळीचा जाणीवप्रवास.

माझा अभंग माझी ओवी | नतद्रष्ट गाथा गोवी

इंजिनावीण गाडी जेंवी | घरंगळे ||

आत्यंतिक आत्मिक संघर्ष. आधार ईश्वरापेक्षा वाटत होता तो संत कवींचा.

संत शब्दांचे नायक | संत अर्थांचे धुरंधर

एक शब्दांचा किंकर | डफ्फर मी ||

यातच वाट्याला आलेले महायुद्धाचे महावैषम्य. ईश्वराचे अस्तित्वच काय, जीवनातल्या सर्वच शिवमंगल गोष्टी कवीकल्पना वाटतील असे वातावरण.

प्रेमाचे लव्हाळे

सौंदर्य नव्हाळे

शोधू? आसपास

मुडद्यांची रास

यंत्रातून आग

गोळ्यांचे पराग

विमानाचे हल्ले

बेचिराख जिल्हे..

नव्या आशयांचे आभाळ शब्दांच्या कवेत येत होते पण त्यांचा आनंद मानायची ती वेळ नव्हती.

नाही कोणी का कुणाचा | बाप-लेक मामा-भाचा

मग अर्थ काय बेंबीचा | विश्वचक्री?

युद्धजन्य पोरकेपण. वैयर्थ. आयुष्याचे अवमूल्यन. हे सर्व जर ईश्वराच्या इच्छेने तर त्याची ही भयाकारी इच्छा कशी समजून घ्यायची?

आणि हो, अशाच वेळी अवतार घेण्याचे आश्वासन त्याने दिले आहे ना? कुठे आहे तो अद्भुत देह ज्यात परमेश्वरतत्त्व अवतरले आहे अमंगलापासून सुटका करण्यासाठी?

मग कोठे रे इमारत | जिचे शिल्पकाम अद्भुत

जींत चिरंतनाचा पूत | वावरे की?

प्रश्नांची धग वाढत चालली होती पण समोरून कोणतेच उत्तर नव्हते. पण ईश्वर कृपावंत होत नव्हता तरी कशावरून? अर्थश्रीमंतीने दाटलेली अशी कविता ही काय त्याचीच कृपा नाही? या कवितेत प्रश्न उमटतात तशी उत्तरेही दाटून येतात, ती त्याच्याकडूनच आलेली असतात ना?

शिवलिंग माझे लिंग | हेच अशांतीचे बिंग

ज्यांच्या झुंजे संज्ञारिंग | व्यापिले गा ||

ज्ञान आणि वासना याच्या खेचाखेचीत सापडलेल्या जिवाला ईश्वरी सहकार्य लाभते पण ईश्वरप्राप्ती होत नाही. स्वतःच्या मर्यादा कळतात तेव्हा ईश्वरी मौनाचा अर्थ उलगडतो.

वावडी वाह्यात माझी! पोकळीचा पिंजरा

सोड दोरी जाउं दे या कागदाच्या पाखरा!

आता मन हळुहळू शांत होऊ लागले. मर्ढेकर अस्वस्थतेच्या गाभाऱ्यातील एका स्वस्थतेचा अनुभव घेऊ लागले. इथे त्यांची प्रतिभा पुनः आसमंतातील सौंदर्यकणांजवळ रमली. मग ते न्हालेल्या गर्भवतीच्या 'सोज्ज्वळ मोहकतेने' नटलेले मुंबई बंदर असो की शुक्राच्या तोऱ्यात 'दंवात आलिस भल्या पहाटे' अशा कुण्या सुंदरीची शोभा असो.

जुन्या प्रेयसीची आठवणही स्मृतींच्या दालनातले एक तडा गेलेले चित्र बनून थांबली.

रहा तिथे तू जिथे आपल्या

हृदयामधली काच तडकली

आणि बिलोरी आशांमधुनी

काळाची बघ चीर उमटली.

विचित्र भाषिक प्रयोग, वैशिष्ट्यपूर्ण संज्ञाप्रवाही शैली या अंगाने मर्ढेकरांच्या जाणीवेचा प्रवाह रुंदावत गेला. प्रौढ समंजस खिन्नपणे मर्ढेकर कुंतीप्रमाणेच दु:खाची मागणी देवाकडे करू लागले.

या दु:खाच्या कढईची गा

अशीच देवा घडण असू दे

जळून गेल्या लोखंडातही

जळण्याची, पण पुनः, ठसूं दे

कणखर शक्ती, ताकद जळकट.

वास्तवाचा एका नव्या समजुतीने स्वीकार करणारे, जुन्या तक्रारींपासून मुक्त नाही पण अलिप्त झालेले कवी मर्ढेकर आता एका नव्या पसायदानाच्या लेखनास मानसिक दृष्ट्या सिद्ध झाले होते. ज्ञानेश्वर-तुकारामांनंतर कित्येक शतकांनी मायबोली मराठीला शांतरसात न्हायलेल्या शब्दांचा हा नवा अनमोल अलंकार लाभला..

भंगू दे काठिन्य माझे आम्ल जाउं दे मनीचे

येऊ दे वाणीत माझ्या सूर तूझ्या आवडीचे

ज्ञात हेतूंतील माझ्या दे गळू मालिन्य आणि

माझिया अज्ञात टाकी स्फूर्ती-केंद्री त्वद्बियाणी

राहू दे स्वातंत्र्य माझे फक्त उच्चारातले गा

अक्षरां आकार तूझ्या फुफ्फुसांचा वाहू दे गा..

एका कवीची आंतरयात्रा. त्याची शुद्ध होत गेलेली भक्ती भावना. एवढे सर्व झाले तरी परिपूर्ती मिळाली का? ईश्वरप्राप्ती झाली का? कलावंताला मानवीय मर्यादा असतात. पण अलौकिकाच्या किनाऱ्यावरले काही क्षण मात्र तो अनुभवल्याशिवाय रहात नाही. गंगाकिनारी एका शांत संध्याकाळी कवीने या सनातन संघर्षमय नात्यातली स्वतःची मर्यादा आदराने स्वीकारली, शब्दबद्ध केली.

या गंगेमधि गगन वितळले

शुभाशुभाचा फिटे किनारा

असशिल जेथे तिथे रहा तू

हा इथला मज पुरे फवारा!

## शरदबाबूंचा श्रीकांत

हे गोड गारुड पुनः अंगावर घेऊन वाचलं. त्याच्या बंगाली मिठाईसारख्या मधुररसात पुनश्च बुडून गेले अन त्यावर लिहिण्याचा मोह आवरला नाही!

मी शरच्चंद्र चट्टोपाध्यायांवर लिहावं असं काही नवीन नाही. इतकं सर्वमान्य प्रत्ययकारी लेखन.. त्याचा हा सर्वसामान्य परिचय. पण आताच्या कुणी वाचकांनी घेतला नसेल हा आनंद किंवा कदाचित कुणाला देऊ शकेनही थोडासा पुनःप्रत्ययाचा आनंद तर.. इत्यादि प्रतिवाद स्वतःशीच करत हे लिहिलं गेलंच. एक ऊर्मीच निर्माण करण्याची शक्ती असते अशा लेखनात.

सर्वप्रथम, आभार कै. भा. वि. (मामा)वरेरकरांचे, हा रस त्याच्या खास प्रादेशिक माधुर्याला धक्का न लावता मराठीत आणण्याचे काम त्यांनीच करावे! शरदबाबूंचे अंतरंग मित्रही होते ते अन दोन्ही भाषाभगिनींचे जाणकार. पुढल्या पिढ्यांसाठी हा कालातीत खाऊ आपण मराठीत आणलात मामा, अन्नदाता सुखी भव!

मामांच्या अनुवादाच्या त्या काळ्यापांढऱ्या ओळींत उतरत जातो आपण अन जगू लागतो एक वेगळा (१९३९ ची प्रथम आवृत्ती, नवभारत प्रकाशन संस्था- किती समर्पक नाव असल्या साहित्यकृती शरद-साहित्य-मालेतून महाराष्ट्रात प्रचलित करणाऱ्या कै. रघुनाथ दिपाजी देसाईंच्या संस्थेचं-), तरीही आपलाच अन आत्ताचाच वाटणारा स्थलकालखंड.

श्रीकांत शरदबाबूंची सर्वोत्कृष्ट कादंबरी मानली गेलीय. चार भागात कथानायकाने निवेदिलेली प्रदीर्घ आयुष्यकहाणी. कथाभाग, माणसं, संबंध, काहीच साधंसरळ नाहीय. कथानकाला वेढणारं वास्तव दुष्काळ, गरिबी, रोगराई, त्यातून उद्भवणारं क्रौर्य अन निर्ममता यात गुरफटलेलं आहे. पण या सगळ्यातूनही लक्षात रहाते ती अविच्छिन्न सुंदरता, वारंवार तुटणाऱ्या संबंधातूनही प्रत्ययास येणारी. आपल्याला जीवनाबद्दल आशावादी करणारी.

तथाकथित आस्तिकता, श्रद्धा, रुढी अन पांडित्य या मूल्यांना प्रश्न विचारणाऱ्या श्रीकांतच्या भोवतालातच उगवून आलेलं ईश्वरीय प्रेम, निरनिराळ्या रुपात विनटलेलं. ते त्याला भाग्याने मिळालं नाहीय, त्याने अर्जित केलंय ते.

"बाई मी विकत घेतला श्याम".. असे आयुष्यानुभव विकत घेतात श्रीकांतसारखी हिमतीची माणसं, सगळे बंध तोडून जगणारी, पण म्हणून स्वैर नव्हेत, आपल्याच

देवाकडे आपलंच तप आचरत असतात ही मंडळी. आयुष्याचा अर्थ शोधत जगण्याचं तप. त्यासाठी कोणतीही तडजोड नाकारण्याची व्रतंवैकल्यं.. प्रेम, मोह, भक्ती या प्रचलित गुळगुळीत शब्दांचा शब्दकोशाबाहेरचा अर्थ शोधण्याचं संशोधनकार्य.

तर ही एका प्रेमिकाची भ्रमणगाथा किंवा भटक्याची प्रेमकथा. कसेही. लौकिक आयुष्यात कधीही सफल होऊ न शकणाऱ्या एका प्रेमबंधनापासून पुनःपुनः दूर जाण्याचा विफल प्रयत्न.

पहिल्या भागातला बाल श्रीकांत उतारवयात आपल्या भटक्या आयुष्यातील आठवणी काढतोय. त्यासाठी तत्कालिन थोडासा पाल्हाळिक प्रस्तावनेचा मोह शरदबाबूंना झालाय खरा, पण लगेचच कादंबरीतले पहिलेच अद्भुत पात्र आपल्यासमोर ते हजर करतात. बाल श्रीकांतचं स्फूर्तीस्थान इंद्र. इंद्रनाथ.. त्याच्याहून वयाने थोडा मोठा. अफाट धाडस, कोवळ्या वयातली निरागस दयाभावना, जंगलात मध्यरात्रौ अलगुजाचे स्वर छेडण्याची, समोरच्याला मोहात प्रेमात पाडणारी नि:संग व्यक्तित्वातली मोहिनी. श्रीकांतच्या बालमनावर खोल अनुभवांचं गोंदण उमटवणारा हा मित्र त्याला घरातल्यांच्या अन विशेषतः त्याच्या दांभिक मोठ्या भावाच्या मते दु:साहसाला प्रवृत्त करत असतो. रात्रीअपरात्री घरातून पळून त्याच्याबरोबर होडीची सैर करायला जातो श्रीकांत, अन त्याला खरं जीवन कळू लागतं. खोट्या जीवनाचं बेगड पुढे आयुष्यभर श्रीकांतला भुलवत नाही याचं कारण हा इंद्र.

वानगी दाखल दोन अनुभव.

महामारीत मरून पाण्यात टाकलेल्या, सापडलेल्या मृत बालकाचा दफनविधी करणारा कोमलहृदय इंद्र..

"पाण्यात अर्ध्या बुडालेल्या सुरूच्या झाडाच्या जंगलात इंद्रानं त्या बालकाचं प्रेत मोठ्या ममताळूपणानं नेऊन जेव्हा ठेवलं, तेव्हा रात्र संपत आली होती. कितीतरी वेळ खाली वाकून तो त्या प्रेताच्या चेहऱ्याकडे पहात राहिला होता. फिक्कट चंद्र प्रकाशात त्याचा जो चेहरा दिसत होता, त्यावरून त्या प्रेताच्या दर्शनानं त्याच्या मनात उत्पन्न होणाऱ्या भावना त्याच्या कोमेजलेल्या चेहेऱ्यावर स्पष्ट दिसून येत होत्या..''

अशा भयाकारी तरी करूण अनुभवातही श्रीकांत त्याला प्रेताची जात विचारतो आहे अन इंद्र 'छट! मेल्यावर कसली आली आहे जात! 'असं त्रिकालाबाधित सत्य उच्चारतोय! ते प्रेत धन्यवादास्तव 'भय्या' असं स्पष्टपणे म्हणाल्याचं ऐकलंय इंद्राने, होडीत तो बाल प्रेतात्मा आपल्या मागे बसून राहिलाय हे जाणवून 'श्रीकांत रामराम म्हणायला लाग बाबा! ' असं गंभीरपणे सांगतोय इंद्र.. (या अघोरी, अगोचर जीवनक्रमात असे प्रसंग यायचेतच, पुढेही आलेत ते श्रीकांतच्या जीवनात).

हा इंद्र त्याला अन्नदाआक्कासारख्या विलक्षण स्त्री पर्यंत घेऊन जातो अन भारतातल्या कल्पनातीत 'स्त्रियश्चरित्रं' ची पहिली पण जीवनभर साथ करणारी खोल ओळख श्रीकांतला होते. मसणवटीजवळ रहाणाऱ्या व्यसनी गांजेकस मुसलमान शहाजीबरोबर असणारी त्याची 'सहधर्मचारिणी' (या शब्दाचा विशेष अर्थ नंतर कळतो श्रीकांतला) अन्नदा हिंदू आहे, मुसलमान प्रियकराबरोबर पळून आलेली आहे अशा संशयाने तिचा तिरस्कार करू पहाणाऱ्या इंद्रला तिच्याबद्दल अनामिक आकर्षणही आहे. त्यांच्याकडच्या सापाच्या मंत्र अन नागमण्याच्या आख्यायिकेसारखं काहीतरी गूढ वलय त्या फाटक्या स्त्रीभोवती आहे. शहाजी मरतो तेव्हा दोन्ही पोरांना कळतं की अन्नदा त्याची पत्नीच होती अन भरकटलेल्या धर्मांतरित पतीसाठी घरदार अन अब्रूही वाऱ्यावर सोडून त्याच्यामागे निघाली होती.. शुद्ध दारिद्र्यावस्थेतही ती मानी स्त्री नवऱ्याची देणी

फेडून अन या पोरांच्या मदतीचा हात नाकारून अज्ञातात निघून जाते तेव्हा श्रीकांतचा लहानसा जीव त्या स्वाभिमानाच्या तेजाने थरारून जातो.

इथून पुढे युवावस्थेतला श्रीकांत आपल्याला भेटतो तो एका वेगळ्या परिस्थितीत. आता तो त्याच्या शालेय काळातल्या एका युवराज मित्राच्या आग्रहावरून त्याच्या चाकरीत अन त्यातून पुढे त्याच्या एका खाजगी संगीत बैठकीला आलाय.

"जाऊन पाहिलं तो युवराज सज्ञान झाल्याचे पुरावे दिसू लागले" -खास श्रीकांतीय विनोद. गाणारी बाई पाटणा शहरातून बरेच पैसे घेऊन दोन आठवड्यांच्या बोलीने आलीय. ही प्यारी उर्फ राजलक्ष्मी.

अन्नदाआक्काच्या पातिव्रत्यानं अन स्वाभिमानानं खोलवर प्रभावित झालेल्या श्रीकांतने प्रेमाकर्षणात पडावं ते या गाणाऱ्या बाईजीच्या?प्रेम फजिती करतं माणसाच्या तत्त्वांची कारण ते अबोध मनातून येतं, स्वप्नांखालोखाल अनाकलनीय अशा या प्रांतातून वादळवारे वहात येतात, आपल्या तथाकथित उदात्त विचारांचा पालापाचोळा करतात.

ही गाणारी तरुण स्त्री, दारिद्र्यामुळे तिच्या परित्यक्त आईनेच विकलेली, दुर्दैवाच्या फेऱ्यात भरकटत गेलेली श्रीकांतची बालमैत्रीण, जिने एका बाल-मोहाने त्याला लहानपणीच मनोमनी वरलं असतं. श्रीकांतच्या ती गावीही नसते खरं तर. पण आता यौवनाच्या पहिल्या पायरीवर हे पहिलं प्रेम आताच्या तरुण राजलक्ष्मीच्या रूप-स्वरसंपदेचा झळाळ घेऊन श्रीकांतला अशी भूल घालतं जी पुढे जन्मभर पुरायची असते.

स्वतःला प्रश्न विचारत, दोष देत या अत्यंत संघर्षमय अशा नात्याच्या भोवऱ्यात पुनःपुन; खेचला गेलेला श्रीकांत कादंबरीभर दिसत रहातो पुढे. यातला सुरुवातीचा प्रसंग म्हणजे राजपरिवारात पैज लावून मध्यरात्री भयानक स्मशानात एकटा जाणारा अन प्यारीला व्याकूळ करणारा श्रीकांत.

"रात्रीला एक विशेष स्वरूप आहे. घोर रात्र डोळे झाकून ध्यानाला बसली आहे, सारं चराचर विश्व तोंड झाकून, श्वास कोंडून अतिशय सावधतेने त्या अचल शांततेचं रक्षण करत आहे. एकदम डोळ्यांसमोर सौंदर्याच्या लहरी खेळू लागल्या. वाटलं, प्रकाश म्हणजेच सौंदर्य असं कुठल्या भामट्याने सांगितलं? अंधाराला काय सौंदर्य नाही? ही लबाडी माणसानं कशी पचू दिली?"

शी:! हे सगळंच पुनः उद्धृत करण्याइतकं का सुंदर लिहिलंत शरद्बाबू? आणि थांबावं तरी कुठे? सगळंच लिहित बसावंसं वाटतंय. राजलक्ष्मीच काय, कुणीही प्रेमात पडेल अशी ही श्रीकांतची व्यक्तीरेखा कोणत्या मातीची घडवलीत? नि:संग तरीही पराकोटीची रोमँटिक, व्याकूळतेला नर्मविनोदाची जोड अन चिंतनाला काव्यमयतेची. अन राजलक्ष्मी म्हणजेही कुणीही ऐरीगैरी नाही. तीही तोडीस तोड विशेषच. तेव्हा तुमच्या एकूणच लेखनाच्या पुनःपुनः प्रेमात पडावं झालं.

या स्मशानात आलेल्या अतींद्रिय भयावह अनुभवांनी श्रीकांतची रात्र-सौंदर्यसमाधी उतरून बोबडी वळते तेव्हा त्याला वाचवतात राजलक्ष्मीने पाठवलेली तिची माणसंच. तरीही तो तिचा अन तिच्या प्रेमात गुंतत जाणाऱ्या स्वतःचा तिरस्कारच करत रहातो.

मग त्या वातावरणातून दूर, नेहमीच्या आयुष्यात परतून येतो. विसरतो हळुहळू प्यारीला बहुधा. पण 'कसल्या तरी अभावाची वेदना ' वागवत एके दिवशी पुन:

मंत्रभारितासारखा पाटणा शहरात जाऊन थडकतो. जवळचे अपुरे पैसे, प्रवासातलं अन्नपाणी कशाची चिंता न करता आयुष्यापासून अन स्वतःच्या प्रेरणांपासून पळून जाऊ इच्छिणारा हा विमुक्त भटक्या चक्क एका संन्याशाच्या मठीत जाऊन स्थिरावतो. आशेने की भलत्या जागी गुंतलेल्या आपल्या मनाला अध्यात्माचा आधार मिळेल.

श्रीकांतच्या मागोमाग भटकेपणाचा वसा घेतलेल्या वाचकालाही इथे चाकोरीबाहेरचे विश्वदर्शन घडायला सुरुवात होते. साधूसंन्याशांचं जग, त्यातले अंतर्विरोध अन विनोदही. भिक्षा मागायला जाताना सामोरी येणारी गृहदर्शनातली अन समाजजीवनातली केविलवाणी, दु:खभरी दृष्यं.

श्रीकांतचं या प्रवासातच संन्यास-दीक्षाग्रहण व्हायचं खरं तर, पण तो अंगभूत भूतदयेने देवीच्या साथीत एका छोट्या गावात एका मतलबी गृहस्थाच्या, त्याला कामापुरतं भाऊ मानणाऱ्या त्या गृहस्थाच्या तितक्याच मतलबी पत्नीच्या दोन आजारी मुलांसाठी स्वामींबरोबर प्रयागला प्रयाण मागे ठेवतो अन स्वतःच आजाराला जेव्हा बळी पडतो तेव्हा मात्र तेच कुटुंब त्याला पाऊसवादळातच तसेच तापाने फणफणलेले सोडून पलायन करते.

शुद्ध हरपण्याआधी श्रीकांतला एकच नाव आठवते, प्यारी बाईजी, अन एकच शहर. पाटणा. निरोप जातो. अन शुद्धही.

प्रवेश दुसरा. प्यारीने अपरिमीत सेवा करून वाचवलेला श्रीकांत तिच्या पाटण्यातल्या घरी आहे. इथे ती प्यारी नाही. जगाच्या नजरेत पुनः राजलक्ष्मी व्हायची तिची खटपट चाललीय. ज्या नवऱ्याच्या नाममात्र विवाहबंधनात ती पूर्वी विकली गेली

होती त्याच्या दुसऱ्या पत्नीच्या-तिच्या सवतीच्या- मुलावर अपत्यप्रेम वर्षवून ती गृहस्थी जीवनातल्या प्रतिष्ठित मातृप्रेमाचा अनुभव घेऊ बघतेय.

श्रीकांत, तिच्या बाल-गांधर्वविवाहातला तिचा मनोमनीचा प्रियकर. मनात जपलेला प्रेमाचा एकच चंद्र-कवडसा. पण स्त्रीला नेहमीच प्रेमापेक्षा मोह समाजातल्या संभावितपणाचा, आणि प्यारीसारख्या पतितेला ही संधी अधिकच महत्त्वाची. या द्वंद्वात सापडलेली ती प्रेमाच्या कर्तव्यात जराही कसूर करत नाही पण अवगुंठित शब्दात श्रीकांतला दूर व्हायला विनवते.

त्याला तरी कुठे हे हृद्-बंधन झेपत असतं? तिचं अभीष्ट चिंतून आजारातून उठलेला श्रीकांत दु:खी मनाने तिचा निरोप घेतो.

निरोप घेणं अन भेटतच रहाणं हे श्रीकांतच्या प्रेमकथेचं प्राक्तन आहे. एक पाश नाकारणारा, अगदी प्रेमातही स्वतःला बांधून घ्यायला अनुत्सुक, जवळजवळ संन्यासी वृत्तीचा दयामय पुरुष अन एक नाचगाण्याच्या बैठकी करणारी बाईजी. तिच्या परीने तीही संन्यासिनीच. शृंगारलेलं तनमन आतून व्रतांनी निराहारांनी सुकवणारी. कसल्याशा न केलेल्या पापांच्या परिमार्जनासाठी.

प्रत्येक निरोपाच्या वेळी भूमिका बदलत असतात. प्यारीच्या विनंतीवरून दूर गेलेला श्रीकांत त्याच्या स्वर्गस्थ आईने दिलेल्या शब्दातून, एका अवांच्छित विवाहातून स्वत:ला वाचण्यासाठी पैशाची तजवीज करायला पुनः लगेचच प्यारीकडे परतून येतो तर यावेळी त्याला ती गाण्याच्या बैठकीत दिसते.

झालं! गेल्यावेळच्या तिच्या गृहस्थी होण्याच्या धडपडीने दु:खातही प्रभावित झालेल्या सात्त्विक श्रीकांतच्या मनाचा भडका होतो. तो तोंड घेऊन ब्रह्मदेशात जायचा मनोदय प्यारीला बोलून दाखवतो. प्यारी विरोध करते.

"बायकांची जात आजवर जे बोलत आली तेच मी सांगणार आहे. लग्न करून संसारी व्हा.''

पण हे खरंच मनापासून का? जेव्हा श्रीकांत त्याच्या आईने ठरवलेल्या नियोजित विवाहापासून मुक्त होण्यासाठी तिच्याकडे पैसे मागतो, तेव्हा धाबे दणाणलेली राजलक्ष्मी पैशांची मोठ्या तत्परतेने व्यवस्था करते तेव्हाच दोघेही समजून चुकतात की दोघांनाही एकमेकांशिवाय गत्यंतर नाही!

इथे श्रीकांत तिचा पुनः निरोप घेतो, यावेळी दीर्घकाळासाठी. ब्रह्मदेशाला पैसे मिळवण्यासाठी प्रस्थान हे या पलायनाचे नवे नाव.

शरदबाबूंनी अत्यंत बारकाव्यांनी, नर्मविनोदाने चितारलेला कलकत्ता -रंगून समुद्रप्रवास, त्यातला जलप्रलय, रंगूनमधलं जीवन अन विशेषतः मुक्त स्त्री जीवन, तेथल्या बंगाल्यांचा अन भारतीयांचा अर्थातच दुटप्पी नीती-अनीतीव्यवहार, जातीभेदाची, धर्माची सैलावलेली बंधनं अन त्या पोकळीत बोकाळलेला अनाचार. या दीर्घ विदेश-अध्यायाबद्दल एकच शब्द. मास्टरपीस.

विस्तारभयास्तव या स्थलांतराच्या एकूण प्रचंड आवाक्यातून एकच स्त्री व्यक्तिरेखा उल्लेखावी लागेल. तेजस्विनी अभया. एका मित्राबरोबर (रोहिणीदादा)

आपल्या परागंदा पतीच्या शोधात रंगूनला आलेली, त्या अनुभवात आपटी खाल्यावर त्या एकतर्फी प्रेम करणाऱ्या मित्राच्या प्रेमाला न्याय देण्याचा काळाच्या खूप पुढे असलेला निर्णय घेणारी. समाजाला अन श्रीकांतसारख्या प्रवासात जोडलेल्या सुहृदालाही अप्रिय वाटणारा तो निर्णय धीट प्रतिवादात पटवून देणारी. या साऱ्या वादग्रस्त जीवनशैलीत गोते खाताना एकीकडे पुन :रुग्णांची सेवा करताना नेहमीप्रमाणे स्वत;च आजारी पडलेल्या श्रीकांतची (त्याचा हा छंदच असावा इतक्या वेळा ही परिस्थिती आलीय कादंबरीत. कथानायकाच्या हृदयातली माणुसकी!) कसल्याही समाजभयाची, लोकापवादाची पर्वा न करता सेवा करणारी अ-भया.

आणि कसले ते समाजजीवन! गरिबी अन साथीच्या रोगांनी बुजबुजलेले. लौकिक जीवनाचे पाश सोडून मनःपूत भरकटणारे श्रीकांतचे तारू आजारातून उठण्यासाठी रंगूनच्या नोकरीतून रजा घेऊन पुनः कलकत्ता बंदरात आलेय. उतरून घ्यायला आलीय राजलक्ष्मी. शांत स्थिर राजलक्ष्मी मनात काहीसा हेतू धरून आपल्याला अनुग्रह देणाऱ्या गुरुंकडे काशीक्षेत्री श्रीकांतला घेऊन जाते आहे. इथे श्रीकांतला तिच्या वेगळ्याच अनुकंपेचं दर्शन घडतं. काशीमध्ये परित्यक्त अन विधवा स्त्रियांना तिने तिच्या घरी आश्रय दिलाय. आपल्यासारखीच त्यांची परवड होऊ नये म्हणून. पण प्रयागात चार लोकांसमोर तिच्यासमवेत स्नानास जायला श्रीकांत लोकापवादाला घाबरून नकार देतो तेव्हा चिडलेल्या राजलक्ष्मीचे पुनः बाईजी प्यारीमध्ये परिवर्तन होते, पुनः मुद्दाम श्रीकांतला दुखावणारे वर्तन. पुनः ताटातूट. भावप्रदेशातले बदलते ऋतू.

डोक्यात राख घातलेला श्रीकांत आता ब्रह्मदेशी जाण्याअगोदर एकदा वडिलांच्या नातेवाईकांनी कब्जा केलेल्या घरी भेट द्यावी म्हणून येतो. नुकताच आजारातून उठलेला, प्रवासाची दगदग व मानसिक ओढाताणीने थकून गेलेला श्रीकांत पुनः मलेरियाच्या चपेट्यात सापडून या घरी कोसळतो.. तापाच्या गुंगीत तो असताना त्याचे पैशाचे पाकिटही चोरीस जाते तेव्हा अटळ नियतीसारखा एकच मार्ग उरतो श्रीकांतसाठी. राजलक्ष्मीला पैशासाठी पत्र घालणे!

व्याकुळलेली राजलक्ष्मी पैशांसहित स्वतःच हजर होते श्रीकांतच्या वडिलोपार्जित घरी तेव्हा सर्व नातलगांच्या उंचावलेल्या नजरांना तशाच उंचावलेल्या मानेने तो खुलासा करतो, 'ही आपल्या पतीची सेवा करायला येथे आलेली राजलक्ष्मी!' स्वतःच्याच भीरुतेवर मात करून आतापर्यंत लोकांपासून लपवलेल्या लोपवलेल्या प्रेमाचा जाहीर स्वीकार करण्याचं सामर्थ्य राजलक्ष्मीच्या निरपेक्ष त्यागामुळे, सेवेमुळे त्याच्यात आले आहे.

एक विशिष्ट टप्पा गाठलेला आहे जीवनातल्या आंदोलनांनी, पण कथानक फक्त अर्ध्यावर आलेय इथे. भाग एक व दोन संपलेत.

आता सांईथिया अध्याय सुरू होतो. राजलक्ष्मीने गाण्याबजावण्यातून कमावलेल्या बऱ्यापैकी पैशाचा व इस्टेटींचा दानपत्र-व्यवहार करून टाकलाय. 'शुद्धीकरण' मोहीम.

मुख्यत्वे मागास व डोंब वगैरे मागासवर्गियांच्या गंगामाटी नावाच्या सांईथिया परिसरातील एका गावी घर घेऊन ती श्रीकांतसहित तेथे नव्या आयुष्याचा श्रीगणेशा करू पाहतेय. पुनः तिच्यातली राजलक्ष्मी अवखळ मनस्वी प्यारीवर मात करतेय. ती व्रतंवैकल्यं, भजनपूजन, गावात बरेपणा मिळवून देणारे लोकव्यवहार अन यातून निर्माण होणारी एक खूप लोकमान्य प्रतिमा याच्या आहारी गेलीय. श्रीकांत तर मिळालाय. आता त्याला गृहित धरणे चालू आहे. अर्थात अभावितपणे.

श्रीकांत पुनः विद्ध अन पराभूत आहे. प्रेमाची पूर्ती अन परिणती जर प्रेमहीन वास्तवात व्हायची असेल तर आजवर कसल्या मृगजळाकडे तो लोभावत होता, झेपावत होता? त्याची मूळ नि:संगता जागतेय.

"माझे डोळे सहसा पाझरत नाहीत. प्रेमाचा भिकारी होण्याची वृत्ती माझ्या ठायी नाही. जगात मला कसलीच अपेक्षा नाही. कुणाकडून मला काही मिळालं नाही, दे दे म्हणून हात पसरायला मला शरम वाटते...... माझ्या अंतरंगात झोपी गेलेलं वैराग्य चट्कन दचकून जागं झालं नि म्हणालं, 'छे, छे, छे!'

या गंगामाटीकडे येणाऱ्या प्रवासात वज्रानंद हा तरुण, खळाळत्या उत्साही व्यक्तिमत्त्वाचा डॉक्टर-संन्यासी भेटलाय त्या दोघांना, लोकसेवेसाठी घर सोडून औषधांचा पेटारा डोक्यावर घेऊन गावोगाव फिरणारा, ब्रिटिशांच्या जुलुमांविरुद्ध लोक-जागरणही करणारा खास बंगाली युवा-राष्ट्रभक्तांचा प्रतिनिधी. संन्याशाचा परिवेश घेतलेला. धाकट्या भावासारख्या या लोभस व्यक्तीच्या सहवासात राजलक्ष्मीमधली प्यारी पुनः जागते अधुनमधून, श्रीकांतलाही एक सुहृद गवसतो, एवढंच काय ते विश्रांतीस्थान एकाकी मनाला त्याच्या.

उरलेल्या वेळात(अन तो वेळ खूप आहे शिवाय रिकामाही आहे-) पुनः सुरू होते श्रीकांतचे परिसरातल्या गरिबी अन रोगराईने गांजलेल्या जनजीवनात मिसळणे, दु:खितांची निरपेक्ष सेवा करणे, भ्रमत भरकट्त रहाणे. कर्मकांडग्रस्त राजलक्ष्मीची नजर चुकवून (कारण आजारातलं अशक्तपण साथीला आहेच कायमचे.). अशातच दीनांची सेवा करत अज्ञात ठिकाणी गरीब ब्राह्मणाच्या घरी एके दिवशी प्रकृती ढासळून श्रीकांतचे कोसळून पडणे.

ही तऱ्हेतऱ्हेची घरे, ब्राह्मणांची, अंत्यजांची, धर्मांतरितांची, गरीब विस्थापित गौहर-गोसाईसारख्या फकीर संप्रदायी, बाऊल पंथीय कवी-मुसलमानांची, त्यातल्या अनेक व्यक्तिरेखा, प्रसंग यांचा उल्लेखही येथे विस्तारभयास्तव करता येत नाही पण

असे वाटते की एका लेखकाने असे जगावे, वास्तव असे पहावे तेव्हाच त्याची वाणी लेखणी इतकी सिद्ध होते, तेव्हाच तो खरा विश्वकुटुंबीय विशाल मनाचा होत जातो.

इकडे श्रीकांत घर सोडून बेपत्ता झाल्याने राजलक्ष्मीचे डोळे उघडलेत. पण पुरते नाहीत.. पुंटू नावाचं आणखी एक उपकथानक घडून गेल्यावर राजलक्ष्मीला आपल्या कृतक-वैराग्याचा, कर्मकांडांचा फोलपणा कळायचाय..

"आणि ते सुखासमाधानाने राहू लागले" हा शेवट येण्यापूर्वी श्रीकांतही अजून एका जगावेगळ्या मृदुल स्नेहात गुरफटायचा आहे. या स्नेह-बंधाचं नाव आहे वैष्णवी कमललता.

आता वैष्णवांचं जग. भक्तीमय भजन पूजनाचं, पण रुक्ष कर्मकांडाच्या विरुद्ध धृवावरचं. मधुराभक्तीच्या माधुर्यानं ओथंबलेलं. शरदबाबूंनी जगातली कितीतरी जगे - वर्तुळातली वर्तुळे- रेखाटलीत आपल्या महाकादंबरीत. सगळ्या जगण्याचं शरद-सृष्टीत रुपांतर करणारे किती बारकावे, पापुद्रे..

श्रीकांत राजलक्ष्मीच्या उपेक्षेला अन कर्मकांडांना कंटाळून तथाकथित रजा संपवून ब्रह्मदेशाला जायचा पुनः विचार करतोय. त्याआधी एकदा स्वतःच्या गावी गेला आहे. इथे वैष्णवांच्या मेळ्यात श्रीकांत बालमित्र गोहरमुळे ओढला जातो अन कमललतेच्या रुपात बंगालच्या मधुराभक्ती-पंथाच्याच प्रेमात पडतो.

कमललता, राजलक्ष्मीइतकी सुंदर नाही, पण बैरागी मनाच्या, राजलक्ष्मीच्या प्रेमात पोळलेल्या श्रीकांतला असह्य मोहविण्याइतकी लाघवी. राजलक्ष्मीसारख्याच

दुर्दैवाच्या फेऱ्यात सापडून संन्यासाचा आश्रय करून रहाणारी. श्रीकांतबद्दल वाटणाऱ्या मोहाचं दमन अन उन्नयन करून त्याचा निरोप घेणारी बुद्धिमती स्त्री.

प्रीतीची शरदबाबूंनी या कादंबरीत चितारलेली दोन स्त्रीरुपं. प्यारी बाईजी अन संन्यासिनी कमललता.. आतून एकमेकीत मिसळलेली. अन्नदाआक्का अन अभया ही स्नेहमय प्रेरकतेची अशीच द्वैती स्त्रीरुपं.

अनेकानेक उपकथानकांचा, रतनसारख्या सपोर्टिंग रोलमधल्या अनेक अविस्मरणीय व्यक्तिरेखांचा उच्चार न करता इथे मी हे लेखन संपवते. हातात घेतलेलं पुस्तक खाली न ठेववणं हे परम वाचनीयतेचं लक्षण. असा आनंद देणारी पुस्तकं मिळतात तेव्हा तो आनंद दोन्ही मुठींनी परिसरावर उधळून द्यावासा वाटतो.

मलाही तो मोह आवरला नाही..

**निर्मितीप्रक्रिया- बोरकरांच्या शब्दात..**

काही शब्द वर्षानुवर्षे आपला पाठपुरावा करतात. त्यांच्या अर्थांच्या सावल्या अवतीभोवतीच्या छायाप्रकाशात सरमिसळल्यासारख्या वाटतात. त्यांची संदर्भसूत्रे रोजच्या घटनामध्ये विखुरलेली दिसतात. या अशाच घटनांमधून हे शब्द जन्मले होते.. कोणताही शब्द पोकळीत थोडाच संभवतो?

असल्या या शब्दांची एक तर जन्मवेळ खडतर असते किंवा जन्मदाते जोरकस असतात.. कठीण शब्दांना न बिचकता बोलायचे तर त्यांच्यामागचा अनुभवव्यूह इतका प्रभावी असतो की ते शब्द जणू प्रति-अनुभव असे सदैव चैतन्यमय, प्रेरणादायी ठरतात..

"मृगजळीचा मीनचसा वणवणलो मी दिगंत

ऊन आज थकून जरा सांजावत घे उसंत

'रण आरूण वन दारूण भ्रमलो दिग्मूढपणे
तीच आज पायतळी तृणकुरणे जलपुलिने

प्रतिबिंबित प्राणांतून बघून असा नजराणा
गवसे मज प्रसवाकुल पहिला काळोख पुनः''

कविश्रेष्ठ बा. भ. बोरकरांचे हे शब्द.. एका समग्र आयुष्याचे वर्तुळ पूर्ण करुन समेवर येणारे शब्द.

उन्हाने तळपणाऱ्या, भयाने कोळपून टाकणाऱ्या, संवेदनाहीन करणाऱ्या घटनांना ओलांडत प्रवासाअन्ती कवि एका सुखद टप्प्यावर आलाय.. त्याच्या पोळलेल्या पावलांखाली लहरी नियतीने आज चक्क 'काव्यगत न्यायाचा' सिद्धांत मान्य करुन हिरवी कुरणे अंथरलीत, त्याच्या भगभगलेल्या डोळ्यांसमोर शीतल निळी तळी दिसू लागलीत. आजवरच्या त्याच्या प्रवासाची एका अर्थी सुखद सांगता झालीय.

एका गोष्टीत मात्र कोणताही बदल झालेला नाही.. त्याची साथसोबत त्या कष्टमय प्रवासात करणारी त्याची प्राणसखी प्रतिभा या सुंदर समृद्ध क्षणीही तशीच पल्लवित झालीय जशी ती पूर्वीच्या वैशाखवणव्यात त्याला आतून जगण्याचे बळ देत होती. निर्मितीचा पहिला काळोख, तो प्रसवाकुल काळोख.. वेदनांनी व्याप्त, पण नवनिर्मितीची ग्वाही देणारा. त्याचसाठी तर सगळा अट्टाहास. प्रतिकूल काळात

अनुभवलेला तो काळोख आजही या अनुकूलतेच्या ऋतुमध्येही त्याला नव्याने गवसतोय.

असे झाले म्हणूनच ही हिरवीनिळी शीतल समृद्धी त्याच्यासाठी सुखान्त आहे. अन्यथा..

मग ही परिपूर्त अवस्था.

काही शोधायाचे नाही : सारे इथेच येणार

काही मागायाचे नाही: माझा हातच देणार

दिठी उलटली आत प्राणां लागले पाझर

आता घागरीत भरे सारा रूपाचा सागर

हा रूपवाद, ही सौंदर्यासक्ती, त्यांच्या जीवनशैलीचेच वैशिष्ट्य, सामर्थ्य, आणि म्हणूनच अटळपणे त्यांची मर्यादाही.

शिडे पांढरी स्वप्नवेडी दिगंती धुक्यातील जैशा प्रभेच्या तृषा

सुरूच्या वनातून काळोख हिंडे करूनी जरा गारव्याची नशा

विषादातला गोडवासा खुळा मी अकेला जसा चंद्र माडांतला

खिरोनी जरी बिंबतो जागजागी कळेना असे कोण यांच्यातला

तम-स्तोत्र लिहिणाऱ्या या कवीने काळोखाचे आणि प्रसवाकुलतेचे अनन्य नाते सतत कवितेत आणले आहे. काळोख, जो प्रतिभेच्या प्रकाशाचे कोंदण असतो.

घटका घटका काळोखातच बसून असतो असा

उरातला गोंजारत नवख्या शब्दांचा कवडसा

लवलवता तो स्रवतो आंतर-चंद्राचा वारसा

उमाळुनी तळ नकळत होतो गगनाचा आरसा

काळोखातच पडे कवडसा असे गोड हे जिणे

त्यांत भोगिता चवदा भुवने खुंटावे बोलणे..

या तिमिरात सुरांचं आणि स्पर्शांचंही जग अधिक तीव्रतेने उलगडत जातं.

कधी पीळ भरून लकेर उठे

तिमिरामधुनी तिमिरात मिटे

पुळणीवर मी मज विस्मरता

पायात अचानक लाट फुटे

काळोख, एकांत, आत्मविस्मृती, निर्मिती.

मग निर्मितीचा आणि प्रीतीचा संबंध काय?

कवितेचा आणि जगण्याचा संबंध काय?

सुखद असो दु:खद वा

वरद तुझे स्मरण सखे

पाऊस वा ऊन असो

हृदयी कविताच पिके..

इतका साधा आहे तो संबंध आणि इतका सर्वव्यापी. चेतनादायी सखीला स्मरणारा आणि त्याच वेळी ज्या परमसख्याचे प्रतिभा हे देणे आहे, त्याला क्षणही न विस्मरणारा.

झिणीझिणी वाजे बीन

सख्या रे, अनुदिनी चीज नवीन

सौभाग्ये या सुरांत तारा

त्यांतून अचपळ खेळे पारा

अलख निरंजन वाजवणारा

सहजपणात प्रवीण..

अशी निर्मितीक्षमता असण्यासाठी कविचे हृदय ही गोष्ट खासच असली पाहिजे. बोरकरांच्या शब्दात, त्यांचे चित्त म्हणजे नित्यनिरंजनाची प्रतिबिंबे साकारणारा आरसा. अभिमान लपत नाही त्यांच्या शब्दातून, श्रीमंती लपवण्यासारखीही नाही ही.

"कायाकल्पित सिद्ध शब्द असले नि:शब्द साकारती

मायानाट्यविलास जेवी विभूचे ऐश्वर्य विस्तारिती

माझे चित्त सकंप गूढ विभूचा चित्रस्रवी आरसा

त्याचा विश्वविकाससंविद असा वर्धिष्णु वा वारसा''

या सृजनशीलतेची शक्ती कशी? तर जग वन्ही होते तेव्हा गुप्त-शीतल-धारांनी मनाला भिजवणारी.

"सृजनाच्या आधारशिलेवर पाय रोवुनी अचल रहा

अश्रद्धेचा कलह माजता दिगंबराची शान पहा

अंगातून अंगार पेटता ज्योत दिसे तो मोज दहा

त्या ज्योतीचे कढ गिळुनी तू चिरकरुणेने द्रवुनी वहा''

मग हा पुनरुच्चार, हे अभिमानी निमंत्रण कवीने दिलेले, त्याच्या प्रियेला? त्याच्या ज्ञात अज्ञात सुहृदांना-वाचकांना? की निर्मात्यालाच?

" मी रंगवतीचा भुलवा

मी गंधवतीचा फुलवा

मी शब्दवतीचा झुलवा

तुज बाहतसे

मी प्रणयकळेचे हासू

मी कणवकळेचे आसू

का खोट्या विनये बासू?

सुख वाहतसे..

................................

ये बिंबून घे लवलाही

माझा न भरवसा काही

भरतीच्या धुंद प्रवाही

मी पोहतसे..''

बोरकर, तुमच्या निर्मितीक्षेत्राचा शोध घेताघेता या रस-धुंद प्रवाहांत खेचले जातो आम्ही, किती सुखाचे हे डुंबत रहाणे..

**'' हिंदू : जगण्याची समृद्ध अडगळ" - वाचनाचा एक समृद्ध अनुभव**

खूप खूप वर्षांतरी हातात घेतलेलं तुमचं पुस्तक, नेमाडे. तसं हे पुस्तक २०१० मध्येच आलेलं, पण माझ्या हातात अलिकडेच आलं ते. आताही फार निवांतपणा नव्हताच वाचनात, पण मला लिहितं करण्याचं सामर्थ्य आजही जाणवलं तुमच्या शब्दांच्या तीव्र रसायनामध्ये.

तुमची एका अत्यंत एकेकालीन चाहती मी, मला तुमच्या पांडुरंग सांगवीकरचं कोसला तितकंसं आवडलं नव्हतं, पण 'बिढार', 'जरीला ' आणि ' झूल' या चांगदेव पाटील कथित कादंबरीत्रयावर मी फिदा होते. फिदा तुमच्या शैलीवर.

तुमची शैली, जी शब्दबंबाळ नसताही हृदयमोहिनी होती अशी ती शैली, जी वास्तव तपशीलांना क्षणात अद्भुताच्या स्तरावर हिंडवून आणत होती. एक आयुष्याच्या वाळवंटात अथक चालत जाणारा प्रतिभावंत साक्षात सामोरा आणत होती..

चेकॉव्हच्या नाटकांसारखं कंटाळवाणं जगण्याचं वास्तव अन त्याच्याच आतून आतून उमडणारे कथानकांचे रहस्यमय झरे.. माणसांच्या गाठीभेटी, कवितात्म रोमांच संपवून पुनःपुनः एकटेपणाच्या वर्तमान समेवर येणारे, विसावणारे आत्मसंवाद. वादांच्या, विद्वेषांच्या कटू विनोदांच्या विरत जाणाऱ्या गलबल्यातून जागणारे, आयुष्याच्या आशयक्षेत्राचा शोध घेणारे आत्मसंवाद.

कादंबरी चतुष्ट्याच्या अंती 'हिंदू' ची घोषणा तेव्हाच तर झाली होती..

पण 'हिंदू' आली नाही, खूप खूप वर्षे लोटली. वास्तव अवास्तवपणे बदलत गेलं. बाजारपेठा विस्तारल्या, जग आकसून जवळ आलं. माहिती तंत्रज्ञान महास्फोट ते मोबाइल फोन्स, फेसबुक, संपर्कसाधने वगैरे वगैरे चावून चऱ्हाट झालेल्या उलाढाली.

पण जगणं का कोण जाणे, आतून बदलल्यासारखं वाटलं नाही. तुमची पुस्तकं बुकशेल्फवरून हलवावीशी वाटली नाहीत. 'हिंदू'चा विसर मात्र पडत चालला. तुमच्या प्रतिभेकडे जुन्या तोलामोलाचं सांगण्यासारखं काही राहिलं असेल का अशी कधीतरी शंका आली अन विरून गेली. तुमचं युनिव्हर्सिटीतलं अस्तित्व साहित्यकार नेमाडेंच्या स्मारकासारखं वाटू लागलं दुरून पहाताना, क्वचित ऐकताना. तुमच्यातला समीक्षक-संस्कृतीअभ्यासक तरी टिकून आहे ना, बेश झाले, असं स्वतःला समजावलं झालं.

तुमच्या भाषेत सांगायचं तर, 'सामसूम. किती एक शतकांची. नि:शब्द. '

आणि तीस वर्षे की जास्त काळ घेऊन 'हिंदू- जगण्याची समृद्ध अडगळ' आली. ही ती 'हिंदू' नव्हती. चांगदेवच्या आत्मकथनाची कादंबरी. हिचा कर्ता पुरुष होता तरुण, खंडेराव विठ्ठल. अध्यापक नव्हे, मानववंश संशोधक. पुरातत्वज्ञ. महाराष्ट्राच्या दोन महादैवतांचं नाव एकवटून घडवलेला हा घसघशीत नायक, पुनः एकदा 'कारा' च (अविवाहित.. हे कसलं आकर्षण तुम्हाला तरुण अविवाहितच नायकाचं कळलं नाही, जे आयुष्य उलटल्यावरही टिकून राहिलं?!), त्याची ठसठशीत विद्वत्ता आणि त्याच्या हृदयातली कवितेची मऊ सुगंधी भूमी.

इतक्या वर्षांचा उपास फिटला.

तर या खंडेरावाला शोधायचाय मानववंशांच्या जाणिवांचा इतिहास.. हवेवर हवेने लिहिलेल्या प्राचीन हकीकती! कोण कुठून कुठे गेले? कुठे कसे वंशसंकर झाले? जेते कोण / जीत कोण? नगररचनांच्या, भांड्यांच्या, नर्तकींच्या अलंकारांच्या मागे कोणाकोणाच्या जाणिवा श्वसत होत्या? त्यांचे विकासविनाश कसे झाले? काय शाबूत राहिले?काय झिजून गेले? जुन्या लिपींचे, चिन्हांच्या चित्रखुणांचे काय झाले? त्यांचे अर्थ किती कसे लावावेत? इथे आजच्याच कवितांचे अर्थ लावताना धापा लागताहेत.

.. असे प्रश्नोपनिषद, नेमाडे, इतक्या कलात्मकतेने तुम्ही पुनः समोर आणलेत. जुन्या वस्त्रांचे दिमाख मिरवावेत तशी तुमच्या महाकादंबरीची पानं डोळ्यांसमोर झगमगली. तितक्याच काळजीपूर्वक जुनेरांच्या चिरगुटांमधले कऴकट काळो़खही सांभाळून पोचवलेत तुम्ही. तुमच्यातला यशस्वी कादंबरीकार अन त्याच्याही मागे लपलेला एक कवी यांचे हे कारभार. बाकीचे नेपथ्य मानववंश, भारतीय उपखंडातले पुरातत्व अन तत्त्वज्ञान, जातीव्यवस्था अन शोषणाचे आकृतीबंध वगैरे भरपूर वादग्रस्त विधानांना पोसणारे. तुम्हालाही आवडच या सगळ्याची पूर्वापार.

सिंधूसंस्कृतीच्या अभ्यासाचा कॅनव्हास घेतल्याने आणखीन एक झाले नेमाडे, भारत आणि पाक म्हणून जे दोन भूभाग नकाशावर दिसतात, त्यांच्या सीमांच्या धारदार पात्यांची तुम्ही रेशीमपाती केलीत. तुम्ही प्रत्ययास आणलेल्या अद्भुताचा हा आणखी एक विलास. खऱ्या अन शिवाय कवीमनाच्या अभ्यासकाकडून कराची अन मुंबईतली साम्यस्थळं कळली. दिलवरच्या धाब्यावरची रंगीत गर्दी, उर्दू शेरोशायरी अन पंजाबी कव्वाल्यांची उधळमाधळ. यातच महानुभाव मठातल्या संन्यासिनी तिरोनी आत्याचा शोध घेण्याचा खंडेरावचा प्रयत्न. गाव सोडून वडिलधाऱ्यांनी नवसात बोललेला संन्यास घेऊन ऐन तारुण्यात महानुभावांच्या मार्गाने काबूलपर्यंत निघालेली, फाळणीत हरवलेली तिरोनी आत्या. पण बिचारी कशाने? घरोघर संसार करणाऱ्या का नाहीत बिचाऱ्या? खराच प्रश्न.

या सर्व तुमच्या कथानकातल्या खानदेशीय स्त्रिया. त्यांची नावेही मानववंशांचा मोठा दीर्घ प्रवास सांगणारी. तिरोनी हा त्रिवेणीचा अपभ्रंश, हरखू हा (खंडेरावच्या लभानी- खंडेरावाच्या मते खऱ्या हिन्दुस्तानी आर्यवंशाचे लोक- प्रेयसीचे नाव) शरयूचा अपभ्रंश. मोहेन-जो-दारो कडून खानदेशात उतरत आली माणसे. शब्द अन त्यांची अर्थ यथाशक्ति सांभाळत. असो. असे सगळे गुंताडलेले संदर्भ एका विशाल भारतीय उपखंडाचा एकात्म जीव दाखवणारे. 'इंडियनपाकी' सौहार्द.

खंडेरावाला तरुण पुरातत्वसंशोधक दाखवल्यानेही एक झाले नेमाडे, उत्खनन अर्धेच टाकून त्याला मृत्युशय्येवरील वडिलांकडे मोरगावला पिटाळणे तुम्हाला सोपे गेले.

एकूणच सगळे सोपे गेले.

लाहोर ते खानदेशातलं मोरगांव.

पाकिस्तान ते भारत.

आठवणी ते वर्तमान.

प्रवासातली ग्लानी ते जागृती.

मानववंशांच्या कथा ते अद्‌यतन भ्रष्टाचारांच्या कथा.

गावगाड्यातल्या जातीजमातींच्या, बाराबलुत्यांच्या, हिंदू शैलीतील 'प्रेमाने केलेल्या 'शोषणाच्या कथा, ऐतिहासिक कथा. वना अरण्यांच्या, पशुवंशच्छेदनांच्या लोककथा.

केवढं जाळं विणलंत. स्थलकालाच्या पटावर फिरवलंत विराट जत्रेत पाळण्यात बसवावं तसं जिवाला. दमवलंत. पण विस्कळित नाही म्हणणार मी तरी त्याला. ही समृद्ध अडगळच तर मांडायची होती तुम्हाला.

तसा तुमचा पिंड कथेकऱ्याचाच नेमाडे, एरवी कथेला नावं ठेवता तुम्ही. म्हणून हे शैलीदार कवितात्म लिहून तुम्ही काळोखे कोनाडे तयार केलेत व्यामिश्र अर्थांचे, स्मरणगंधांचे. सोप्या कथांच्या भोवतालात. सगळ्यात महत्त्वाच्या तुमच्या स्त्री प्राक्तनाच्या कथा, एखाद्या बाईच्या सकवार हातानं, पाझरत्या मनानं लिहिलेल्या.

या कथा जशा खंडेरावाच्या आयुष्यात घडलेल्या, तशा त्याने आज्यापणज्यांकडून ऐकलेल्या. गरती स्त्रिया अन लभाणी ग्रामवधूंच्या. बाईने बाईचा केलेला छळ अन बाईने बाईला केलेली मदत. एक अपौरुषेय महाभारत सतत घडणारं पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये.

तिरोनीआत्या, सिंधूमावशी, सधन, गरीब शेतकऱ्यांच्या घरातल्या स्त्रिया एकजात गरीबच पण. कामावलेल्या, लेकुरवाळ्या, काही कोवळ्या वयात बाळंतपणात अज्ञानाने दगावणाऱ्या सुमनताईसारख्या. लग्नगाठ बांधून दिल्यावर नशिबाचा वाट्याला आलेला भोग निमूट सोसणाऱ्या. अकालवैधव्य सोसणारी, नणंदांनी सासूने पिडलेली सुंदर असहाय सोनावहिनी. अन्यायाविरुद्ध लढणारी नशिबाला प्रत्युत्तर करणारी एखादीच चिंधूआत्या. अन युरोपीय डॉ. मंडी- या सर्वजणींचा अभ्यास करणारी मुक्त विदुषी. लंडन विद्यापीठातील प्राचीन भारतीय पुरातत्वाची प्राध्यापिका. आत्मनिर्भर.. इथे. पुनः त्या युरोपीय स्त्रियांच्या आत्मनिर्भरतेची सांस्कृतिक, सामाजिक, खाजगीत जीवनातली कारणं. खास तुमच्या संवादशैलीत उलगडत जाणारी.

मॅजिकल रिऍलिझम अगदीच नाही कसा म्हणावा या कथाकथनांत? त्या अंगाने तसं अनेकदा लिहिलेय तुम्ही, एक-दोन ठिकाणी तरी प्रत्यक्षतेने आलाय तो. जसा खंडेराव-यक्ष संवादात. यक्षप्रश्न असा-'अनन्य मौल्यवान आहेर कोणता?' यावर खंडेरावाचे उत्तर -' 'पिंजाऱ्याच्या सकीनाने दिला होता तो. ' ही अजून एक कथा. 'औरतां किदरबी एकच्चे' म्हणणाऱ्या सकीनाची. (इथे हेही नोंदवलं पाहिजे की अशा

मुस्लीम गरीब स्त्रियांचंही फार सहृदय चित्रण केलंय तुम्ही. कमरुन्निसासारख्या कमनशिबी. गरिबी, अज्ञान, बाईपण.. मुस्लीम संदर्भातलं. असो.)

अशा या कृषिप्रधान संस्कृतीत, सधन शेतकरी महानुभावी बहुजनसमाजी जाणिवा पेलत वाढलेला खंडेराव, एकुलता एक सगळीकडून कुटुंबात. जिवलग मोठ्या भावाच्या अकालनिधनामुळे एकटा पडलेला मनाने. पण कर्तव्यग्रस्त नुसताच. प्रस्थापितांना, समाजातल्या शोषणकर्त्यांना नावं ठेवताना त्याने ब्राह्मणद्वेष्टी विधानं जागोजाग केली आहेतच, पण तो आपल्या सधन शेतकरी परंपरांनाही बरोबर ओळखून चितारतो.

'कृषिसंस्कृती आप्पलपोटी संस्कृती.. '- कारण ती वनसंस्कृती, भटक्या संस्कृतीच्या पोटावर पाय ठेवून फोफावलेली आहे हे मत प्रत्यक्ष अनुभवलेल्या या व्यक्तिगत सलामधून आले असावे.

त्याच तीव्र प्रामाणिकतेने खंडेराव स्वतःच्या आतल्याही शोषणपरंपरांचं भान असलेला असा आहे. रेनी नावाच्या धनगर मुलीकडे अन हरखू या गावातील लभानी सुशिक्षित युवतीकडे आकर्षित होऊन अर्थातच प्रेमजीवनात असफल होणारा. बहुजनसमाजातल्याही जातीय उतरंडीला ओलांडून जाऊ न शकणारा. भाष्यापलिकडे, वाद घालण्यापलिकडे ठोस काहीही करू न शकलेला न-नायक.

शेवटच्या पर्वात पुनः जुनी विद्यापीठीय भंकस, भ्रष्टाचार, स्थानिक पत्रकारिता वगैरे जुने वळण घेतलेतच तुम्ही नेमाडे, पण तोपर्यंत क्षुधा पूर्ण शमली होती. दुधाची तहान शतशतकांच्या घट्ट बासुंदीवर भागवल्यावर पुनः हे पाणचट ताक समोर.

वडिलांच्या प्रेतयात्रेने संपते ही अनेकलेल्या एकाच्या जाणिवेची महाकादंबरी. शोभेश्या इतमामाने. वारकरी पंथाच्या निळूकाकांपासून ते महानुभावी पारायणांपर्यंत ते

खाजासाहेबाच्या पीरापर्यंत सर्वांचा मान राखत ही महायात्रा थांबत थांबत, शोक पचवत रिचवत अखेरच्या मुक्कामाला जाते.

आता नवा कुटुंबप्रमुख खंडेराव.

नव्या प्रश्नांनी व्याप्त, व्याकूळ.

नव्या स्वप्नांच्या भोवऱ्यात गरगरत त्यांच्या मनोरम रचनांचे अर्थ जाणून घेऊ पहातोय.

हे असं स्वप्न-सुषुप्ती-जागृतीच्या सीमारेषेवर शेवटी आणून सोडलंत, बरं केलंत नेमाडे.

मोकळंमोकळं केलंत गुंत्यातून, गुंत्याची जाणीव देऊन. त्या समृद्ध अडगळीचा वारसा पसाऱ्याने समोर ठेवून.

## कोठडी- स्वातंत्र्यवीर सावरकर: एक अधुरे शब्दशिल्प

*(स्वा. सावरकरांनी दि. २६-०२-१९६६ रोजी प्रायोपवेशन करून वयाच्या ८३ व्या वर्षी देहविसर्जन केले. त्यांचे नम्र स्मरण.)*

"लिंपुनि शिंपुनि जें । कायतरी

सजविसी दिवस भरी

बंदि मंदिर तें। एकादा

महाल वा सोनेरी?"

अजि नचि केवल या। बंदिच्या

भिंति त्या भुयारांच्या

रक्षिति अवसेसी। माझ्या ज्या

पासुनिया पुनवेच्या

"तरि रे कोठडीच्या। या क्रूरा

भिंती तोडुनी धीरा

झटशील तरी होई। न क्वचित का

पूर्ण मुक्तता शक्या?"

पूर्णा? अजि ना ना । मातीच्या

भिंति भंवति या साच्या

दगडी भिंती दुज्या!

"आशा सोडिना या जगतीं

दगडांच्याही या भिंती

धुळीला रे मिळती

तटहि किती

तडकूनिया तुटती!"

तरिही काय? अहो । आंशिक ती
शक्य”पूर्ण" ना मुक्ती
या तटांपुढती। बंदिच्या
क्षितिजांच्याही भिंती!

"परिसूं परि आम्ही । कुणीकुणी
त्याही ओलांडोनी
वृत्तींच्या क्षितिजा । वरिलीची
पूर्ण मुक्तता त्यांनी!"

रंगात उषेच्या आणी । सांजेच्या
चित्रिलें विश्वकर्म्यानें। ज्या साच्या
आकाश छता त्या।”मी"च्या।
हलक्यांच्या हंसू-असूंच्या या।
झोपाळ्यावरतीचि झुलत तया
पाहत होतों कीं। होतें जों
दिसत तोवरीं तरि त्यां!

स्वा. सावरकरांच्या कोठडी या कवितेचे हे हाती आलेले स्वरूप संस्करण पूर्ण न झालेल्या कवितेसारखे तर आहेच, शिवाय त्यात प्रक्षिप्त/ पुनः लिहून काढताना अपभ्रंश

/अर्थविपर्यास झालेले शब्द असण्याचीही शक्यता वाटते कारण त्यांचा अर्थ नीटसा लागत नाही, शेवट अपुरा वाटतो. कवितेबरोबरच उपलब्ध असलेल्या कुण्या आत्मीयाने लिहिलेल्या ओळी अशा आहेत -

"अंदमानात कैद्यांना स्वत:ची कोठडी स्वत:च साफ करावी लागे. ती साफ करतांना तात्यांच्या मनात आलेले विचार या कवितेतून त्यांनी मांडले."

दिलेले शब्दार्थ: अवसेसी-हा निराशा-तिमिरात गुरफटलेला काळ, पुनवेच्या- मुक्त जीवनाचा आनंदी दिवस."

बस्स इतकेच. इतक्या सामग्रीवरून एका तेजस्वी, एकाकी जीवनाचे एक नि:श्वसित चितारायचे आहे.

थोडी पूर्वपीठिका. १९११ मधे अंदमानच्या अंधारकोठडीत स्वा. सावरकर पन्नास वर्षे कारावासाची शिक्षा भोगण्यास प्रविष्ट झाले! पार्श्वभूमी होती मदनलाल धिंग्रांनी केलेला कर्झन वायलींचा वध, ज्याचे थेट लंडनच्या आगाखान यांनी इंग्रजांची मर्जी सांभाळण्यासाठी घेतलेल्या लब्धप्रतिष्ठितांच्या शोकसभेत स्वा. सावरकरांनी शोकप्रस्तावाला जाहीर विरोध करून केलेले समर्थन, त्यांच्या 'अभिनव भारत' या संस्थेच्या वाढत चाललेल्या क्रांतीकारक हालचाली, सावरकरांचे अग्निगर्भ लेखन, त्यातून सिद्ध झालेले खुदिराम बोस व अनंत कान्हेरेंचे हौतात्म्य.

"शुक पंजरी वा हरीण शिरावा पाशी| ही फसगत झाली तैशी |

भूविरह कसा सतत साहू या पुढती | दश दिशा तमोमय होती |"

आपल्याच वरील कवितेत आर्तव्याकुळ भाववादळात उन्मळलेले सावरकर आता कठोर निर्धाराने कोठडीत स्थिरावले होते.

तेथे होता पाहुणचार दंडाबेडी अडकवून टांगले जाण्याचा, तेल गाळणाऱ्या कोलूस जुंपले जाण्याचा, अंधारमय भयावह एकांतवास सोसण्याचा.

त्या तशा वातावरणातही सावरकरांनी तेथे संप घडवून आणले, तेथल्या छळाच्या वार्ता बाहेरच्या जगास पोचवल्या, साक्षरतेचे (अन क्रांतीच्या रचनात्मक पैलूंचीही शिक्षण देणारे!) वर्ग तेथे चालवले, निकृष्ट अन्नाविरुद्ध आवाज उठवला, तेथल्या देशभक्त कैद्यांचे जीवन सुसह्य केले.

या सगळ्या रक्तरंजित दमनकथेत कवितेचे काय करायचे? परिस्थितीपुढे हार न मानणाऱ्या महाकवीला कुणी कागद पेन्सीलही द्यायला तयार नव्हते कारण त्या लेखणीचे ओजच तर संपवायचा डाव होता..

याच कोठडीच्या भिंतीवर घायपात्याच्या काट्याने महाकाव्य लिहिण्याचा अश्रुतपूर्व संकल्प सावरकरांनी मग केला.. याशिवाय बऱ्याचशा कविता त्यांना मुखोद्गत असत व सुटका होऊन बाहेर जाणाऱ्या कैद्यांकडून त्या पाठ करून घेऊनही स्वातंत्र्यवीर त्या जगापर्यंत पोचवीत. या अत्यंत प्रतिकूलतेत किती कविता नि:श्वसितांसारख्या विरून गेल्या असतील किंवा मूळ स्वरूप बदलूनही बाहेर पोचल्या असतील.

ही कविता अशांपैकी एक वाटते.

तर ती ही कोठडी. कैद्यांनी आपली आपण साफ करायची.

कवितेत दोघेजण बोलत आहेत. अर्थातच कोठडीच्या एकांतवासात दुसरे कोण असणार आहे? सावरकरांचा स्वतःशीच संवाद चालला आहे. आणि तो बऱ्यापैकी पुरेसा नाही का? त्यांच्या तोलामोलाचा संवाद त्यांच्याशी साधणारे असे कोण आहेत खरोखरी एरवीही?शिवाय त्यांच्या आतमध्येच किती भूमिका गजबजल्या आहेत. एक महाकवी, एक विज्ञाननिष्ठ संशोधक, धर्मविशारद, इतिहास-अभ्यासक, भाषा-शुद्धीकरण विचारक, ज्योती;शास्त्रज्ञ, एक क्रांतीकारी स्वातंत्र्यसेनानी, एक समाजसुधारक, एक राष्ट्रचिंतेत राहून गेलेल्या अध्यात्मसाधनेचा उपासक.. एकाच आयुष्यात हे सारे साकारायला एरवी वेळ पुरला नसता पण हा बंदीवास कसा कनवाळूपणे मदतीला आला अन मुक्त चिंतनाला वाव मिळाला आहे!

या कवितेतले दोघे म्हणजे स्वातंत्र्यवीरांच्या दोन वृत्ती आहेत, किंचित दोलायमान, कामात रंगून जात भवतालाला न्याहाळणारी एक 'जगणारी' वृत्ती तर तिला खोचून, डिवचून, प्रश्न विचारून, आत्मविकासाच्या शक्यता शोधायला लावणारी दुसरी वृत्ती -अलिप्तपणे 'बघणारी '..

'या सनातन जीवनवृक्षावर दोन सुंदर पंखांचे मित्रपक्षी रहातात. एक पक्षी झाडाची फळे चाखतो, जगतो, दुसरा पक्षी केवळ पहिल्याला साक्षीभावाने 'बघतो.. '

"द्वा सुपर्णा सयुजा सखाया समानं वृक्षं परिषश्वजाते

तयोरन्य: पिप्पलं स्वादत्त्यनश्यन्ननो अभिचाकशीति"

मुंडकोपनिषदातल्या या श्लोकाची आठवण देणारा हा आत्म-संवाद..

पहिल्या कडव्यात प्रश्नकर्ते सावरकर स्वतःलाच कडू उपहासाने विचारताहेत-

"लिंपुनि शिंपुनि जें । कायतरी |सजविसी दिवस भरी|

बंदि मंदिर तें। एकादा | महाल वा सोनेरी?"

"दिवसभर लिंपून शिंपून काहीबाही सतत सजवतो आहेस ती ही तुझी कोठडी की एखादा भपकेबाज राजमहाल?'‘

उत्तर असे आहे-

-अजि नचि केवल या। बंदिच्या| भिंति त्या भुयारांच्या |

रक्षिति अवसेसी। माझ्या ज्या | पासुनिया पुनवेच्या |

या फक्त माझ्या बंदिवासी भुयाराच्या भिंती समजू नकोस! माझ्या अमावास्येचं, माझ्या निराशेचं माझ्या आनंदापासून, माझ्या मुक्तीपासून त्या रक्षण करताहेत!!

प्रश्नापेक्षाही तिरकस उत्तर! ही अंधारकोठडी माझ्या आयुष्यातल्या निराश काळो़खाचं आनंदप्रकाशापासून रक्षण करते आहे!

'नाथाच्या घरची उलटीच खूण ' तसं हे उत्तर. अन्यायाने मिळालेल्या कारावासाची केलेली ही स्तुतीमिषाने केलेली निंदा, की पुनवेचा आनंद खऱ्या अर्थाने समजण्यासाठी आधी काळोखी निराशा पूर्ण उपभोगावी लागते याची जाणीव?खरे तर दोन्ही!

संवाद पुढे सुरूच आहे..

"तरि रे कोठडीच्या। या क्रूरा |भिंति तोडुंनी धीरा

झटशील तरी होई। न क्वचित का| पूर्ण मुक्तता शक्या?"

पुढचा प्रश्न-" अरे वेड्या, ही कोठडी सजवायचे सोडून या क्रूर भिंती धैर्याने तोडून का टाकत नाहीस?निदान पूर्णपणे मुक्त तरी होशील!"

-पूर्णा? अजि ना ना । मातीच्या |

भिंति भंवति या साच्या| दगडी भिंती दुज्या!

उत्तर साधेच आहे. किंचित विमनस्क. कसे शक्य आहे पूर्ण मुक्त होणे? या कोठडीच्या भिंती मातीच्याच आहेत पण याभोवती दुसऱ्या विशाल दगडी भिंतींचा तट आहे ना.

.. सावरकरांना आठवत असेल तो मार्सेल्सच्या सागरात उडी घेऊन सुटकेचा केलेला एक विफल प्रयत्न! तिथे थोडी तरी आशा होती. त्या तसल्या गारढोण पाण्यात त्या क्षीण शरीराने केवळ इच्छाशक्तीच्या बळावर फ्रान्सचा किनारा गाठला होता. इतके झाल्यावरही वैफल्य पदरी आले होते.. आंतरराष्ट्रीय संकेतांचा भंग करून दंडेलशाहीच्या बळावर ब्रिटिश पोलिसांनी त्यांना पकडले होते व आंतरराष्ट्रीय न्यायालयातही न्याय मिळाला नव्हताच. इथे अंदमानात तर सुसज्ज छळछावणी होती.. आपल्या 'काळे पाणी' या कादंबरीत सावरकरांनी अंदमानच्या काळ्या पाण्याच्या शिक्षेतून पळून जाण्याचा शोकान्त विफल प्रयत्न चितारला आहे त्याअर्थी त्यांनी निदान कल्पनाशक्तीने तो विचार अजमावून तो पर्याय खोडून टाकला असला पाहिजे.

पुनः नवे प्रश्नावर्त, अधिक खोलात जाणारे-

"आशा सोडिना |या जगतीं| दगडांच्याही भिंती

धुळीला रे मिळती|तटहि किती|तडकूनिया तुटती!"

" असा हताश होऊ नकोस रे! या जगात दगडांच्या भिंती धुळीला मिळतात ना? प्रचंड तटही लाटांच्या माऱ्याने तडकून तुटतात मग तुझ्या प्रयत्नाला का नाही यश येणार?"

याही प्रश्नाचे स्वतःलाच दिलेले उत्तर- आताचे हे उत्तर या कवितेला अकल्पित वेगळ्याच उंचीवर नेणारे, तपस्वी-तत्त्वज्ञाचे उत्तर-

-तरिही काय? अहो । आंशिक ती|शक्य"पूर्ण" ना मुक्ती

या तटांपुढती। बंदिच्या |क्षितिजांच्याही भिंती!

या भिंतीमधून सुटका ही सुद्धा आंशिक सुटका आहे, पूर्ण मुक्ती नाहीच कारण या जीवनाच्या बंदिवासाला क्षितिजाच्या भिंतींची राखण आहे!

एका विलक्षण वीरवृत्तीच्या आणि त्यागी आयुष्यानुभवातूनच सिद्ध होऊ शकते अशी दृष्टी, असे ज्ञात्याचे पाहणे. बंदिवास तर पाचवीला पुजला आहे. ही जन्मठेप, नंतरचीही स्थानबद्धता- आयुष्यालाच बेड्या पडल्या आहेत पण विचार मात्र शुद्ध होऊन निवळत चालले आहेत या अग्निपरीक्षेत. हळुहळू बंदिवासाची तात्कालिक खंत विरत चालली आहे अन आता एका विशाल मुक्तीसाठी मन आसुसले आहे, अंतरातला साधक जागा झाला आहे. नवा अर्थ असा आहे की हा बंदिवास म्हणजे केवळ एकांतसाधना. अस्तित्वाशी निगडित प्रश्न सोडवण्यासाठी हा एकांतवास घडला आहे..

मग शेवट. समापन-

"परिसूं परि आम्ही । कुणीकुणी|त्याही ओलांडोनी

वृत्तींच्या क्षितिजा । वरिलीची|पूर्ण मुक्तता त्यांनी!"

आता प्रश्नकर्ता अन उत्तर देणारा दोघेही प्रकट चिंतनात गढून एकमेकांत विरून जाताहेत कारण ते वेगळे नाहीतच मुळी!

पहिले सावरकर (अवतरणचिन्हात ज्यांचे प्रश्न अन विचार आले आहेत ते) हे उत्तर ऐकून म्हणत आहेत,''आम्हीही ऐकले आहे की ती पूर्ण मुक्ती म्हणे मनोवृत्तींचेही क्षितीज ओलांडून गेलेल्या कुणाकुणाला लाभली आहे..''

ते येथे आतल्या-अंतर्यामातल्या- आकाशाच्या क्षितिजाबद्दल बोलताहेत. हे क्षितीज मनोवृत्तींच्या चंचल सुंदर रंगात रंगलेले.. या कवितेसारख्या मनोरम भावतरंगात निथळलेले.. या मोहमय क्षितिजाला जे ओलांडून जातात तेच मुक्त होतात.. आपल्याला ती तसली मुक्ती हवी आहे, लहानसहान 'सुटका' नाही. किरकोळ लाभांसाठी हा जन्मच नाही.. म्हणूनच इथे कवितेलाही सजवण्याच्या, संस्करण करण्याच्याही खटाटोपापलिकडे कवी गेला आहे असे दिसते, आपल्या प्रतिभापुष्पाबद्दलही तो निर्मोही झाला आहे. त्याची अंतर्दृष्टी जागली आहे. क्षितिजापलिकडचे क्षितीज त्या अंतर्दृष्टीसमोर उघडते आहे.

अन दुसरे सावरकर, आतापर्यंत प्रतिवाद करणारे, कोठडीच्या झरोक्यातून दिसणाऱ्या खऱ्या आकाशाच्या तुकड्यावर डोळे जडवून समारोप करत आहेत..

रंगात उषेच्या |आणी । सांजेच्या चित्रिलें विश्वकर्म्यानें। ज्या साच्या

आकाश छता त्या।”मी"च्या। हलक्यांच्या हंसू-असूंच्या या।

झोपाळ्यावरतीचि झुलत तया |पाहत होतों कीं।

होतें जों |दिसत तोवरीं तरि त्यां!

'मी'पणाच्या हलक्याशा सुखदु:खांच्या हिंदोळ्यावर झुलत मी आकाशाचं छत न्याहाळतोय... सकाळ होते अन दिवस हळुहळू संध्याकाळीकडे झुकतो.. ते सारे अनुपम रंग या आकाशपटावर विश्वकर्मा कुशलतेने चितारतो.. जोपर्यंत रात्रीच्या कृष्णच्छाया दाटून सारे दिसेनासे होत नाही तोवर मी डोळे भरून पाहत रहातो हे रंगांचे खेळ.

.. इथे अचानकपणे मूक होतो हा संवाद.. जणू संध्याछायांमध्ये दिवसाचे लोपणे, रात्रीच्या शांत प्रहरांची सुरुवात.


हे जे बाहेरचं अन आतलं आकाश आहे ना, ते अंधारकोठडी अन जन्मठेप असल्या शब्दांना घाबरत नाही. आतलं आकाश पहाणारी कोठडी आहे शरीरमनाची, अस्तित्वाची मर्यादा. अन बाहेरच्या आकाशाखालची कोठडी आहे अर्थातच विटा-माती-दगडांची अंदमानची कोठडी. कैदी दोन्ही अर्थांनी कोठडीच्या चतु:सीमा केव्हाच ओलांडून गेला आहे. तो इथला होताच कधी? तो तर आकाशाचा अधिकारी आहे.


सावरकरांची ही अनघड कविता खनिजद्रव्यांनी भरलेल्या खाणमातीसारखी वेगळ्या अर्थाने मूल्यवान आहे. त्यांचा स्वतःशीच चाललेला संवाद, त्यांनी स्वतःचेच निराशेतून बाहेर येण्यासाठी केलेले समुपदेशन, जाचक बंधनातून स्वातंत्र्यप्रिय मनाला सोडवण्यासाठी केलेले अंतिमार्थाचे मंथन या कवितेत विखुरलेले आहे, ही कविता नसून जणू त्यांच्या दैनंदिनीचे एक पान आहे.. एका समृद्ध गहन व्यक्तिमत्वाचा प्रकाशकिरण पडून उजळलेला हा झरोका आहे.

आपण केवळ कल्पनाच करू शकतो त्या दिनक्रमाची,

आणि मग वंदन करतो त्या आयुष्याला. नि:शब्दपणे..







*'सावरकरांची समग्र कविता" आणि "माझी जन्मठेप खंड१ व २ : ले स्वा. सावरकर" ही पुस्तके ई पुस्तक स्वरूपात उपलब्ध असून ई साहित्य प्रतिष्ठानच्या VIP सभासदांना विनंतीनुसार ई मेलद्वारे विनामूल्य उपलब्ध करून दिली जातील. संपर्कासाठी esahity@gmail. com*

**अशोक नायगांवकरांची 'वाटेवरची कविता '**

अशोक नायगांवकर मुख्यत्वे आपल्या मंचीय कवितेमुळे महाराष्ट्राला सुपरिचित आहेत. अलिकडे झी मराठीच्या हास्यसम्राटसारख्या कार्यक्रमाचे परीक्षक म्हणून त्यांचा परिचय अधिक कानाकोपऱ्यापर्यंत झाला. कदाचित या गदारोळात त्यांची मूळ कवी-ओळख झाकोळली गेली..

दापोली येथे होणाऱ्या कोमसापच्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणून निवडून आलेल्या आपल्या काळातील या विनम्र, प्रतिभाशाली पण ते प्रतिभेचे देणे underplay करणाऱ्या या कवीला सलाम. त्यांचा एकच कवितासंग्रह म्हणजे 'वाटेवरच्या कविता. ' (अजून एक 'कवितांच्या गावा जावे' हा इतर काही कवींना बरोबर घेऊन प्रकाशित झालेला प्रातिनिधीक कवितासंग्रह.)

येथे 'वाटेवरच्या कविता' (ग्रंथाली प्रकाशन) मधील कवितांबद्दल मी लिहिणार आहे..

ही वाट आहे शहर आणि खेड्याला जोडणारी. महानगरातील कित्येकांच्या प्राक्तनाची वाट. जिची वास्तव दिशा आहे खेड्यातून शहराकडे. जिच्या मनाची ओढ आहे शहरातून खेड्याकडे.

पण ते मनातलं खेडं आहे तरी कुठे शिल्लक?? तिथंही एक विपर्यस्त शहरच उभं आहे आता.

ही वाट म्हणूनच स्वप्नामधील गावाला पारखी आहे.

तसा बराच वेळ घेऊन प्रकाशात आलेला हा एकमात्र कवितासंग्रह नायगांवकरांच्या कवितेवरील निष्ठेची खूण आहे. जी समग्रता त्यांना आपल्या शब्दात उतरवायची आहे ती मोठी अ-काव्यात्म आहे. समकालीन विज्ञानापासून ते व्यापार व्यवहारापर्यंत जे काही घडते आहे ते नायगांवकरांना कवितेच्या घरात आणायचे आहे. त्यांच्याच शब्दात,

'अगदी मनापासून आम्ही आमच्या अक्षरांना

घरात आणले आणि

दु:खाच्या चढणी-उतरणीवर सर्वस्व बहाल केले. '

हे 'घरात आणणं' आठवण करून देतं ते 'आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने' असे सांगणाऱ्या त्या कुणाएकाची. त्याचं देणं अजूनही मराठी रक्तामधून वाहतं आहे, मराठी कवितेतून असं उमटतं आहे.

एकूणच अस्सल मराठमोळ्या अशा या कवितेला महानगरात परकं-पोरकं वाटतं आहे. जगण्यासाठी जवळ केलेलं हे शहर तिच्या आत्म्याभोवती अदृष्य साखळदंडांसारखं खळखळतं आहे.

'नंतर नंतर व्हावचरं बनवणारे

कॉरस्पाँडन्स करणारे लोक

शहरात राहू लागले

आणि कुळीथ,तूर,उडीद,बाजरी

पिकवणारे येडे खेड्यातच राहिले.. '

ग्रामीण शेतकीप्रधान महाराष्ट्राची ही व्यथा, ही पीडा अशोक नायगांवकरांच्या कवितेचा स्थायीभाव आहे. शहर आणि खेडे हा संघर्ष अनेक द्वैतात्मक रूपांनी त्यांच्या कवितेत प्रकटतो. (पण या विराट महानगरांमध्ये झालेली नवकल्पनांची घुसळण, जुन्या सरंजामशाहीचा अस्त, त्यातून अनेकांसाठी निर्माण झालेले नवे आशासूक्त मात्र या मांडणीत येत नाही,  हा कालखंड काहीसा सोपा करून मांडला जातो.) हा संघर्ष कसा? तर -

एतद्देशीय विरुद्ध परकीय संस्कृती.

प्रत्यक्ष निर्मिती विरुद्ध दलालांची चलती.

या व्यवस्थेत फोफावलेलं शासनाचं भयाकारी विश्वरूप आणि भयाकूल, शरण, नाकर्ते झालेले व्यक्तीमन.

'अयोनिसंभव असतं सरकार

युगानुयुगे स्थिर

दैवताच्या धाकासारखं

मध्यरात्री शस्त्रबेड्या घेऊन येणाऱ्या

घोड्याच्या टापांसारखं. '

हा संघर्ष कालरूपही आहे. भूतकालीन श्रद्धास्थानांच्या अवशेषांभोवती समकालीन चंगळवाद एखाद्या रोगसंसर्गासारखा बळावतो आहे..

'टिळक,तुम्ही चौपाटीवर इथे

कशासाठी उभे आहात?

अहो, पाणीपुरी भेळपुरी खाणं

हा आमचा जन्मसिद्ध हक्क आहे

आणि आम्ही तो रोज मिळवणारच "

य कवितेला उपरोधाची अशी लखलखती धार आहे जी बोथट संवेदनांनाही रक्तबंबाळ करेल.

'तुमचे डोके ठिकाणावर आहे काय टिळक?

तुम्ही डॉलर मिळवा

लोक बघा किती आनंदात

बिअरच्या ग्लासासारखे फेसाळलेत

तुम्ही स्वदेशी बार टाका, मस्त जगा.. "

असे टिळकांना सांगताना कवी स्वतःवर, आसमंतावर आसूड ओढत आहे.

या परिस्थितीत प्रतिभावंताची जागा कोणती? हे वास्तव प्रभावीपणे शब्दात आणणं,बस्स इतकीच? नायगांवकरांचं संवेदनाक्षम कवीमन त्यासाठी असमाधानी, स्वतःवर रुष्ट आहे.

'गावावर दिसती ओघळ हे रक्ताचे

मी दार लोटले आतून आयुष्याचे

मी परिस्थितीच्या बेंबीमध्ये बोट घातले नाही | मी लढलो नाही || '

असे म्हणणाऱ्या कवीला समकालीन जागतिक संदर्भांचे भान असल्यामुळे अन्यत्र प्रतिभावंतांनी निरनिराळ्या आंदोलनांत, युद्धात सर्वस्व झोकल्याचे तो जाणून आहे.

'भडभडा रस्त्यावर येणारे पूर्व युरोपातले

कवी-लेखक-नाटककार

आपण मनातून नुस्ते पहातो. तेव्हा एखाद्या एपिसोडचं शूटींग तर नाही ना

असं म्हणत पुढे सरकतो

कदाचित आपण खूप आध्यात्मिक असतो.. '

असाही एक टोला ते स्वत;लाच मारतात !

नायगांवकरांच्या संवेदनांना, काव्यशैलीला ग्रासणारे वास्तव हे असे उग्र आहे की ते त्यांना जराही मोकळे सोडत नाही, त्यांच्यातल्या कवीला जराही सौंदर्यविलास करू देत नाही! कुणी याला बांधिलकी म्हणेल. ती त्यांच्यातल्या कवीवर सदैव मात करते. किंवा असे म्हणावे लागेल की नायगांवकर अनुभवांच्या दाहाकरता शब्दांचाही मोह धरत नाहीत.. कवितेमधली ज्योत क्षीण आहे.. शहरामधली तिची जागा केविलवाणी आहे. नकळत टी. एस. इलियटच्या "In the room the women come and go,Talking of Michilangelo. ' या कवितेची आठवण करून देणारे हे शब्द..

बुकेत फुटतो फुलांस घाम

हवेत विरती शब्द नी हात

कोपऱ्यातला थवा सांस्कृतिक

इवलीशी बघ चर्चा करतो'

.. अशा जीवन-पराङ्मुख गटांची पर्वा करण्यापेक्षा कवी 'तबकाच्या तळाशी काजळीचा थर ' होणे पसंत करतो.

मी न केली आरती वा मी न केला उत्सव

मात्र तबकाच्या तळाशी काजळीचा थर झालो

-या वृत्तीमुळे नकळत कवितेवरही अन्याय झाला आहे. कवीने क्षमता असूनही तिला कधी सजविली, शृंगारली तर नाहीच्,पण तिचे कैक कोवळे उन्मेष जाळून राख केले आहेत.. काजळीच्या त्या थरात मिसळले आहेत. मात्र दूरवर मृदंगाचा ताल घुमावा तशी ती दडपलेली सुंदरता कवितेच्या आतली लय होऊन जागते. मानवी क्रौर्यपीडित व्यवहारांच्या आक्रोशातूनही कवी ती लय ऐकतो, कवितेत उतरवतो.

'कल्याणकारी द्वारपालांच्या मनात फुलतात स्वप्नांचे करुणासागर

तशी मंदचपल वेगाने उभी रहातात प्रत्यक्ष संस्थांची

सनातन आणि अपरिहार्य अस्तित्वे

संस्था असीम त्यागाच्या अनावर ओढीतून

दरवळणाऱ्या वासासारख्या धुंद करतात आसमंत

संस्था टाळता येत नाहीत कितीही टाळू म्हटले तरी

एकलेपणाच्या व्यसनाला भुरळ घालतात संस्था

मृदंगासारख्या तालावर घुमतात.. '

संस्थांची वाढ आणि ऱ्हास दोन्हींचा शोध घेणाऱ्या या सुंदर कवितेत वास्तवातलेच अदृष्य काव्य समर्थपणे उमटते,म्हणून शाश्वताचा स्पर्श तिला लाभतो.

सौंदर्यासक्तीबरोबरच स्वतःमधली तरल आध्यात्मिकताही रुढार्थाने छाटून टाकणारा हा कवी एक सवलत मात्र स्वतःला देतो.. व्यथेला उःशाप आहे तो फक्त विनोदबुद्धीचा. ही तीच विनोदबुद्धी जी टिळकांवरील कवितेत तिखट उपरोधाचे हत्यार घेऊन आली होती.

'पंढरीच्या विठ्ठलाचे मीच केले सांत्वन

मी विटेने अंग त्याचे शेकले कित्येकदा

लाल किल्ल्यातून मी संदेश राष्ट्राला दिला-

-'वेळ पडली लोकहो, झोपेतुनी उठवा मला !'

'ते व तू' या कवितेत धनदांडगे व सामान्य यांच्यातला फरक असाच वक्रोक्तीच्या सहाय्याने व्यक्त झालाय -

'ते क्रेडिट कार्ड

त्रिभुवन दास

तू ठेव गहाण हंडा -कळशी

फिर बोंबलत '

या कवितेतली कालची प्रेयसी आजची पत्नी आणि अनंतकाळाची माता असणे नायगांवकरांच्या स्वभावाशी अगदी सुसंगत आहे.

मी म्हणालो बायकोला आजपासून प्रेयसी तू

ती म्हणाली, यापुढे चोरून भेटू "

असा गोडवा असलेलं पतीपत्नीचं नातं रेखाटायला नायगांवकरांना खूप आवडतं.

स्त्रीचे हृद्‌य असे हे सांसारिक रूप कवी रेखाटतो. ती पत्नी असते किंवा काटक्यांच्या शिशिरात चुलीशी खोकणारी माय.

'नाही रानाचा आधार

नाही पायाखाली जोते

काटक्यांच्या शिशिरात

माय चुलीशी खोकते.. '

पण ज्योतीबांच्या महाराष्ट्रातली साक्षर स्त्री स्वत;च लिहिते ' मी स्वखुशीने जाळून घेतेय' यातला विपर्यास, दुर्दैव, कवीला छळत रहाते..

आता तिला

सही निशाणी

डाव्या आंगठ्यासाठी

शाई फासावी लागत नाही

आता ती स्वत:च लिहू शकते

घासलेट ओतून घेण्याआधी

'मी स्वखुशीने

जाळून घेतेय '..

नायगांवकरांच्या कवितेचे रूप या स्त्रीसारखेच आहे. अनलंकृत, परम दयामय पण स्वतःच्या शक्तीला कमी लेखणारे.

समकालीन समर्थ कवी म्हणून आम्हा वाचकांच्या मात्र त्यांच्याकडून अजून अपेक्षा आहेत. त्यांच्या कवितेच्या वाटेचा परतीचा प्रवास पुन: त्या 'स्व'ला ओळखणाऱ्या उगमाकडे व्हावा अशी उत्तरोत्तर लेखन शुभेच्छा.. आणि अभिनंदन.

**नवपार्थहृद्गत : गीतेचा नव-आशयबोध**

दु:खकाळोखात चाचपलेलं, संदेह-आवर्तात झाकोळलेलं गीतेचं बांधकाम. ते प्रज्ञेच्या प्रकाशात पहाताना कसं वाटत असेल? अन तेही समकालीन समवयीन प्रज्ञेच्या प्रकाशात?

'||नवपार्थहृद्गत||- एक आधुनिकतावादी गीताचिंतन' वाचताना अशी काहीशी भावना मनात दाटली. गीतेवरचे दोन(च) महान भाष्यकार कमीअधिक नजरेखालून गेलेले पूर्ववयात, पण ते वेगळं होतं. श्रीज्ञानदेवांची जीवन-लेखन भूमिकाच''अलौकिका नोहावे लोकांप्रती'' या धारणेचे प्रात्यक्षिक, मग त्यांची गीता-टीकाही भगवद्गीतेच्या गाभाऱ्यातील विशुद्धार्थांची भावार्थदीपिका असणे क्रमप्राप्तच होते, आणि लोकमान्य टिळक तर लोकमान्यच. आधी स्वराज्यासाठी संघर्ष, मग धार्मिक सामाजिक लोकजागरण या तत्वावर आधारलेली त्यांची जीवनदृष्टी. म्हणून त्यांच्या गीता-रहस्यात

कर्मवादाचा जागर असला तरी श्रद्धेय मूलतत्वांना प्रश्न विचारण्याची बंडखोरी असण्याचं कारण नव्हतं.

राजीव सानेंनी या पार्श्वभूमीवर स्वत:ला 'नवपार्थ' संबोधत व्यक्ती-समष्टी च्या अंतर्बाह्य विश्वाला, म्हणजेच समग्र अस्तित्वालाच, वेढून असलेले प्रश्न या काळातल्या तत्वचर्चेतल्या सख्यभूमिकेतून श्रीकृष्णाला विचारले आहेत, कित्येकदा त्याला खोडून काढले आहे, आपली नाराजी/ मते/आक्षेप स्पष्ट शब्दात नोंदवला आहे इतकेच नव्हे तर या श्रेष्ठ-परम सुहृदाला वैचारिक नवदर्शनस्वरूप पर्यायही सुचवले आहेत.

प्रतिमा प्रकाशन, पुणे यांनी २००८ मध्ये प्रथम प्रकाशित केलेल्या या पुस्तकाचा अल्प आढावा घेण्याचा हा प्रयत्न.

'नवपार्थहृद्गत' चं सगळ्यात मोठं वैशिष्ट्य म्हणजे हा आशयकोश लेखकाने स्वरचित वृत्तबद्ध कवितेत, तेही निरनिराळ्या वृत्तांत, अनेकदा नव-वृत्तातही (उदा. वसंततिल्का वृत्त) व्यक्तवला आहे! हे पद्यात्मक विवेचन एका विशिष्ट पद्धतीने येते. मूळ गीताश्लोक, त्याला मूळ अर्थाच्या अंगाने येणारे पण नवमतवादी असे अनुसाद, त्याला आक्षेप घेणारे ते प्रतिसाद, त्यावर स्वतंत्रपणे व्यक्त झालेले ते स्वयंसाद अशा तिहेरी बांधणीत.

आधीच गीताटीकेचा व्यामिश्र आशय, त्यात पुन: वृत्तबद्ध कवितेचा आव्हानात्मक आकृतीबंध. या दोन्ही काहीशा क्लिष्ट पातळ्यांवर वाचकाची दमछाक होऊ नये म्हणून पुन: हाच आशय सहज गद्य संवादाच्या स्वरूपात, पद्यासोबतच विवेचनात्मक विस्तार करत मांडण्याचा एक आगळावेगळा प्रयोग साने करतात.

हा नवपार्थ गीतासंहिता, त्यातले श्रीकृष्णाचा देवत्व हा भक्तीमार्गी प्रक्षेप आहे की नाही या स्वरूपाच्या उहापोहापासून दूर आहे.'' माझी प्रकृती पांडित्यपूर्ण अभ्यासकाची नसून सृजनशील विचारकाची आहे''असे साने म्हणतात. एका अर्थी ते आस्तिकांमधले नास्तिक आणि नास्तिकांमधले आस्तिक असल्याचे जाणवते.

ग्रंथाची मांडणी करताना आपले मनोगत साने प्रास्ताविकाच्या सात छोट्या पण अर्थवाही विभागातून स्पष्ट करतात.

''कोण हा नवपार्थ'' या पहिल्याच प्रास्ताविक विभागात गीतेचा सयुक्तिततेच्या कसोटीवर एक सुसंगत विचारव्यूह म्हणून पुनर्विचार होण्याची आवश्यकता ते प्रतिपादन करतात. भारतालाच नाही तर वैश्विक आत्म-आक्रोशाला दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शन करणारा गीताविचार केवळ श्रद्धाविषय असून भागणार नाही, त्याचे शोधन करावे लागेल, कालौघात त्यात दाटलेले, विसंगत म्हणून आधुनिक बुद्धीवादी नास्तिक मनाला परके वाटणारे खंड छाटावे लागतील तरच गीतेतले अध्यात्म आजही प्रगतीशील, प्रवृत्तीपर आणि विचारस्वातंत्र्य जोपासणाऱ्या आस्तिक-नास्तिक व्यक्ती-समाजांना स्वागत व स्वीकार करण्याजोगे वाटेल अशा दृढ धारणेतून हे लेखन केले आहे.

ही आंतरिक विसंगती शोधण्यासाठी त्यांनी गीतेच्या संहितेत विखुरलेल्या व पुनरुक्त झालेल्या संकल्पना मूळ कथनात्मक क्रम सोडून एकमेकांशेजारी मांडल्या आहेत ज्यामुळे त्यात अंतर्भूत असलेला विरोधाभास स्पष्ट होईल व त्या अनुषंगाने श्रीकृष्णाला प्रतिप्रश्न करता येतील. ही वैशिष्ट्यपूर्ण मांडणी हे या पुस्तकाचे बलस्थान आहे.

दुसरा प्रास्ताविक विभाग ‘प्रश्न, जे उपस्थित करायचे राहूनच गेलेत!!’’ या बोलक्या शीर्षकाचा आहे. प्रश्न अनेक आहेत, प्रश्न पुढेही सातत्याने येत राहातील, पण या विभागात आलेले प्रश्न विशेष मूलगामी असे आहेत.

वानगीदाखल पहिलाच प्रश्न. महाभारतात अनेक घटना, खरे तर दुर्घटनाच, शेवटी युद्धभूमीवर विसर्जित झाल्या. गीतेची सुरुवातच अर्जुन-विषादाने होते. पण आज नवपार्थाला या युद्धप्रसंगाआधीच्या दोषास्पद घटनाक्रमातच काही उदात्त व अपरिहार्य दिसत नाही.,’‘मी वेळीच युधिष्ठिराशी शुभद्रोह (म्हणजे योग्य कारणासाठी विरोध) केला असता तर युद्धभूमीवर वेळ टळून गेल्यावर अर्जुन-विषाद व्यक्त करायची वेळच आली नसती. तथाकथित धर्म्यतेचे पटण्यासारखे निकषच नसावेत? अनिर्णय व उलटसुलट निर्णय यांनीच प्रकरण चिघळून महासंहाराची वेळ आणली नाही काय?’’ हा नवपार्थाने स्वत:लाच आश्चर्याने केलेला प्रश्न.

'सामाजिक नीतिमत्ता राखण्यास मोक्षोपदेशाचा उपयोग काय?' हा भगवंतांना केलेला दुसरा प्रश्न.

तिसरा, महत्वाचा प्रश्न - 'वर्णसंकराची चिंता परमेश्वरानेच प्रथमत: अर्जुनविषादयोगातच व्यक्त करावी, हा वर्ण हे वंशवादी असल्याचाच पुरावा नाही का?'

या तिसऱ्या प्रश्नाची चर्चा महाभारताच्या अभ्यासकांनी सामाजिक संदर्भात केली आहे. वर्ण-वंशवाद विषयांचा संदर्भ आल्याने इथे आठवते की इरावती कर्वे यांनी महाभारत काळात ब्राह्मण क्षत्रिय व वैश्य असे तीन वर्ण होते असे प्रतिपादन केले आहे. वैश्यांचेच पुढे दोन विभाग होऊन शूद्रवर्ण अस्तित्वात आला (उत्पादन व विक्रेते वेगवेगळे झाले) असे या मतामध्ये येते. क्षत्रियांमधलेही खालच्या स्तरावरले लोक शूद्रात गणले जाऊ लागले हे मत आंबेडकरांनी अधिक अधोरेखित केले. या मत-मतांतरातही समाज-अभ्यासकांमध्ये वर्ण हे महाभारत काळाच्या आधीपासूनच वंशवादी आहेत याबद्दल दुमत नाही. सामान्य वाचकालाही वर्ण हे महाभारत काळात तरी

वंशवादीच होते हे सतत जाणवते. विदुर, कर्णाचा सूतपुत्र म्हणून उल्लेख व त्यातून त्याचा झालेला अव्हेर, द्रोणाचार्यांच्या क्षात्रकर्मात (धनुर्विद्या शिकवणे) त्यांच्या ब्राह्मणत्वाचा कोणालाही न पडलेला विसर यातून उभे रहाणारे समाजचित्र लवचिक उपजीविकावादी पण वर्ण-वंश जाणिवांच्या पकडीत असलेल्या समाजाचेच आहे.

हे झाले सामाजिक वास्तव, साने यांनी 'ते श्रीकृष्णाला स्वीकारार्ह आहे का?' अशा अंगाने विचारले आहे तर हा गीता-ईश्वर एकूणच वर्णसंकर विषयात समाजविरोधी काही न करण्याच्याच पक्षातला आहे हे त्श्रीकृष्णाने अन्यत्रही (पहिल्या अध्यायाबरोबरच तिसऱ्या अध्यायातही ३. २४ या श्लोकात- 'उत्सीदेयुरिमे लोका न कुर्यां कर्म चेदहम | संकरस्य च कर्तास्यामुपहन्यामिमा: प्रजा:') सांगितले आहेच! तेव्हा हा प्रश्न 'ईश्वराने असे समाजाचा अनुनय करणारे तत्त्व का म्हणून स्वीकारावे?' या वेगळ्या स्वरूपात यायला हवा होता असे वाटते.

कर्मविपाक, अहंकार, समदृष्टीविवेचन, कामप्रेरणा, फलहेतुकता या सर्व शुद्ध आध्यात्मिक संकल्पनांना या विभागात केलेले इतर मूलगामी प्रश्न पुढे येणारच आहेत.

चौथ्या प्रास्ताविकात'' आधुनिकतावाद ' या अत्यंत व्यापक संज्ञेतून आपल्याला नेमके काय अभिप्रेत आहे हे साने स्पष्ट करतात. तसेही व्यासांच्या महाभारताचे शून्याकार अनुभव देणारे घटनाक्रम आजही आधुनिकच वाटतात, त्यातल्या व्यक्तींचा तत्वसंघर्ष कालातीत म्हणून एका अर्थी आधुनिक असला तरी''आधुनिक व्यक्तीला गतिमान स्वधर्म आणि गतिमान भूमिकाधर्म या दोहोंचे शोधन करत राहायचे असते'' हे सानेंचे विधान समकालीन गतिमान अस्थिर जीवनाच्या संदर्भात यथार्थ वाटते.

लेखनामागच्या, त्याच्या आकृतिबंधामागच्या प्रेरणा, सूचना, श्रेयनिर्देश यांबद्दल सूक्ष्म विचार मांडणारी अन्य पाच ते सात क्रमांकाची प्रास्ताविके वाचून आपण पुस्तकाच्या मुख्यप्रवाहात शिरतो.

त्याआधी थोडेसे श्रेयनिर्देशाबद्दल. कारण केवळ 'अंतर्दृष्टी आवश्यक असली तरी पर्याप्त नसते' असे विधान करत सानेंनी येथे इहवाद व अध्यात्म यांची सांगड घालण्यासाठी आपण कोणत्या महत्वाच्या दर्शनांचा अभ्यास केला, कोणत्या विद्वज्जनांचे सहकार्य घेतले याचे या महत्वाच्या प्रास्ताविकात उल्लेख केले आहेत. त्यात बर्गसन, कांट हुसर्ल, युर्गेन हाबरमास, रिकर या पाश्चात्य तत्वज्ञांबरोबर श्रीनिवास दीक्षित, मे. पुं. रेगे, आचार्य विनोबाजी, सुहास पटवर्धन, देवदत्त कानिटकर, वि. य. कुलकर्णी, अजय व सुलभा ब्रह्मनाळकर यांचा नामनिर्देश केला आहे.

प्रत्येक प्रास्ताविक व प्रकरणाअंती मराठी/संस्कृत शब्द/संकल्पनांचे 'समीपार्थी ' (सानेंचा शब्द) इंग्लिश शब्द आहेत जे फार अभ्यासपूर्वक सिद्ध केले आहेत.

'श्रद्धा. जिज्ञासा आणि तत्वचर्चेतला खुलेपणा' हे पहिलेच प्रकरण. श्रद्धास्वातंत्र्य मानण्याचे गीता-ईश्वराचे वेगळेपण, सख्यत्वभूमिका आणि तत्त्वबहुलतेचा स्वीकार यामुळे गीतेचा आशय व्यापक विश्वात्मक झाला आहे. गीतेच्या, गीता-ईश्वराच्या या स्वरूपामुळे आजही भक्त-अभ्यासक-चिकित्सक या सर्वांनाच आजही गीता-ईश्वराशी संवाद साधावासा वाटतो. साने एका सुंदर स्वयंसादातून गीता-ईश्वराला आपली नम्र पण चिकित्सक भूमिका सांगतात -

आक्षेपे मम सीमितज्ञचि अशा व्हावे जरा मंथन

तेजाळून उठो तुझाच महिमा यासाठि हे इंधन

कर्तृत्वा न गमावूनी विकसु दे अभ्यूदयाध्यात्म ते

जोपासो नच मोक्ष केवळ परी चारी पुरूषार्थ ते

पुढील प्रकरणात भारतात आणि महाभारतात धर्मग्लानी का आली आहे, सत्ताधाऱ्यांशी वेळीच शुभद्रोह (सानेंच्या स्वनिर्मित शब्दांपैकी हा एक महत्वाचा शब्द) न केल्याने, त्याऐवजी सतत यांत्रिक धर्माचरण केल्याने, वेळोवेळी कोसळलेली अनर्थकारी संकट-परंपरा साने एक एक प्रसंग घेऊन, त्यावरच्या अर्थसौंदर्यपूर्ण पद्यरचनांसहित विश्लेषित करतात.

'मोक्षोपदेश आणि युद्धप्रेरके 'या प्रकरणात गीतेची मूळ बांधणी -युद्धातल्या स्वत:च्या भूमिकेबद्दलचा नैतिक क्षोभ, त्यातून उद्भवलेला अर्जुनाचा संभ्रम आणि त्यावर इलाज म्हणून भगवंताने त्याच्याशी केलेला युद्धधर्म आणि मोक्षोपदेश यांची सरमिसळ करणारा, आजच्या चिकित्सक वाचकाला अंतर्गत विसंगतीने युक्त वाटू शकणारा युक्तिवाद- चर्चिली आहे. भगवंताच्या युक्तीवादावर साने मार्मिक दीर्घ भाष्य करतात. अनेक संकल्पनांना प्रश्न विचारतात, निरनिराळ्या अध्यायातले त्यांचे क्रम मोडून त्या संकल्पना एकमेकांशेजारी आपल्या प्रयोगशाळेत ठेवतात. त्यांचे खंडन करतात. उदाहरणार्थ -

''तू फक्त निमित्तमात्र हो'' यातले निमित्त होणे ही कृती कशी काय असू शकते?

या युद्धात जर धर्माधर्मनिर्णयच होते तर ते महायोध्यांच्या द्वंद्वस्वरूपातच का खेळले गेले नाही? सामान्य सैनिकांची जीवितहानी का?

'वासांसि जीर्णानि' चा नियम युवा अभिमन्यूच्या शरीराला कसा लागेल?

असे अनेक प्रश्न. त्यांची सानेंनी केलेली पद्यरूपे मार्मिक आहेत.

चौथे प्रकरण मोक्षकेंद्रीपणातून येणाऱ्या न्यायबुद्धीच्या अभावावर लक्ष केंद्रित करते. कर्मविपाक खरा मानला तरी तो न्याय्य कसा असेल? सानेंचा स्वयंसाद (वृत्त शार्दूलविक्रीडित)-

न्यायाची अट ही किमान कळणे आरोप ‘आरोपि’ला
अर्हत्वार्जन कोणत्या कृतीमुळे जी लाभ दे आजला
ज्याच्याबद्दल पारितोषिक मिळे वा प्राप्त हो दंडही
तेची ना कळता जीवास ‘शिकणे’ कैसे बने शक्यही?

-हे वाचताना मर्ढेकर नाही आठवले तरच नवल..
‘’न्यायाच्या निज मंदिरात बसुनी साक्षीपुराव्याविना
किंवा काय गुन्हा असेल घडला सांगीतल्यावाचुन
न्यायाधीश असेल मानव तरी शिक्षा सुनावीत ना
देवाची परि न्यायरीति असले पाळील का बंधन!’’

येथे ईश्वराला अजून एका शब्दात सानेंनी पकडले आहे, जो शब्द माझ्यासकट समस्त स्त्रीजातीला कित्येकदा खटकला असेल!‘‘ स्त्रियो वैश्यास्तथा शूद्रा: तेऽपि यांति परां गतिं’‘ (गीता ९. ३२) यातील’‘ पापयोनय:’‘ म्हणजे पापयोनीत जन्मलेल्यांच्या (? म्हणजे आणखी कोण?) बरोबरीने या स्त्री/शूद्र/वैश्य जातींचा श्रीकृष्णाने वैषम्यपूर्ण उल्लेख केला आहे. (इथे सानेही’‘विशेष म्हणजे स्त्री उच्चवर्णीय असली तरी स्त्री म्हणून तिला निम्नवर्णीय ठरवतोस!’’ असे मुद्दा स्पष्ट करण्यासाठी म्हणतात ते दुखतेच, असाही मुद्दा अस्तित्वात असावा हे अन्यायकारकच!)

इतर अनेक अन्यायकारक संकल्पनांचा आधुनिक जाणिवेतून शोध घेताना सानेंना स्त्रियांबाबतची ही दुय्यमता दहाव्या अध्यायातील विभूतीयोगातही दिसते- बाकी सर्वोत्तमांची विशेषनामे (जसे कपिल, राम, चित्ररथ,’‘पांडवांत धनंजय’‘ वगैरे) पण

स्त्रीमधील सर्वोत्तम सांगताना मात्र एखाद्या परमगुणशाली स्त्रीचा स्पष्ट नामोल्लेख न करता अमूर्त गुणांचा उल्लेख! जणू काही स्त्रीलिंगी गुणच ('' वाणी, श्री, कीर्ती, क्षमा,'' वगैरे) सर्वोत्तम असू शकतात, हाडामासाची स्त्री सर्वोत्तम असूच शकत नाही असे म्हटल्यासारखेच हे आहे. साने हे प्रतिसादरुपात मांडतात-

जसे की वाणि, श्री, कीर्ति, क्षमा, मेधा, धृती, स्मृती

एकाही थोर नारीची का न व्हावी तुला स्मृती?''

तामसी भोजन (१७-१०) हे कोणी आवडीने खाते की ते दारिद्र्यातून लादले जाते? या आणि अशा अनेक सूक्ष्म निरीक्षणांमुळे हे प्रकरण महत्वाचे झाले आहे.

शेवटी,''मोक्षकेंद्री विचारात सामाजिक प्रक्रियांबाबतच्या विचाराचा ढळढळीत अभाव दिसून येतो'' या निष्कर्षाप्रत साने येतात तेव्हा आपणही त्यांच्याशी सहमत असतो.

यापुढचे प्रकरण कर्मफलत्याग म्हणजे नेमके काय या कळीच्या विषयावर आहे. 'योग: कर्मसु कौशलं ', 'कर्मण्येवाधिकारस्ते ' वगैरे अगदी आपल्या नेणिवेपर्यंत पोचलेल्या धर्मविचारातून अनेक प्रश्न उद्भवतात. एक वर्तनशैली स्वीकारली जाते. तिची चिकित्सा आधुनिक परिप्रेक्ष्यातून या प्रकरणात केली गेली आहे, ती दीर्घ, अर्थपूर्ण, व्यामिश्र आहे. तिच्यातले काही ठळक मुद्दे फक्त -

-'यज्ञेतर कर्मे मानवाला बंधनकारक आहेत' (३. ९) या विधानानंतर लगेच श्रीकृष्णांनी 'यज्ञाने उत्कर्ष पावा, कामना पुरवून घ्या ' असे विरोधाभासी फलहेतुक (गीता ३. १० श्लोकातच) विधान केले आहे. (याची चर्चा करताना साने यज्ञ हे उत्पादन व पर्यावरण रक्षण यांचे प्रतीक आहे असा सकारात्म अर्थ लावून पुढे जातात. यज्ञाची विविध स्थूलसूक्ष्म रूपे श्रीकृष्णांनीही वर्णिली आहेत तरीही प्रत्यक्षात यज्ञसंस्थेत शिरलेला कर्मकांडी दांभिकपणा वेळोवेळी समाजाच्या अध:पतनालाही कारणीभूत झाला आहे हेही कुठेतरी प्रश्नस्वरूपात यायला हवे होते असे वाटते.)

-फलत्यागातले त्यागफल- फलत्याग करण्यातून एक त्यागफल- 'मोक्ष' हे अपेक्षिले गेले आहेच. मोक्षालाही फलत्व आहेच. म्हणजे सात्विक फलत्यागात सूक्ष्म आणि सर्वाधिक फलदायी फलाकांक्षा आहे!

-हाच विचार पुढे नेताना मग सरळसरळ फल इच्छिणारा कर्ता राजसी व म्हणून अनिवार्यपणे हिंसक हे गृहितक (१८. २७) एकांगी नाही काय?

- समाजऋणाची जाणीव ठेवून फलस्वामित्व हे सर्वसमावेशक असावे असा एक चांगला पर्याय या विचार मंथनाअंती साने सुचवतात.

पुढील प्रकरणांमध्ये अनेक संज्ञा खोलात चर्चिल्या गेल्या आहेत त्यातील 'समदृष्टी ' हा गीतेत वारंवार येणारा व आकलनास पचनी न पडणारा एक विचार.

'सर्वभूतहित ' म्हणजे काय? तर्काने ते शक्य आहे का?

सानेंचा प्रतिसाद -

मृग धावे अकांताने, गाठाया व्याघ्रही तसा

उभयांचेहि कल्याण येथे चिंतू तरी कसा?

थोडक्यात विवेक केव्हा व समदृष्टी केव्हा याचे निकष स्पष्ट न करता गीतेत समदृष्टीचे जे वारंवार एकांगी चित्रण आले आहे ते सानेंनी नेमक्या शब्दात परीक्षिले आहे.

तसेच इंद्रियदमनाबद्दल. काम हा नरकाकडे नेणाऱ्या तीन दारांपैकी पहिला (१६. २१), तो फक्त प्रजोत्पत्तीपुरताच क्षम्य (गीता १०. २८- 'प्रजनाश्चास्मि कंदर्प'')

यावरचा सानेंचा प्रतिसाद (मंदाक्रांता)

''ऊर्मींना ज्या रिपुच गणुनी मानिसी पूर्ण दम्य

त्याही होती उचित समयी जीवकार्यी सुरम्य"

शिवाय एकदा काम सर्वग्रासी आहे हे मान्य केले की त्याला शह देणारे काय शिल्लक रहाते? दमन करावे तरी कसे? शिवाय, दमनातून पोसला जाणारा अहंकार अधिक मोक्षनाशक नाही का?

कामाच्या दमना पुरेल इतुकी शक्ती कुठूनी मला

त्यासाठी उपलब्ध एकच दिसे माझी अहंता मला!

एकूणच निरनिराळी इंद्रिये व त्यांचे काम्य विषय यात सरसकट निवृत्तीचा उपदेश करताना श्रीकृष्णांनी गीतेत अध्याय २ श्लोक ६७ मध्ये जी शीड व वारा यांची प्रतिमा वापरली आहे- ("तदस्य हरति प्रज्ञा वायुर्नावमिवांभसि") - तीच वापरून साने 'कुशल नाविक जसा कधी शिडे फुलवून तर कधी मिटवून अनुकूल प्रतिकूल काळात नौकानयन करतो तसे इंद्रियदमनाचे असावे ' असे सुचवतात.

'मिटवू' हाच एकांगी अर्थ का देसी संयमा

रसप्रज्ञत्व वाढावे पाळुनी नीतिनीयमा..

यावर दुमत असायचं कारण नाही, फक्त आधुनिकतेच्या संदर्भात आज नीतिनियमांवर व कायद्यांवरही पडलेले नवे ताण, नवे वाद इथे आठवत रहातात इतकेच.

गुणत्रय व दैवासुरसंपद्विभाग या गीतेतल्या महत्वाच्या, परस्परसंबंधी सिद्धांतस्थिती. सात्विक, राजस आणि तामस या तीन गुणांच्या सर्व अध्यायात विखुरलेल्या वैशिष्ट्यांचा एक प्रदीर्घ तौलनिक तक्ताच(महत्वाच्या १७ निकषांवर - व्याख्या, लक्षण, फल, चलन आदि) अकराव्या प्रकरणात देऊन सानेंनी एक मोठेच काम सोपे केले आहे. त्यातून उभ्या रहाणाऱ्या स्पष्ट अशा चित्रावरून त्यांनी आपली मते नोंदवली आहेत.

-गीतेतील व्याख्या पाहता (गीता १४. ८- मोह, अज्ञान, प्रमाद, आलस्य, निद्रा) तामसी हा दंडनीयपेक्षा दयनीय वाटणारा गुणविभाग आहे. त्यातही निद्रासुख हे नेणीवेतून आत्मानंद देणारे, ते सर्वस्वी तामसी कसे? तामसी आहाराबद्दल मागे आलेच आहे. तो अभावग्रस्तांवर लादला गेलेला आहे. तो पापमय कसा?

-राजसी गुण हे आसुरी संपत्तीच्या लक्षणांजवळ जातात हे अनेक श्लोकांवरून अन्वयी वा व्यतिरेकी तर्काने सिद्ध होते. फार तर राजसी + तामसी = आसुरी या समीकरणातून नाकर्त्या तामसी श्रेणीबरोबरच कर्त्यासवरत्या, सामाजिक अभिसरणासाठी, प्रगतीशीलतेसाठी आवश्यक असलेल्या धडाडीच्या सकारात्म राजसी प्रवृत्तीवर अन्याय झाला आहे.

-सात्विकी= ब्राह्मणी=दैवी या गुणसमुच्चयाच्या उदात्तीकरणात फक्त मोक्षपुरुषार्थाचा विचार आहे, मानुषी आचारसंहितेचा नाही.

हे त्यांचे निष्कर्ष पौर्वात्य अध्यात्मातून पोसल्या गेलेया एका बाजूला तामसी अकर्तेपण व दुसऱ्या बाजूला सात्विकी अकर्तेपण या दुहेरी पलायनवादावर योग्य आक्षेप घेणारे आहेत.

यानंतर शेवटच्या टप्प्यावर सामाजिक/ नैतिक क्षेत्र थोडे बाजूला ठेवून क्षर-अक्षर पुरुष, क्षेत्र-क्षेत्रज्ञ (शरीर- प्रकृति आणि पुरुष) या आध्यात्मिक संकल्पनांचा चिकित्सक आढावा घेत क्षर आणि अक्षर (जीवात्मा आणि परमात्मा) यात झोत-स्रोत संबंध आहे अशा एका आत्मिक अनुभूतीपर्यंत साने येतात. गीतेत तेराव्या अध्यायात वर्णिलेले क्षेत्र (शरीर)केवळ जडाने बनलेले नसून त्यात मन, इंद्रिये, अहंकार, बुद्धी, इच्छा, द्वेष, सुखदु:खे, संघात, चेतना, धृति अशा बऱ्याच गोष्टी येतात. या क्षेत्रात राहून विशुद्धात्मा विकारी होतो. पण या दोन्हींच्या द्वंद्वात्मक संबंधामुळे जन्म/पुनर्जन्म घडवणारी कर्मे घडतात.

पुरुष: प्रकृतिस्थो हि

भुङ्:क्ते प्रकृतीजान् गुणान्

कारणं गुणसङ्. गोऽस्य

सदसद्योनिजन्मसु (गीता १३. २१)

या प्रक्रियेला साने क्षर आणि अक्षर (जीवात्मा आणि परमात्मा) यांचा झोत-स्रोत संबंध म्हणतात. गवाक्षातून येणारा प्रकाशझोत गवाक्षसापेक्ष असतो, तसा गवाक्षाच्या काचेच्या रंगानुसार गुणान्वित झालेला तो जीवात्मा, पण सूर्य, जो सर्वच जगाला उजळतो तो मूळ प्रकाशस्रोत, चित्स्रोत आहे तो परमात्मा. हीच''योगमाया समावृतता'' असे ते नोंदवतात. म्हणून 'द्वाविमौ पुरुषौ लोके क्षरश्चाक्षर एव च ' या श्लोकावरचा त्यांचा अनुसाद असा येतो -

आत्मे दोन्हीही या लोकी

क्षर आणिक अक्षर

क्षर होत ते जीवात्मे

त्यांचा चित्स्रोत अक्षर..

शेवटी पंधराव्या अध्यायांतीच्या 'पुरुषोत्तमा'ची व्याख्या करणाऱ्या खालील श्लोकावर भाष्य करताना ते एक कळकळीची विनंती ईश्वराला करतात - या आत्मस्वरूपातून तू कर्तेपणाला वगळू नकोस, अकर्तेपणाचे महत्व इतके वाढवू नकोस की ते तुझ्याच मुळावर येईल, कारण मी स्वत:ला अंशत: स्वनियंता, आणि तुला जगन्नियंता मानतो!

यस्मात्क्षरमतीतोऽहं

अक्षरादापि चोत्तम:

अतोऽस्मि लोकेच वेदेच

प्रथित: पुरुषोत्तम: (गीता १५. १८)

आता गीतार्थाची शेवटची खडतर चढण. ईश्वराने गीतेत स्वत;च्याच स्वरूपाबद्दल, भूमिकेबद्दल परस्परविरोधी विधाने केली आहेत ज्यातून गोंधळ व गूढत्व वाढले आहे.

जसे की ‘ जे जे म्हणून आहे ते मीच हे महात्मे जाणतात’ -’वासुदेवं सर्वमिति स महात्मा सुदुर्लभः ‘ (७. १९)

असे असताना, ‘अमृतं चैव मृत्युश्च सदसच्चाहमर्जुन:’ - ‘मी अमर्त्य, मर्त्य, मीच सत आणि असत’ (९. १९) हे एकीकडे, आणि, ‘नासतो विद्यते भावो नाभावो विद्यते सत:’(२. १६)- ‘असत भाव म्हणून विद्यमान होऊ शकत नाही, सत अभाव म्हणून विद्यमान होऊ शकत नाही!’’ (२. १६)

तर ही सर्व विधाने साने त्यांना आकळलेल्या, गूढाचे निराकरण करणाऱ्या ‘ईश्वराचे प्रारूप’ या तेराव्या प्रकरणात स्पष्ट करतात.

येथे एक वाचक म्हणून हे जाणवते की साने चिद्विलासवादी अद्वैताचे आधुनिक परिभाषा तयार करून समर्थन करत आहेत. हे प्रारूप थोडक्यात असे आहे- ईश्वराची काही मुख्य स्वरूपे आहेत जी या परस्परविरोधी विधानांमधून आळीपाळीने प्रकट होतात. त्यात गूढता नसून नियमबद्धता आहे.

तृप्तसर्वात्मेश्वर अर्थात स्वसंवेद्य नित्यतृप्त शुद्ध सच्चिदानंद अक्षर-पुरुष किंवा तृप्तेश. हाच मोक्ष पुरुषार्थ.

निसर्गेश्वर ऋतेश -जडजगतात (अपरा प्रकृती) प्रकटलेला. (‘पुण्योगंध पृथिव्यां च तेजश्चास्मि विभावसौ’ गीता ७. ९ -‘ पवित्र मृदगंधहि मीच आहे, अग्नीतले तेजहि

मीच आहे' - सानेंचा अनुसाद व इतर अशा अर्थाचे अनेक श्लोक, त्यांचे अनुसाद) याच्या आराधनेत सामावलेला उद्योगपुरुषार्थ 'अर्थ' आहे.

माया असे ज्या ईश्वरीय निर्मितीला म्हटले जाते ती लीला करणारा सलील सच्चिदानंद - निर्मातेश्वर लीलेश. (काम पुरुषार्थ)

शुभेश- या निर्मातेश्वराच्या अनिर्बंधतेवर अंकुश ठेवणारा नियंतेश्वर. न्याय - धर्मपुरुषार्थ.

जीवेश- जीवात्मेश्वर जो जीवात प्रकटतो -संवाद पुरुषार्थ - अंतर्गत आराधना (सानेंचा नवविचार).

वैश्विक शक्तीच्या या रूपांचे प्रकटन मानवी जीवनाच्या स्तरावरही 'सर्वस्य चाहं हृदि संनिविष्टो ' -'मी सर्वांच्या हृदयात राहून त्यांना स्मृती (विवेकाचे भान) देतो ' अशा तऱ्हेने होते. हा ईश्वरीय साक्षात्कार म्हणजे सुहृदाच्या भूमिकेतून केलेला ईश्वराने आपल्या जीवनात केलेला कल्याणप्रद हस्तक्षेप आहे या सुंदर विवेकविचारापर्यंत साने अनेक श्लोकांचे परीक्षण करत येतात.

जेव्हा उत्तर लख्ख होत उमटे तुम्हा जिवांच्या मनी

जेव्हा येई स्वतंत्रता 'स्व' नियमुनी कर्तव्यनिष्ठेतुनी

जीवा भासत 'मी मलाच आपुला' अंतस्थ या मेलनी

तेव्हा जाण 'शुभेश' उत्तमरुपी स्पर्शीत हो जीवनी.. (अनुसाद वृत्त शार्दू.)

शेवटी, साने केवळ मोक्षपुरुषार्थाची भलामण करण्याआधी व्यक्तीला अन समाजाला-राष्ट्रालाही कृतीप्रज्ञ बनणे आवश्यक आहे म्हणून ‘सत्वगामी राजस’ किंवा ‘दैविगामी मानुष’ या कोटीची आवश्यकता प्रतिपादन करतात.

एका महान धर्मग्रंथावर केलेले हे आधुनिक चिंतन. अनेक सूक्ष्म पातळ्यांवरील अर्थांतरे अभ्यासणारे. याचा थोडक्यात परामर्ष घ्यायचा झाला तरी हा एवढा विस्तार झाला. याशिवाय अनेक संकीर्ण व महत्वाचेही मुद्दे आहेत जे विस्तारभयास्तव घेतले नाहीत.

नित्याराधनेतील या ग्रंथाला झापडे उघडून नव्या विचारांच्या प्रकाशात, ताज्या चर्चेच्या झुळुकीचा आनंद घेत अनुभवणे आवश्यक होते, राजीव सानेंनी हे साध्य केले आहे.

# ई साहित्य प्रतिष्ठान

वाचन हा एक चांगला टाईमपास आहे. पण तो केवळ टाईमपास नाही. आपण वाचत असतो तेव्हा आपण घडतही असतो. पुस्तकांतले शब्द आपले छिन्नी हतोड्याचे काम चोख बजावत असतात. त्यामुळे वाचन करणारा समाज आणि निव्वळ पोटार्थी समाज यांच्यात फ़रक असतो. दिसतो. जाणवतो.

त्यातूनही शब्द जर मातृभाषेतून असतील तर त्या छिन्नीला धार येते. हातोडी जोमदार होते. आणि मातृभाषा जर मराठीसारखी भरजरी, वैभवशाली आणि धारदार असेल तर मनावर होणारा परिणाम आणि संस्कार अधिकच गडद असतात. म्हणून मराठीत वाचन संस्कृती रुजवायची आहे. वाचनाची आवड जोपासायची आहे. वाचनाची वृत्ती, वाचनाचा छंद फ़ुलवायचा आहे. एकट्यादुकट्या व्यक्तीत नाही. मराठीच्या कोट्यवधी साक्षरांत मराठी वाचनाची गोडी निर्माण करणं आणि त्याचं छंदात रुपांतर करणं हे आमचं ध्येय आहे. आणि त्यासाठी माध्यम आहे इंटरनेट.

एक सत्य आहे. अगदी रुस्तमातला रुस्तम वाचक आपलं पहिलं पुस्तक विनामूल्य मिळवतो. कधी घरात पडलेलं. कधी शेजारून. कधी वाचनालयातून. मग जसजशी गोडी लागत जाईल तसतसं किंमतीची पर्वा न करता पुस्तक मिळवून वाचायला लागतो. पण ही गोडी पेरावी, रुजवावी, जोपासावी लागते. म्हणून आम्ही विनामूल्य पुस्तकं दर आठवड्याला निर्माण करून पाठवत असतो. या अभियानात आम्हाला लेखकांचं खुप पाठबळ आहे. अनेक चांगले चांगले लेखक आपली उत्तम दर्जाची पुस्तकं आम्हाला विनामूल्य उपलब्ध करून देतात. म्हणून तर आम्ही आपल्याला उत्कृष्ट पुस्तकं विनामूल्य देऊ शकतो. विनामूल्य आहे म्हणून काहिही साधंसुधं देत नाही. बाजारात पैसे देऊनही मिळणार नाहीत अशी भारी पुस्तकं आम्ही विनामूल्य देऊ शकतो ती केवळ आमच्या लेखकांच्या कृपेने.

आता आम्हाला वाचकांचं पाठबळ हवंय. ज्यांना पुस्तकं वाचायला आवडतात त्यांचे ई मेल पत्ते पाठवाच. पण जे साक्षर असून, मराठी असून वाचत नाहीत, किंवा

'मराठी' वाचत नाहीत अशांचे मेल पत्ते आवर्जून पाठवा. अशा दहा लोकांपैकी एकाला जरी मराठी वाचनाची आवड लावण्यात आपण यशस्वी झालो तरी ते एक पुढचे पाऊल असणार आहे. म्हणून ही कळकळीची विनंती आहे की आपल्या आजूबाजूच्या दहा किंवा अधिक मराठी साक्षरांचे ई मेल पत्ते आम्हाला द्या. या पत्त्यांचा वापर फ़क्त आणि फ़क्त मराठी पुस्तके पाठवण्यासाठी केला जाईल. त्याचबरोबर तुम्हाला ई साहित्य प्रतिष्ठानचे VIP सभासद म्हणून नोंदले जाईल. ही सेवा पूर्णपणे निःशुल्क आहे.

आपल्या पत्राची वाट पहात आहोत.

धन्यवाद

आपले नम्र

टीम ई साहित्य प्रतिष्ठान